सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, १० नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २२६ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भाजपा-महायुती आहे तर गती आहे, महाराष्ट्राची प्रगती आहे : नरेंद्र मोदी





**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ नोव्हेंबर**

नांदेड- आज भारत देश विकसित भारताचे लक्ष्य सोबत घेऊन पुढे जात आहे. या लक्ष्य प्राप्तीसाठी भाजपा आणि महायुती गांभीर्याने काम करत असल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात भाजपा- महायुती समर्थनार्थ लाट उसळळी असून सर्वांच्या ओठावर भाजपा-महायुती आहे तर गती आहे, महाराष्ट्राची प्रगती आहे हे शब्द असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले. लोकसभा पोटनिवडणुकीचे उमेदवार व विधानसभा निवडणुकीतील भाजपा-महायुती उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. या सभेस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार अशोक चव्हाण, खासदार अजित गोपछडे, खासदार हेमंत पाटील, संजय कौडगे, प्रवीण साले, मारोतराव कवळे यांच्यासह उमेदवार माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर, डॉ. संतुक हंबर्डे, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार भीमराव केराम, आमदार तुषार राठोड, आमदार राजेश पवार, आमदार जितेश अंतापुरकर, श्रीजया चव्हाण, बाबुराव कोहळीकर, आनंद बोढारकर यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले की, भाजप- महायुती करत असलेल्या कामामुळेच निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचा वारंवार विजय होत आहे. केंद्रात सलग तिसऱ्यांदा भारतीय जनता पार्टीचे सरकार आले आहे. मागील लोकसभा निवडणुकीत नांदेडमध्ये पराभव झाला होता. परंतु यावेळी मात्र नांदेडमध्येही कमळ फुलणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. हरियाणा झालेल्या विजयाची महाराष्ट्रात देखील पुनरावृत्ती होणार आहे. विकसित महाराष्ट्रासाठी भाजपा- महायुती सरकारची आवश्यकता आहे. काँग्रेसच्या काळात जनतेने खूप प्रकल्प सहन केले. शेतकऱ्यांच्या अडचणीचे मूळ कारण काँग्रेसच आहे. परंतु भाजपा-महायुतीने मात्र मागील दहा वर्षांच्या काळात शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवल्या. मराठवाडा दुष्काळमुक्तीसाठी अकरा सिंचन योजना मंजुरी दिली आहे. त्याचबरोबर मराठवाडा वॉटर ग्रीड परियोजना सुरू केली. महाविकास आघाडी सरकारने ही योजना बंद केली होती. परंतु महायुती सरकार आल्यानंतर ही योजना पुन्हा नव्या जोमाने सुरू करण्यात आली असून या योजनेला गती देण्यात आली आहे.

भाजपा- महायुतीने नेहमीच शेतकऱ्याच्या हिताला प्राधान्य दिले आहे. महाराष्ट्रात पीएम किसानच्या माध्यमातून सव्वा कोटी निधी वाटप करण्यात आला. नांदेड जिल्ह्यात पाच लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांना दीड हजार कोटी वाटप करण्यात आले. त्याचबरोबर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देखील आर्थिक सहाय्यता करण्यात आली. मागील अडीच वर्षात पन्नास हजार कोटीचे निवेश करण्यात आले आहे. यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. विकासाचे नवीन द्वारे खुली झाली आहेत. समृद्धी महामार्गामुळे मराठवाड्याच्या प्रगतीला गती मिळाली तर शक्तीपीठ महामार्गामुळे मराठवाड्याची आर्थिक स्थिती सुधारणार आहे. भाजपा- महायुतीने नेहमीच नारी शक्तीला महत्त्व दिले आहे. पीएम आवास योजनेअंतर्गत घर देण्यात आले, शौचालय देण्यात आले, वीज, पाणी तसेच स्वयंपाक घरात गॅस सिलेंडर देखील उपलब्ध करून देण्यात आला. महाराष्ट्रातील तीन करोड महिलांना लखपती दीदी बनवण्याचा भाजपा महायुतीचा संकल्प आहे. त्यातच महाराष्ट्रात राबविण्यात येणाऱ्या माझी लाडकी बहीण योजनेला देखील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

संविधानाच्या नावावर काँग्रेसने 'लाल किताब' निर्माण केले आहे . पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचा एकही शब्द नाही. डॉ. आंबेडकरांचे संविधान संपविण्याचा काँग्रेसचा प्रयत्न सुरू आहे. या संविधानाचा पहिल्यांदा कश्मीरमध्ये विश्वासघात करण्यात आला. काँग्रेसने कलम ३७० च्या माध्यमातून वेगळा ध्वज निर्माण केला होता. यामुळे काश्मीरमध्ये आतापर्यंत आतंकवादाचे साम्राज्य होते. परंतु भाजपाने कलम ३७०ची भिंत पूर्णपणे, कायमची उध्वस्त केली असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा.हेमंत पाटील, खा. अशोक चव्हाण यांचीही भाषणे झाली.



संत तुकाराम महाराज पालखी मार्ग
संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग
• महानुभाव तीर्थक्षेत्र विकास : रिद्धपूर, काटोल, भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, नांदेड, पांचाळेश्वर, पैठण या चक्रधर आणि महानुभाव पंथ संबंधित क्षेत्रांचा विकास
• राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेने झालेल्या स्वातंत्र्यलढ्याचे स्मारक
• जेजुरीगड, भीमाशंकर, नीरा-नरसिंगपूर, श्रीक्षेत्र परळी इ. क्षेत्रविकास
• संत जगनाडे महाराज समाधीस्थळ सुदुंबरे विकास, नागपुरात आर्ट गॅलरी
• श्री संत सेवालाल महाराज स्मारक, नगाराभवन, पोहरादेवी
• संत निवृत्तीनाथ महाराज समाधीस्थळ विकास
• संत निळोबाराय महाराज समाधी मंदिर विकास
• संत गाडगेबाबा समाधीस्थळ विकास, ऋणमोचन
• प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज स्मारक निधी
• गहिनीनाथ गड संवर्धन व विकास
• संत मुक्ताई मंदिर कोथळी विकास
*Matter related to "Clock" symbol of the NCP is sub-judice in the Supreme Court
भाजप-महायुती आहे तर गती आहे
महाराष्ट्राची प्रगती आहे
शिवसेना
भारतीय जनता पार्टी - महाराष्ट्र
Published By: Bharatiya Janata Party, Maharashtra | C.D.O Barrack No. 1, Nariman Point, Mumbai- 400020
महायुतीला मतदान करा आणि विजयी करा

# अदानीसाठी एअर इंडिया कॉलनीतील रहिवाशांना ४८ तासांची नोटीस : खा. वर्षा गायकवाड

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. ९ नोव्हेंबर:

अदानीसाठी काहीही करण्यास तत्पर असणाऱ्या भाजपा युती सरकारकडून एअर इंडिया कॉलनीत अनेक दशकांपासून रहात असलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांना घरे रिकामी करण्यासाठी अत्यंत अमानुष वागणूक दिली जात आहे. शासन व प्रशासनाने अदानींच्या लोकांना घरे खाली करण्यासाठी फक्त ४८ तासात घर खाली करण्याची नोटीस देण्याचा संतापजनक प्रकार केला आहे, असे मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी सांगितले.



त्या म्हणाल्या की, एअर इंडिया कॉलनीतील ज्या लोकांना घराबाहेर काढले .महायुती सरकारने पोलीस आणि इतर प्रशासकीय कर्मचाऱ्यांना अदानीच्या माणसांना हवे ते करू द्यावे आणि नागरिकांना मदत करू नये असे सांगितले आहे. लहान मुलांसह अनेकजण घरात आत असतानाही त्याची दखल न घेता अधिकाऱ्यांनी घरे सील केली आहेत. एअर इंडिया कॉलनीत गेल्या काही दिवसांपासून हाच प्रकार सुरु आहे. घरात लहान मुले, ज्येष्ठ नागरिक रहात आहेत, अनेकांच्या आरोग्याच्या समस्या आहेत त्यांची पर्वा न करता घरे खाली केली जात आहेत, त्या सर्वांनी कुठे जायचे हा प्रश्न आहे.

मित्राला खूश ठेवण्यासाठी सरकारचे हे अपमान जनक आणि संतापजनक वर्तन आहे. हे फक्त एअर इंडिया कॉलनी किंवा धारावीपुरते मर्यादित नाही हे मुंबईकरांनी लक्षात घेतले पाहिजे. केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जर हे असे घडत असेल तर उद्या ते आपल्यापैकी कोणाच्याही बाबतीत होऊ शकते म्हणून या हुकूमशाही विरोधात एकत्र येण्याची गरज आहे

# विकसित महाराष्ट्रासाठी महायुतीला आशीर्वाद द्या : स्मृती इराणी

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.९ ऑक्टोबर : गेल्या अडीच वर्षात केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील महायुती सरकारमुळे महाराष्ट्राने विकासाची नवी उंची गाठली आहे. समाजातील सर्व घटकांचा विकास आणि महिला सन्मान हे भारतीय जनता पार्टीचे ध्येय आहे. त्यानुसारच विकासाची कामे गतीने होत आहेत. विकसित महाराष्ट्रासाठी महायुतीला आशीर्वाद द्या ,असे आवाहन माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत केले .



त्या म्हणाल्या,' एकीकडे विकासाला गती देणारी महायुती तर दुसरीकडे 'मतासांठी झूठ, सत्तेत आल्यावर लूट आणि देशातील जनतेत फूट' अशी नीती असणारी महाविकास आघाडी असुन निवडणुकीच्या प्रचारात अन्य राज्यातील काँग्रेसचे नेते आता महाराष्ट्रात खोटारडेपणाचे मायाजाल पसरवायला आले आहेत.कर्नाटकात आताची दिवाळखोरीची स्थिती पाहता निवडणूक काळात काँग्रेसने दिलेल्या खोट्या आश्वासनांमुळे राज्याची तिजोरी खाली झाली हेच सिद्ध झाले आहे. कर्नाटकला दिवाळखोरीच्या मार्गावर आणणाऱ्या काँग्रेस पक्षाने आदिवासी आणि दलित समाजाच्या प्रगतीसाठी राज्याच्या तिजोरीतील सुमारे दहा हजार कोटींचा निधी आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी इतरत्र वळवला आहे. राजस्थानात जनतेला भुरळ घालून मते मिळवण्यासाठी काँग्रेसने बेरोजगारांना भत्ता देण्याचे जाहीर केले. पण तिथे ना बेरोजगारांना रोजगार मिळाला ना भत्ता. त्यामुळे मागील विधानसभा निवडणुकीत तरुणांचा जोश आणि जनतेचा रोष पहायला मिळाला आणि भाजपाला पुन्हा जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली. असे सांगून इराणी म्हणाल्या,

'जे नेते हरियाणाच्या निवडणुकीत जिलेबीची फॅक्टरी उघडण्यासाठी इच्छुक होते त्यांना हरियाणाच्या जनतेने चोख उत्तर दिले आहे. पण जे महाराष्ट्रात काँग्रेसचा प्रचार करण्यासाठी आले त्यांनी हिमाचलच्या जनतेला वीज बिल कमी करण्याचे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात मात्र तिथे बिले वाढवली. प्रत्येक महिलेला दरमहा १५०० रुपये देण्याचेही आश्वासनही त्यांनी दिले होते. पण प्रत्यक्षात ९६ टक्के महिलांना त्यापासून त्यांनी वंचित ठेवले. मते मिळवण्यासाठी काँग्रेस निवडणुकीच्या काळात खोटे बोलते, नंतर लूट करते आणि देशात फूट पाडते हे कळून चुकल्याने महाराष्ट्रातील जनता या खोट्या आश्वासनांना बळी पडणार नाही.

मोदी सरकारने सर्वांसाठी जनकल्याणाच्या योजना राबवल्या,सर्वसमावेशक आणि सर्वांगीण विकास साधण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. जातीजातींमध्ये फूट पाडणा-या आणि केवळ मत हवे,विकास नको अशी नीती असणा-या विरोधकांना मतदार त्यांची जागा दाखवतील , असा आशावादही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# शेतकऱ्यांना कर्जमाफी व १२ तास दिवसा वीज देणार : देवेंद्र फडणवीस



## रांजणगावात प्रचार सभेत आश्वासन

वाळूज महानगर: महायुतीचे सरकार आल्यानंतर शेतक-यांनी कर्जमाफी देऊन दिवसा १२ तास विज देणार असल्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रांजणगावात आज शनिवारी आ. प्रशांत बंब यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत दिले.

आ.प्रशांत बंब यांच्या प्रचारार्थ रांजणगावात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला माजी अर्थराज्यमंत्री डॉ.भागवत कराड, आ.प्रशांत बंब, खा.संदीपान भुमरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कैलास पाटील, भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, सरपंच योगिता महालकर, पं.स.दीपक बडे, दत्तु हिवाळे, संजण केणेकर, नंदकुमार गांधीले, साईनाथ जाधव आदींची उपस्थिती होती. या सभेत मार्गदर्शन करतांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीचे सरकार आल्यास लाडक्या बहिणींना प्रत्येक महिन्यात २१०० रुपये देणार असल्याचे आश्वासन दिले. लाडक्या बहिण योजनेचा आतापर्यंत अडीच कोटी महिलांनी लाभ घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. सरकार आल्यानंतर शेतक-यांच्या सोयाबीन व कापसाला ५ वर्ष हमी भावाने पैसे देणार असल्याचे आश्वासन देत शेतकरी सन्मान योजनेच्या निधीतही वाढ करुन त्यांना प्रत्येक वर्षी १५ हजार रुपये देऊन शेतक-यांना कर्जमाफी देणार असल्याचे सांगितले. सौर कृषी पंप योजनेअंतर्गत शेतक-यांनी १२ तास दिवसा विज पुरवठा केला जाणार असून दुष्काळाची ओळख असलेला मराठवाडा पाणीदार करणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. .

या प्रचार सभेत आ. प्रशांत बंब यांनी गंगापूर-खुलताबाद विधानसभा मतदार संघात कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च करुन विकास कामे केल्याचे सांगितले.महाविकास आघाडीचे उमदेवार आ.सतीश चव्हाण हे १७ वर्षपासून आमदार असून त्यांनी काय विकास केला असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. खा.संदीपान भुमरे यांनी आ.प्रशांत बंब हे अभ्यासु लोकप्रतिनिधी असून राज्य शासनाच्या मदतीने त्यांनी कोट्यावधी रुपयाची विकास कामे केल्याचे सांगितले. लोकसभा निवडणुकीत आ.बंब यांनी गंगापूर तालुक्यातुन सर्वाधिक मताधिक्य दिल्यामुळे त्यांच्या विजयासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

## नांदेडमध्ये आज गोविंदा यांचा रोड शो

नांदेड : नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे उमेदवार आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या प्रचारासाठी सिने अभिनेते तथा शिवसेनेचे नेते माजी खासदार गोविंदा यांचा आज दिनांक १० नोव्हेंबर रोजी नांदेड शहरात रोड शो होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाच्या उर्वरित संपूर्ण शाश्वत विकासासाठी आ. बालाजीराव कल्याणकर हे पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात आहेत . शिवसेना महायुतीकडून आमदार कल्याणकर यांच्या प्रचाराचा जोरदार धडाका उडला असतानाच शिवसेनेचे नेते तथा सिने अभिनेते गोविंदा हे आज दिनांक १० नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता आमदार बालाजी कल्याणकर यांच्या संपर्क कार्यालयापासून ते मालेगाव रोड , भावसार चौक ,तरोडा नाका , राज कॉर्नर , वर्कशॉप , श्रीनगर आयटीआय , शिवाजीनगर या मार्गावर रोड शो करणार आहेत. यावेळी नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे उमेदवार आ. बालाजीराव कल्याणकर यांच्यासह अनेक नेते उपस्थित राहणार आहेत.

# पाकिस्तानच्या क्वेटा रेल्वे स्थानकावर बॉम्बस्फोट!

### २१ जणांचा मृत्यू; मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता



पाकिस्तान : पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील क्वेटा रेल्वे स्थानकावर आज भीषण बॉम्बस्फोट झाला. यामध्ये २१ जणांचा मृत्यू झाला असून ३०हून अधिक लोक जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज पाकिस्तानच्या क्वेटा रेल्वे स्थानकावरील बुकिंग कार्यालयात बॉम्बस्फोट झाला. यावेळी सकाळी ९ वाजेच्या सुमारास जाफर एक्स्प्रेस पेशावरसाठी रवाना होणार होती. त्यामुळे घटनास्थळी प्रवाशांची मोठी गर्दी होती. क्वेटामध्ये एकामागोमाग दोन स्फोट झाले. पहिल्या स्फोटामध्ये चार लोकांचा मृत्यू झाला असून दुसऱ्या स्फोटामध्ये १५ ते १६ जणांचा मृत्यू झाला. तसेच अनेक जण जखमी झाले झाले आहेत.

दरम्यान, या स्फोटामध्ये जखमी झालेल्यांना तात्काळ नजीकच्या रुग्णालयामध्ये हलवण्यात आले आहे. घटनास्थळावर युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे.

## प्रसिद्ध सारंगी वादक राम नारायण यांचे निधन

मुंबई : भारतीय संगीतकार प्रसिद्ध सारंगी वादक राम नारायण यांनी ९६व्य वर्षी अखेरचा श्वास घेतला आहे. ९ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध सारंगी वादक राम नारायण यांचं निधन झालं आहे. सारंगी वादक राम नारायण यांनी भारतीय संगिताला जागतिक पातळीवर प्रसिद्धी मिळवून दिली. आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्धी मिळवणारे ते पहिले भारतीय संगीतकार होते. पंडित या नावाने सारंगी वादक राम नारायण यांना ओळखलं जायचं. राम नारायण यांच्या निधनाने संगीत क्षेत्रासह बॉलिवूड इंडस्ट्रीवरही शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनावर अनेक कलाकारांनी दु:ख व्यक्त केलं आहे. २५ डिसेंबर १९२७ रोजी राम नारायण यांचा जन्म उत्तर-पश्चिम भारतातील उदयपूरजवळील आमेर गावात झाला. त्यांचे आजोबा हरलालजी बियावत आणि वडील नथुजी बियावत शेतकरी आणि गायक होते. नथुजी बियावत दिलरुबा वादक होते आणि नारायण यांची आई संगीतप्रेमी होती. त्यांचे आजोबा बगाजी बियावत हे आमेरचे गायक होते. राम नारायण आणि त्यांचे आजोबा सगड दानजी बियावत उदयपूरच्या महाराणाच्या दरबारात गायचे.

# खोट्याच्या माथी गोटा मारायला लाडक्या बहिणी सज्ज: एकनाथ शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ नोव्हेंबर**

महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या लबाड, खोटारड्या लोकांचा कळप चारी मुंड्या चीत करायचा असून या खोट्यांच्या माथी गोटा मारायला लाडक्या बहिणी सज्ज असल्याचा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. लोकसभा पोटनिवडणुकीचे उमेदवार व विधानसभा निवडणुकीतील भाजपा-महायुती उमेदवाराच्या प्रचारार्थ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची सभा आयोजित करण्यात आली या सभेत ते बोलत होते. या सभेस खासदार अशोक चव्हाण, खासदार अजित गोपछडे, खासदार हेमंत पाटील, संजय कौडगे, प्रवीण साले, मारोतराव कवळे यांच्यासह उमेदवार माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर, डॉ. संतुक हंबर्डे, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार भीमराव केराम, आमदार तुषार राठोड, आमदार राजेश पवार, आमदार जितेश अंतापुरकर, श्रीजया चव्हाण, बाबुराव कोहळीकर, आनंद बोढारकर यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यामुळे महाराष्ट्राच्या विकासासाठी बळ मिळाले आहे. जनधन योजना, उज्वला योजना अशा अनेक योजना राबवून राज्यातील जनतेला महायुतीने साथ दिली आहे. त्यामुळे निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराचा विजय निश्चित आहे. महायुती सत्तेत येणार असून विरोधकांना तोंड दाखवायला जागा राहणार नसल्याचे यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले. दिल्लीतील फुसके फटाके दिल्लीमध्ये आरक्षण रद्द करण्याची भाषा करत आहेत तर महाराष्ट्रात आल्यानंतर संविधान धोक्याचे असल्याचे सांगत गैरसमज निर्माण करत आहेत. परंतु जोपर्यंत सूर्य आणि चंद्र आहे तोपर्यंत



संविधानाला कोणीही हात लावू शकणार नाही. महाविकास आघाडी विकासाची पंचसूत्री तयार केली आहे परंतु हे पंचसुत्री देखील महायुतीचीच कॉपी असून त्यांची पंचसूत्री म्हणजे थापासुत्री आहे. लाडक्या बहिणींना सध्या दीड हजार रुपये देण्यात येत आहेत. परंतु महायुतीचे सरकार आल्यानंतर यात वाढ करून २ हजार १०० रुपये देण्यात येणार आहेत तर दुसरीकडे विरोधक तीन हजार देण्याची भाषा करत आहेत. परंतु त्यांचे हे आश्वासन खोटे असून राजस्थान, हिमाचल आणि कर्नाटकात खोटे आश्वासने देऊन त्यांनी जनतेची फसवणूक केली आहे. साठ वर्षात जो विकास झाला नाही तो विकास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केवळ दहा वर्षात करून दाखवला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या बळावर महाराष्ट्रातील कॉमन मॅनला अर्थिक सुपरमॅन करण्याचा महायुतीचा मानस आहे. दुष्काळमुक्त मराठवाड्यासाठी विविध योजना राबविण्यात येत असून भविष्यकाळात मराठवाडा दुष्काळमुक्त झाल्याशिवाय राहणार नाही असे आश्वासन देत या निवडणुकीत विरोधकांना गोदावरीचे पाणी पाजल्याशिवाय गप्प राहणार नसल्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

# महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येणार : उध्दव ठाकरे

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०९ नोव्हेंबर**

महाविकास आघाडीचे सरकार शेतकऱ्यांना कर्जमाफी, महिलांना सुरक्षा, मोफत शिक्षण तर राज्यात दशसुत्री योजना अंमलात आणली जाणार असल्याचे आश्वासन देत रात्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार असल्याचा विश्वास शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. महाविकास आघाडीचे उमेदवार एकनाथ पवार यांच्या प्रचारार्थ लोहा येथे आयोजीत जाहीर सभेत ते बोलत होते.

यावेळी शिवसेना सचिव मिलिंद नार्वेकर, तेजस ठाकरे, खा. शिवाजी काळगे, महाविकास आघाडीचे उमेदवार एकनाथ दादा पवार, माजी. आ. ईश्वरराव भोसीकर, लातुर संपर्क प्रमुख रोहिदास चव्हाण, बबनराव थोरात, सहसंपर्कप्रमुख मुक्तेश्वर धोंडगे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरद पवार गटाचे) जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर, दत्ता पाटील कोकाटे, उपजिल्हाप्रमुख संजय ढेपे, संजय भोसीकर, काँग्रेस तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार, कंधार बालाजी पांडागळे, संजय ढाले, नवनाथ चव्हाण, प्रभाकर पवार, सतिश देवकत्ते, नबी शेख आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, तालुक्यातील शिवसैनिकांची गद्दारांनी बोटे कापली. मनात आणलं तर गद्दारांना गाडण्याची शिवसेनेत ताकद आहे, हल्ला करणाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे, अन्यथा पोलीस बाजूला करा आम्ही त्यांना धडा शिकविण्याचा इशारा देत शिवसैनिकाची बोटे छाटणाऱ्यांचा बदला घेतल्याशिवाय स्वस्थ असणार नसल्याचे आव्हान उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिले. मिंधेंनी गद्दारी केली गद्दारांच्या युतीत ईडी, सिबीआय, असल्यामुळे येणाऱ्या २० तारखेला महाराष्ट्रातील जनता त्यांना तडीपार करून टाकेल. महाराष्ट्रात शासकीय यंत्रणेचा गैरवापर सुरू आहे. जसा शिवसेना पक्ष चोरला त्याच पद्धतीने लोहा कंधार मतदारसंघात एकनाथ पवार नाव सुद्धा चोरले. महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार हे लुटारू सरकार आहे. या निवडणुकीत महाराष्ट्रातील



जनता त्यांना धडा शिकवेल. खरा काळोख भाजपात आहे, शिवसेनेत तर मशाल आहे मशाल ही उजेड देऊन रस्ता दाखवते. पंधराशे रुपयांनी घर चालते का? पंधराशे रुपये महत्त्वाचे की आपले रक्षण महत्त्वाचे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर महिलांसाठी स्वतंत्र पोलीस ठाणे उभारू तसेच तीन हजार रुपये देऊ असे आश्वासन दिले. सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम देऊन महाराष्ट्रातील सर्व मुलांना मोफत शिक्षण देणार, महाराष्ट्र हा औद्योगिक क्षेत्रात पुढे जाणारे राज्य आहे. महाराष्ट्रातील उद्योग गुजराती चोरतात महाराष्ट्रातील तरुणांची रोजी रोटी चोरतांना सत्ताधाऱ्यांना लाज वाटत नाही का ? स्वतःचं ठेवायचं झाकून आणि दुसऱ्याच पहायच वाकून ही त्यांची नीती आहे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यांनतर महागाईचे दर पाच वर्षे स्थिर ठेवणार, शेतकऱ्यांना कर्जमुक्ती, महिलांना सुरक्षा, मोफत शिक्षण, रोजगार अशा दशसुत्री योजना अमलात आणणार असल्याचे सांगत कै.खा. वसंतराव चव्हाण यांचे वारस रविंद्र चव्हाण व लोहा विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे उमेदवार एकनाथ पवार यांना विजयी करा असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी केले.

यावेळी खंडू पाटील पवार, सुरेश पाटील, योगेश नंदनवनकर, साहेबराव काळे, रुद्रा भोस्कर, चेतन पवार, कैलास पवार, संतोष वडवळे, मोतीराम पवार, बालाजी परदेशी, बालाजी पवार, दिगांबर उगिले यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### कृष्णा शिरंजीपालवार विभागीय क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला

**नायगाव**-तालुक्यातील जनता ज्युनियर कॉलेज मधील कृष्णा माधवराव शिरंजीपालवार या विद्यार्थ्यांने १९ व्या वयोगटातून घेण्यात आलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धेतील उंच उडी व तिहेरी उडी मध्ये प्रथम क्रमांक येण्याचा बहुमान मिळविला आहे. गेल्या अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर जिल्ह्यातील मुख्य पोलीस परेड मैदानावर मागील दोन-तीन दिवसांपूर्वी विभागीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी तालुक्यातील नरसी येथील माधवराव शिरंजीपालवार यांचे सुपुत्र व जनता ज्युनियर कॉलेज मधील विद्यार्थी कृष्णा माधवराव शिरंजीपाल वार या विद्यार्थ्याने १९ वर्षीय वयोगटातून दिनांक.५/११/२० २४ रोज मंगळवारी सकाळी घेण्यात आलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धे त उंच उडी,तिहेरी उडी(ट्रिपल जंप) मध्ये प्रथम येण्याचा बहुमान मिळविला असून. जनता ज्युनिअर.कॉलेजचे. प्राचार्य के.जी.सुर्यवंशी यांनी विभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये यश संपादन केलेला विद्यार्थी कृष्णा माधवराव शिरंजीपालवार व मार्गदर्शक ज्ञानेश्वर बैस सरांचे पुष्पगुच्छ देवून या वेळी गौरविण्यात आले. पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कृष्णा माधवराव शिरंजीपालवार यांनी विभागीय क्रीडा स्पर्धेत मिळविलेल्या यशाबद्दल माधवराव शिरंजीपालवार चे कॉलेज मधील शिक्षक वृंदा कडून व नरसीसह पंचक्रोशी तील माधवराव शिरंजीपालवार वर आप्त स्नेही व मित्र गोविंद टोकलवाड, आनंदा सुर्यवंशी सह,अनेक मान्यवर मंडळी कडून शुभेच्छांचा वर्षा होत आहे.

### किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यात २० खरेदी केंद्र

**नांदेड**-केंद्र शासनाचे किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत एनसीसीएफच्यावतीने नांदेड जिल्ह्यात खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये हमीभावाने मूग, उडीद, सोयाबीन खरेदीसाठी १ ऑक्टोबर २०२४ पासून ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी २० खरेदी केंद्र निश्चित केले आहेत. तरी शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्रीसाठी खरेदी केद्रावर आणण्यापूर्वी आर्द्रताचे प्रमाण १२ टक्केपर्यतच असावे व सोयाबीन एफएक्यु दर्जाचा असावा, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी राजेश हेमके यांनी केले आहे. प्रत्यक्षात मुग, उडीद खरेदी १० ऑक्टोबर व सोयाबीन खरेदी १५ ऑक्टोबर २०२४ पासून सुरु झालेली आहे. मुखेड तालुका खरेदी विक्री संघ, मुखेड, हदगाव तालुका खरेदी विक्री संघ हदगाव, लोहा तालुका खरेदी विक्री संघ लोहा, कृषि उत्पन्न बाजार समिती, किनवट, तालुका खरेदी विक्री संघ बिलोली (कासराळी), पंडीत दीनदयाळ उपाध्याय अभिनव सह. संस्था देगलूर, मण्णेश्वर फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. धनज ता. मुखेड, सिद्राम फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. बेटमोगरा ता. मुखेड, किनवट तालुका कृषिमाल प्रक्रीया सह. संस्था गणेशपूर ता. किनवट, तिरुपती शहापूर फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. वन्नाळी ता. देगलूर, राधामाई फार्मर प्रोड्युसर कंपनी रातोळी ता. नायगाव, अष्टविनायक शेतीमाल खरेदी विक्री सह. संस्था मानवाडी फाटा ता. हदगाव, श्रीजगदंब फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. जांब बु. ता. मुखेड, नांदेड जिल्हा फळे व भाजीपाला सह खरेदी विक्री संस्था नांदेड ता. अर्धापूर, कुंडलवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी कुंडलवाडी ता. बिलोली, बळीराम पाटील फळे व भाजीपाला प्रक्रिया सहसंस्था मुखेड बेरली खुर्द ता. मुखेड, मुखेड फळे व भाजीपाला उत्पादक सहसंस्था उमरदरी ता. मुखेड , जय महाराष्ट्र शेतीमाल खरेदी विक्री सहकारी संस्था कौठा ता. कंधार, नांदेड प्रगती ग्रो प्रोड्युसर कंपनी चेनापूर ता. धर्माबाद, स्वामी विवेकानंद अभिनव सहकारी संस्था मर्या शेळगावथडी ता. धर्माबाद याठिकाणी मार्केटीग फेडरेशनमार्फत मुग, उडीद, सोयाबीन ऑनलाईन शेतकरी नोंदणी सुरु झालेली आहे.

# विधानसभा मतदारसंघात लोकसभा व सार्वत्रिक विधानसभेचे उद्याला गृहमतदान

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. ०९ नोव्हेंबर**

राज्यात सध्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीची जोरदार हालचालीची सुरुवात झाली असुन. त्याअनुषंगानेच भारतीय निवडणुक आयोगाने राज्यातील ८५ वयोगटातील जेष्ठ, दिव्यांग व्यक्ती देखील मतदान प्रक्रिये पासून कोणी वंचित राहू नये या करिता भारतीय निवडणूक आयोगाने घेतलेल्या आदेशान्वये नांदेड लोकसभा पोटनिवडणूकीचे व सार्वत्रिक नायगांव विधान सभा निवड णुकीचे उद्याला ८९ नायगांव विधानसभा मतदार संघात गृह मतदान होणार राज्यात सध्या होऊ घातलेल्या सार्वत्रिक विधानसभेच्या निवडणुकीचे वारे जोरदारपणे वाहत असून. त्या अनुषंगाने भारतीय निवडणूक आयोगाने देखील काळानुसार निवडणूक प्रक्रियेमध्ये थोड्याफार प्रमाणात बदल केला आहे. राज्यातला ८५ वयोगटातील वयोवृद्ध तथा ज्येष्ठ व्यक्ती अथवा दिव्यांग व्यक्ती देखील मतदानाच्या पासून वंचित राहू नये. व राज्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये ८९ नायगांव विधानसभा मतदारसंघा तील निवडणूक निर्णय अधिकारी सौ. स्वाती दाभाडे.व तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी सौ. धम्मप्रिय गायकवाड यांनी यावेळी माहिती दिली आहे.

# व्हाईस मेसेजेस, बल्क मेसेजेससाठी परवानगी अनिवार्य

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ नोव्हेंबर**

प्रचाराच्या अंतिम काळामध्ये कोणत्याही उमेदवाराने ऑडीयो, व्हिडीओ मेसेज प्रसारित करण्यापूर्वी एमसीएमसी समितीची परवानगी घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात कार्यरत असणाऱ्या एजन्सी तसेच उमेदवारांनी ही बाब लक्षात घ्यावी. विनापरवानगी इलेक्ट्रानिक्स फॉरमॅटमधील कोणत्याही प्रसिध्दी साधणाचा व प्रसिध्दी तंत्राचा वापर करण्यावर निवडणूक आयोगाने प्रतिबंध केला आहे. याचा फटका उमेदवाराच्या खर्चाच्या ताळमेळाला बसू शकतो.

निवडणुकीसाठी नियुक्त खर्च निवडणूक विभागाकडून यासंदर्भात सूचना जारी झाल्या आहेत. उमेदवाराच्या खर्चासंदर्भातील पहिली बैठक झाली असून याबैठकामध्ये प्रसिध्दी विषयक कोणतेही साहित्य वापरताना माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती परवानगी अनिवार्य असल्याचे स्पष्ट केले आहे.

**पक्षांनी या बाबींची परवानगी घ्यावी**

राजकीय पक्ष व उमेदवारांनी दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क, केबल वृत्तवाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्ड केलेले व्हॉईस मेसेजेस, सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळे यावर दर्शविण्याच्या सर्व जाहिरातीची परवानगी घेणे आवश्यक आहे.



नांदेड- खासदार अशोक चव्हाण व उमेदवार डॉ. संतुक हंबर्डे यांच्याशी चर्चा करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी.

# सारखणी येथे कान्हूसती माता यात्रा महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि.०९ नोव्हेंबर**

आदिवासी बहुल किनवट व माहूर या दोन्ही तालुक्याच्या मध्यस्थानी तथा मराठवाडा व विदर्भ या विभागासह तेलंगाना या राज्याला जोडणारा एक महत्त्वाचा जंक्शन पॉईंट म्हणून ओळखला जाणाऱ्या किनवट तालुक्यातील सारखणी येथील असंख्य भाविकांची कुलदैवत असलेल्या आदिशक्ती कान्हूसती माता देवस्थान येथे अखिल भारतीय बेलदार ओड समाज किनवट-माहूर तालुक्याच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही दि.११ ते १३ नोव्हेंबर दरम्यान भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

सारखणी येथील माता कान्हूसती देवीचे मंदिर हे आदिवासी ओड समाजाची कुलदैवत असून, एक जागृत देवस्थान म्हणून सर्वदूर ओळखले जाते.राज्याच्या नांदेड, हिंगोली या मराठवाड्यातील जिल्ह्यासह विदर्भातील यवतमाळ, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, अमरावती, गोंदिया या जिल्ह्यातूनच नव्हे तर, छत्तीसगड, तेलंगणा या शेजारच्या राज्यातूनदेखील कान्हूसती मातेचे दर्शन घेण्यासाठी केवळ आदिवासी बेलदार ओड समाजातीलच नव्हे तर, हिंदू धर्मातील शेकडो भाविकांची याठिकाणी वर्दळ सुरू असते. दरवर्षी कान्हूसती माता देवस्थान येथे कार्तिक महिन्यात



बेलदार ओड समाजाच्यावतीने यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.यावर्षी ही यात्रा कार्तीक शु.१० शततारका सोमवार दि.११ ते कार्तीक शु.१२ रेवती प्रदोष बुधवार दि. १३नोव्हेंबर अर्थात विठ्ठल नवरात्रांभ, प्रबोधनी एकादशी ते तुलसी विवाहारंभ चातुर्मास्य समाप्ती या पवित्र कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. यानिमित्ताने महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प कु. कांचनताई शेळके यांचा काल्याच्या किर्तनाचा समाज प्रबोधनाचा कार्यक्रम होणार आहे. तसेच यात्रेत सलग तीन दिवस भजन, कीर्तन, होमहवन, सत्संग, काकडा, भजन, महाप्रसाद, भंडारा व सतीमाता ज्योत असे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार असून, त्यात दि.११ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजल्यापासून भजन व काकडा भजन होणार आहे. १२ रोजी सतीमातेच्या पुण्यतिथी निमित्त काकडा भजन,होमहवन,मातेच्या चरण पादुकापूजन, सत्संग भजन व किर्तनकार मंडळींचा भजन किर्तनाचा कार्यक्रम होणार आहे.१३ला स.काकडा भजन होईल. नंतर स.७ ते ११ या वेळेत शिवमाऊली संगीत संच माळबोरगाव यांचा गीत-गायनाचा कार्यक्रम होईल.

त्यानंतर स.११ ते दुपारी ११:३० वाजेपर्यंत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार होणार आहे.११:३० ते दुपारी २:०० वाजे पर्यंत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध हरिभक्त पारायण कुमारी कांचन ताई शेळके यांच्या काल्याच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तर दुपारी २:३० वा सतीमाता ज्योत व काल्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान, सकाळ पासून भव्य महाप्रसाद भंडारा या मुख्य कार्यक्रमाचे आयोजन होणार आहेत. यात्रेच्याअनुषंगाने गोरगरीब नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने मोफत रक्त गट तपासणी, रक्तदाब तपासणी, शुगर तपासणी निःशुल्क शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविक भक्त व नागरिकांनी या यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन या पवित्र कालावधीतील मातेच्या दर्शनाचा व त्यानिमित्ताने आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा!असे आवाहन बेलदार-ओड समाज किनवट -माहूर तालुक्यासह अखील भारतीय समस्त बेलदार ओड समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

# मंगळवारी हदगाव मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्चाची द्वितीय तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ नोव्हेंबर**

हदगाव मतदार संघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची द्वितीय तपासणी मंगळवार १२ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ५ या कालावधीत पंचायत समिती सभागृह, तहसिल कार्यालय परिसर हदगाव येथे होणार आहे. या तपासणीसाठी उमेदवारांनी किंवा त्याच्या प्रतिनिधींनी निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा हिशोब खर्च निरीक्षकासमोर सादर करणे आवश्यक आहे .

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम , १९५१ च्या कलम ७७ नुसार निवडणुकीच्या वेळेस प्रत्येक उमेदवार एकतर तो स्वत: किंवा त्याच्या, तीच्या निवडणूक प्रतिनिधीद्वारे त्याला, तीला नामनिर्देशित करण्यात आले आहे. त्या दिनांकापासून निवडणुकीच्या निकाल लागण्याच्या दिनांकापर्यत दोन्ही दिनांक धरुन, त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेला किंवा प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवणे आवश्यक आहे.

तपासणीस अनुपस्थित राहणारे उमेदवार भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार कार्यवाहीस पात्र असतील तसेच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब ठेवणे व दाखल करण्याच्या कायद्याच्या आवश्यकतांचे अनुपालन करण्यात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने कसूर केल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम १० क अन्वये तो निवडणूक आयोगाकडून तीन वर्षाच्या कालावधीसाठी निरर्ह ठरविण्यास पात्र असेल यांची नोंद घ्यावी असे ८४-हदगाव विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# तिरंग्याच्या साक्षीने नांदेडकरांनी घेतली मतदानाची शपथ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ नोव्हेंबर**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक आणि नांदेड लोकसभा पोट निवडणुकीच्या मतदार जागृतीच्या संदर्भाने स्वीप कार्यक्रमांतर्गत अवर सचिव तथा उपमुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनुसार ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता मतदार जनजागृती कार्यक्रमाची राज्यस्तरीय लॉन्चिंग मुंबई येथे झाली. त्याअनुषंगाने जिल्हा प्रशासन व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या वतीने जिल्हास्तरीय मतदार जागृती आणि शपथ घेण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

व्हीआयपी रोड वरील तिरंगा ध्वज कॉर्नरवर एका भव्य कार्यक्रमात केंद्रीय निवडणूक निरीक्षक श्रीमती बी.बाला मायादेवी, जिल्हाधिकारी



अभिजीत राऊत, नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, महानगरपालिका आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे यांनी उपस्थित जनसमुवेत समुदायाला मतदानाची शपथ दिली. यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी उपस्थितांना तिरंगा ध्वजाच्या साक्षीने मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे आवाहन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी ललित कुमार वराडे, जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी माधव सलगर, दिलीप बनसोडे, नांदेड शहर वाघाळा महानगरपालिकेचे उपायुक्त सुप्रिया टवलारे, अजितपालसिंघ संधू, ज्येष्ठ नागरिक अशोक तेरकर, प्रभारी उपायुक्त संजय जाधव, मनीषा नरसाळे, सहाय्यक आयुक्त गुलाम सादिक, शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी, विभाग प्रमुख प.ला. आलूरकर, महेंद्र पवार, सदाशिव पतंगे, मिर्झा बेग, निलावती डावरे, रावण सोनसळे, रमेश चवरे हे उपस्थित होते.

यावेळी शाहीर रमेश गिरी आणि साहेबराव डोंगरे यांच्या संचाने मतदान जागृतीची गीते सादर करून उपस्थितांचे प्रबोधन केले. या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते सेल्फी पॉईंट आणि स्वाक्षरी मी मतदान करणारच या स्वाक्षरी फलकाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. तसेच तरुण व दिव्यांग मतदारांच्या हस्ते पहिल्यांदा स्वाक्षरी करून स्वाक्षरी मोहिमेची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महानगरपालिकेचे वरिष्ठ सहाय्यक साईराज मुदिराज, संदीप लबडे, संजय ढवळे, आशा घुले, सारिका आचमे, माणिक भोसले यांच्यासह जिल्हास्तरीय स्वीप कक्षाचे कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले. यावेळी शहरातील नागरिक, तरुण व दिव्यांग मतदार तसेच महिला मतदार बहुसंख्येने उपस्थित होते.

# महायुतीच्या उमेदवारास जाहीर पाठिंबा: माजी खा. वानखेडे

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ०९ नोव्हेंबर**

हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदार संघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार संभाराव उर्फ बाबुराव कदम कोहळीकर यांना माझा जाहीर पाठिंबा राहील तसेच त्यांना निवडून आणण्यासाठी परिश्रम घेऊन माझे मतदारसंघातील कार्यकर्ते, हितचिंतक हे महायुतीच्या उमेदवार निवडून आणण्यासाठी अथक मेहनत घेतल्या जाणार असल्याचे प्रतिपादन माजी खा. सुभाष वानखेडे यांनी त्यांच्या निवासस्थानी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत आपले मत व्यक्त केले तर यावेळी शिवसेना (उबाठा) पक्षावर चौफेवर टीका करत पैसे घेऊनच उमेदवारी वाटल्याचा आरोप या वेळेस करण्यात आला. पुढे बोलताना वानखेडे म्हणाले की, शिवसेना पक्षात खरे बोलणाऱ्यांची किंमत आता राहिलेली नाही जे खरे बोलतो त्यांना बाहेरचा रस्ता दाखवला जातो आज माझ्या बाबतीत पण तेच घडले असून शिवसेना पक्ष



आता पूर्वीसारखी राहिले नसून पक्षात उमेदवारी पैसे घेऊनच दिल्या जात असून २०२४ च्या पार पडलेल्या लोकसभेत काँग्रेस पक्ष आणि मुस्लिम समाजाने एकगठ्ठा मतदान केल्याने शिवसेना पक्षाचे खासदार निवडून आले असून याचा विसर उद्धव ठाकरे यांनी करू नये तसेच होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत नांदेडसह हिंगोली, परभणी, लातूर या जिल्ह्यात शिवसेना (उबाठा) पक्षाचे अस्तित्व निरंक राहणार असल्याचेही त्यांनी यावेळेस म्हणाले.

सोलापूर तरुण भारत न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## निवडणुका पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे - सिद्धाराम सालीमठ



अहिल्यानगर दि.९- विधानसभा निवडणूक प्रक्रिया राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी नीटपणे समजावून घेणे गरजेचे असून निवडणुका पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस उप जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील, ईव्हीएम समन्वयक शारदा जाधव आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले, रविवारपासून मतदान यंत्रावर उमेदवारांचे चिन्ह टाकण्यास सुरूवात होईल. त्यानंतर मतदान यंत्र सीलबंद करून स्टाँगरूममध्ये ठेवण्यात येतील. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत स्ट्राँगरूम १९ नोव्हेंबर रोजी उघडून मतदान यंत्र मतदान केंद्र पथकांना देण्यात येतील. मतदानाच्यादिवशी अभिरूप मतदन झाल्यावर प्रत्यक्ष मतदानास सुरूवात होईल. ही संपूर्ण सर्वसमावेशक आणि पारदर्शक असावी यासाठी राजकीय पक्षांचे सहकार्य आवश्यक आहे. राजकीय पक्षांच्या किंवा उमेदवारांच्या प्रतिनिधींनी प्रत्येकवेळी प्रक्रियेवर लक्ष ठेवावे आणि काही शंका असल्यास वेळीच संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घ्यावी. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया मुक्तपणे आणि पारदर्शकपणे पार पाडण्याचे प्रशासनाचे प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. श्रीमती जाधव यांनी मतदान आणि मतमोजणी प्रक्रियेतील विविध टप्प्यांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

# भाजपाला मत म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मत : डॉ. संतुकराव हंबर्डे



नांदेड- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अखंड भारत , सुरक्षित भारत , दहशतवाद मुक्त भारत , भ्रष्टाचार मुक्त भारत , सुरक्षित भारत , प्रगत भारत या संकल्पना मूर्त रूपात साकारल्या जात आहेत . जागतिक पातळीवर भारताचे नेतृत्व संपूर्ण जगाने मान्य केले असून भारत जागतिक महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत असताना देशातील अंतर्गत विकास झपाट्याने होत आहे मात्र नांदेड जिल्ह्याचा विकास होण्यासाठी आपला खासदार असणे आवश्यक आहे. यासाठी होऊ घातलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत भाजपा महायुतीचा मी उमेदवार आहे त्यामुळे कमळ या निशाणी समोर बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करा .आपले भाजपाला मत म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मत होय असे प्रतिपादन भाजपाचे लोकसभेचे उमेदवार डॉ. संततुकराव हंबर्डे यांनी व्यक्त केले.

मगनपुरा येथील बालाजी मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या अन्नछत्राच्या कार्यक्रमास उपस्थित राहून त्यांनी भावीक भक्तांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते .

पुढे बोलताना डॉक्टर संतुकराव हंबर्डे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात तिसऱ्यांदा भाजपाचे सरकार आले आहे. काँग्रेस महाविकास आघाडीने भाजपाला बदनाम करण्याचा घाट घातला होता. भाजपा सत्तेत आल्यास संविधान बदलेल. देशातील आरक्षण संपुष्टात येईल असा चुकीचा अपप्रचार केला होता. मात्र या देशातील सुजान जनतेने काँग्रेस महाविकास आघाडीचे मनसुबे उधळून लावून तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांना स्वीकारले आहे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाच्या सर्वांगीण विकास होत असताना नांदेड साठी विकास निधी खेचून आणणारा आपला हक्काचा माणूस खासदार नाही. त्यामुळे आपल्याला विकास निधी पासून वंचित राहावे लागत आहे. ही बाब लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नांदेडकडे लक्ष असावे आणि नांदेड साठी त्यांनी भरव असा निधी उपलब्ध करून द्यावा असे वाटत असेल , देशाबरोबर आपल्या नांदेडचा सर्वांगीण विकास व्हावा असे वाटत असेल तर होत असलेल्या लोकसभेच्या पोटनिवडणूक भारतीय जनता पार्टीला प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी केले.

## सोनी सब वाहिनीवर प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे ऐतिहासिक मनोरंजक मालिका तेनाली रामा

सोनी सब वाहिनीने टेलिव्हिजनवर महान तेनाली रामाच्या पुनरागमनाची घोषणा केली आहे. या डिसेंबरमध्ये 'तेनाली रामा' ही मालिका सुरू होत आहे. ही मालिका तेनाली रामा या कुशाग्र बुद्धीच्या व्यक्तिमत्त्वाची आठवण ताजी करेल. जीवनातील कठीण प्रसंगातील त्याच्या प्रसंगावधानाचे कौतुक करेल. एकेकाळी विजयनगरच्या राजाचा सल्लागार असलेला तेनाली आता एक पतित नायक आहे. त्याला बहिष्कृत करण्यात आले आहे आणि लोकांच्या रोषाचा त्याला सामना करावा लागत आहे. आपली कुशाग्र बुद्धिमत्ता, विनोद बुद्धी आणि आकर्षक स्वभाव याबद्दल ओळखल्या जाणाऱ्या तेनालीला आपला उद्देश गवसतो आणि एका घोंघावणाऱ्या संकटातून राज्य वाचवण्यासाठी तो पुन्हा विजयनगरात येतो. केवळ चातुर्य नाही तर अनेक गुणांनी संपन्न असलेला तेनाली सहानुभूती आणि भावनात्मक गहनता घेऊन परतला आहे, ज्यामुळे आता तो पूर्वीपेक्षाही जास्त गुणवान आणि समर्थ झाला आहे!

## आचारसंहिता भंगाच्या ३७३४ तक्रारी निकाली; ३९८ कोटी ४० लाख रुपयांची मालमत्ता जप्त

मुंबई, दि. ९ : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ साठी १५ ऑक्टोबर ते ९ नोव्हेंबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी-व्हिजिल ॲपवर एकूण ३७६४ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ३७३४ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी-व्हिजिल ॲप हे कोणत्याही पस्टोअरमधून डाऊनलोड करता येते. या पद्वारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते. राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, अंमली पदार्थ व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत एकूण ३९८ कोटी ४० लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. आचारसंहितेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ मतदानासाठी १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य


मुंबई, दि. ९ : विधानसभा निवडणूकीसाठी २० नोव्हेबर २०२४ रोजी मतदान होणार असून मतदान करण्यासाठी, ज्या मतदारांचे मतदार यादीत नाव आहे अशा मतदारांकरिता भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. १२ प्रकारच्या ओळखपत्रापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदान करता येणार आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ज्या मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र आहे, ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. जे मतदार छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत, अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्रा व्यतिरिक्त १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

मतदानावेळी मतदारांना दिलेले निवडणूक ओळखपत्र नसल्यास १२ प्रकारच्या पुराव्यांमध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. अनिवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.

एखाद्या मतदाराने मतदार यादीतील आपल्या पत्त्यात बदल केला असेल, पण त्याला अद्याप नवे ओळखपत्र मिळाले नसेल तर आधीचे ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल. मात्र त्या व्यक्तीचे नाव विद्यमान पत्यासह मतदार यादीत असणे आवश्यक आहे. तसेच सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदान दिनांकाच्या किमान पाच दिवस आधी मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ आदी माहितीच्या चिठ्ठ्यांचे निवडणूक कार्यालयाकडून वितरण केले जाईल. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती - चिठ्ठी आणि छायाचित्र ओळखपत्रासोबत घेऊन यावे, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

## अहमदनगर शहर मतदारसंघात १३३ मतदारांचे गृहमतदान





अहिल्यानगर दि.९- विधानसभा निवडणूक अंतर्गत अहमदनगर शहर मतदारसंघात गृहमतदानासाठी सहमती दर्शविलेल्या १४३ मतदारांपैकी १३३ मतदारांनी गृहमतदान केले. उर्वरीत १० पैकी दोघांचा मृत्यू झाला असून ३ पुणे येथे रुग्णालयात उपचार घेत असल्याने त्यांचे गृहमतदान होवू शकले नाही. इतर ५ मतदारांकडे मतदान पथक रविवारी जाणार आहे. निवडणूक निरीक्षक ताई काये आणि निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील यांनी गृहमतदान प्रक्रियेची पाहणी केली. यावेळी सहा निवडणुक अधिकारी श्री संजय शिंदे आणि समन्वयक अधिकारी सपना वसावा उपस्थित होते. ८५ वर्षपेक्षा अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी निवडणूक आयोगातर्फे ही सुविधा देण्यात आली आहे

## डॉ. छाया महाजन यांच्या 'डोईचा पदर'ला निर्मला मठपती फाउंडेशनचा पुरस्कार



छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

प्रख्यात लेखिका डॉ. छाया महाजन यांच्या 'डोईचा पदर आला खांद्यावरी' या कादंबरीला सोलापूर येथील मठपती फाऊंडेशनचा वाङ्मय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप असल्याची माहिती फाउंडेशनच्या अध्यक्षा शिवांजली स्वामी यांनी दिली.

पुरस्काराचे वितरण रविवार, १० नोव्हेंबर रोजी सोलापूरमधील शिवस्मारक येथे होणार आहे. अध्यक्षस्थानी सोलापूर साहित्य परिषदेच्या अध्यक्षा डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. सुहास पुजारी राहणार आहेत. यावेळी प्रा. डॉ. राजशेखर शिंदे उपस्थित राहणार आहेत, असे फाऊंडेशन सचिव उत्तरेश्वर मठपती यांनी कळविले आहे. फाउंडेशनच्या वतीने दरवर्षी विविध वाङ्मय प्रकारांना पुरस्कार दिले जातात. पुरस्कारासाठी कादंबरी, ललित लेखसंग्रह, बाल कथासंग्रह / बाल कादंबरी या वाङ्मय प्रकारासाठी साहित्य पाठवण्याचे आवाहन करण्यात आले होते.

## एअरक्राफ्ट कॅरियरमध्ये बसण्याचे आपले स्वप्न : बच्चन

छत्रपती संभाजीनगर - या आठवड्यात सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवरील कौन बनेगा करोडपती या अत्यंत लोकप्रिय ज्ञान-आधारित गेम शो मध्ये 'केबीसी ज्युनिअर्स' अंतर्गत ८ ते १५ वयोगटातील छोटे उस्ताद हॉट सीटवर दिसतील. यापैकी एक आहे आसामहून आलेली तृती रंजना. या छोट्या मुलीची स्वप्नं खूप मोठी आहेत आणि परिश्रम करण्याची तिची तयारीही आहे. खेळात आपली हुशारी तर तिने दाखवलीच आणि त्याचबरोबर तिच्या मनातील देशभक्ती आणि भारतीय नौकादलात काम करण्याचे स्वप्न देखील शेअर केले. त्याने प्रभावित होत श्री. बच्चन उद्गारले, वा! छोट्या मुलांमध्ये इतके स्पष्ट व्हिजन आणि अशी स्वप्ने क्वचितच दिसतात. खरोखर, देशाची सेवा करण्याइतके उदात्त काम दुसरे कोणतेच नाही.


**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 106-Phulambri | Anuradha Atul Chavan | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | 5th JMFC Court, Aurangabad. RCC No. 1455/2023 Pending. | U/s. 143, 427 of IPC, Sec. 3 the prevention of damages of Public Property Act, 135 of Maharashtra Police Act. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 106- Phulambri**
**Place : Mumbai**
**Date : 08/11/2024**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 231 - Ashti | Suresh Ramchandra Dhas | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | 2nd Jt. CJJD & JMFC, Patoda, Beed. Pending. | U/s. 420, 465, 467, 468, 171, 120B, 109 of IPC, Sec. 13(1), (A), (B), 13 (2) of Prevention of Corruption Act, 1988. | Nil | Nil | Nil |
| 2. | | | Civil & Criminal Court, Ashti, Beed. SCC No. 203/2022 | U/s. 188, 269, 270 of IPC, Sec. 51(B) of Disaster Management Act-2005. | Nil | Nil | Nil |
| 3. | | | Chief Judicial Magistrate, Beed. RCC No. 141/2022 | U/s. 143, 147, 148, 149, 427, 448, 504, 506 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 4. | | | 1st Civil Judge J.D., JMFC, Shirur, Beed. SCC No. 104/2022 | U/s. 188, 269, 270 of IPC, Sec. 51(B) of Disaster Management Act-2005 & Sec. 2, 3, 4 of the Epidemic Diseases Act, 1897. | Nil | Nil | Nil |
| 5. | | | CJJD & JMFC, Beed SCC No. 12/2021 | U/s. 188, 269, 270 of IPC, Sec. 51 (B) of Disaster Management Act-2005. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 231- Ashti**
**Place : Mumbai**
**Date : 08/11/2024**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

## अग्रलेख...

# संविधानाची विटंबना आता तरी थांबवा...

लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीने 'संविधान खतरे में' म्हणून केंद्रातील मोदी सरकार आणि भाजपाविरुद्ध प्रचार म्हणण्यापेक्षा अपप्रचार केला होता. त्याचाच परिणाम म्हणा वा अन्य काही म्हणा भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते. त्यामुळे आपल्या अपप्रचारात इंडिया आघाडी काही प्रमाणात यशस्वी झाली होती. 'खोटं बोलं पण रेटून बोल' ही काँग्रेसची सुरुवातीपासूनचीच भूमिका राहिली आहे. आपल्या राजकीय स्वार्थासाठी काँग्रेसने देशातील बहुसंख्यक हिंदूंवर अन्याय करताना मुस्लिमांचे तुष्टीकरण केले होते. या धोरणाचा काही काळासाठी काँग्रेसला तात्पुरता फायदा झाला असला, तरी दीर्घकाळासाठी त्याचा फटकाही बसला. ज्या संविधान बचावच्या गोष्टी काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी (की विनोदी) पक्षनेते राहुल गांधी आज करीत आहेत, त्यांच्याच आजीने म्हणजे तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आपल्या कार्यकाळात संविधान पायदळी तुडवले होते. आपल्या राजकीय स्वार्थासाठी आणिबाणी लावत देशातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याची होळी केली होती. इंदिरा गांधींची निवडणूक अलाहाबाद उच्च न्यायालयाने रद्द ठरवली होती. त्यामुळे नैतिकता म्हणून इंदिरा गांधींनी पंतप्रधानपदाचा राजीनामा देणे अपेक्षित होते. पण सत्तेच्या मोहापायी पंतप्रधानपदाचा राजीनामा देण्याची तयारी नसल्यामुळे इंदिरा गांधींनी आपल्या हुकूमशाहीचा वरवंटा फिरवत देशावर आणिबाणी लादली. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्यासह विरोधी पक्षांच्या सगळ्या नेत्यांना तुरुंगात डांबले. एवढेच नाही, तर सर्वसामान्य माणसाला जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरही निर्बंध लादले.

जवळपास १९ महिने संपूर्ण देशाचा तुरुंग बनवून टाकला. आपल्या विरोधकांना तुरुंगात डांबूनही इंदिरा गांधींचे समाधान झाले नाही. त्यांच्या छुप्या आशीर्वादाने तुरुंग कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी तसेच पोलिसांनी दुसऱ्या स्वातंत्र्याची लढाई लढणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांवर अनन्वित अत्याचार केले. वयोवृद्ध जयप्रकाश नारायणही यातून सुटले नाहीत. आज त्याच इंदिरा गांधींचा दिवटा नातू 'संविधान खतरे में' म्हणत देशभर फिरत बोंबा ठोकत आहे. हा प्रकार म्हणजे 'सौ चूंहे खां के बिल्ली हज को चली'सारखा म्हणायला हरकत नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर 'चोराच्या उलट्या बोंबा' असेही याला म्हणता येईल.

भाजपा असो की नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार त्यांनी घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नेहमी आदर आणि सन्मान केला आहे. मोदी यांचे सरकार २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासाठी जेवढे काम केले, त्याच्या पाच टक्केही काँग्रेसच्या शासनकाळात झाले नाही. संसद भवनापासून हाकेच्या अंतरावर असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर असो की राजधानी दिल्लीत उभारण्यात आलेली आणखी काही ऐतिहासिक स्वरूपाची स्मारके, ही मोदी सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाहिलेली आदरांजली म्हणायला पाहिजे.

काँग्रेसची भूमिका ही नेहमीच दलितविरोधी राहिली आहे. त्यामुळे काँग्रेसने अप्रत्यक्षपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विरोधच केला. डॉ. आंबेडकर लोकसभेत पोहोचू नये म्हणून कटकारस्थाने केली. भंडाऱ्यातील लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव केला. आज तीच काँग्रेस आणि त्याचे दिवटे नेते राहुल गांधी 'संविधान खतरे'ची जी बांग देतात, ते पाहून विचारी माणसाची तळपायातील आग मस्तकात गेल्याशिवाय राहात नाही. 'दहा माराव्या आणि एक मोजाव्या' असे म्हणतात, त्याची तातडीने अंमलबजावणी करावी, असे त्याला वाटल्याशिवाय राहवत नाही. माणसाच्या खोटे बोलण्यालाही मर्यादा असली पाहिजे. जनाची नसली तरी मनाची लाज राहुल गांधींना वाटायला पाहिजे. पण आपल्या कृतीने 'पप्पू' अशी प्रतिमा निर्माण केलेल्या राहुल गांधी यांना आपण जसे बोलतो, वागतो आणि करतो त्याचा अभिमान वाटतो. हा निर्लज्जपणाचा कळस म्हटला पाहिजे. देशातील जनतेने आणिबाणी लावल्याबद्दल काँग्रेसला अजूनपर्यंत माफ केले नाही आणि कधी करणारही नाही. तुम्ही सर्व माणसांना काही काळ, काही माणसांना सर्व काळ फसवू शकता, पण सर्व माणसांना सर्व काळ फसवू शकत नाही. शहामृगासारखे जमिनीत तोंड खुपसून बसलेल्या काँग्रेसच्या नेत्यांना याची जाणीव नाही. '...झाड उगवले तर सावलीच वाटते,' अशी काँग्रेस नेत्यांची भूमिका असते. तसे नसते तर त्यांनी पुन्हा एकदा संविधान सन्मान संमेलनाचे आयोजन केले नसते.

महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर शहराचे देशाच्या राजकारणात वेगळे महत्त्व आहे. शताब्दी वर्षात पदार्पण केलेल्या रा. स्व. संघाची स्थापना नागपुरात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षाही नागपुरात दीक्षाभूमीवर घेतली. त्याच शहरात काँग्रेसने दुसऱ्या एका बॅनरखाली संविधान सन्मान मेळाव्याचे आयोजन केले, पण याच मेळाव्यात राहुल गांधी यांनी भारतीय संविधानाची चेष्टा केली. भाषण करताना हातात लाल रंगाची एक चोपडी घेत संविधान म्हणून ते उपस्थितांसमोर मिरवले. प्रत्यक्षात आतून कोऱ्या पानांचे ते पुस्तक होते. मेळाव्याला उपस्थित सर्वांच्या हातातही असे कोरे संविधान होते. आपल्या या कृतीतून राहुल गांधी यांनी भारतीय संविधानाची विटंबना केली, खिल्ली उडवली, असे म्हणायला हरकत नाही. या फसव्या कृतीबद्दल आंबेडकरीच नाही तर देशातील सर्वसामान्य जनताही राहुल गांधी आणि काँग्रेसला कधीच माफ करू शकणार नाही. आपल्या या कृतीने राहुल गांधी यांनी शहरी नक्षलवादाचा एकप्रकारे प्रचार आणि पुरस्कार केला, हा भाजपाने केलेला आरोप नाकारता येण्यासारखा नाही. 'भाजपा की बात में कुछ दम है,' असे म्हणायला हरकत नाही.

महत्त्वाचे म्हणजे या संविधान सन्मान मेळाव्यापासून लोकशाहीतील चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माध्यमातील लोकांना जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आले. या मागचे कारणही हेच असावे. या मेळाव्यात असे काही घडणार होते वा घडवले जाणार होते, ते लोकांसमोर येऊ नये, अशी काँग्रेसची अपेक्षा असावी. त्यामुळे पत्रकारांना मेळाव्यात प्रवेश नाकारण्यात आला होता. मात्र, या घटनेचा आतापर्यंत पत्रकारांच्या एकाही संघटनेने निषेध केलेला दिसला नाही.

राहुल गांधी हे काँग्रेसच्या अडचणीच्या जागेचे दुखणे आहे. राहुल गांधींमुळे काँग्रेसचा आजपर्यंत कधी फायदा झाला नाही; झाले ते नेहमी नुकसानच. तरीपण काँग्रेसजनांचे डोळे उघडत नाहीत. राहुल गांधींनी आपल्या नेतृत्वात काँग्रेसला आजपर्यंत एकही निवडणूक जिंकून दिली नाही. अगदी ग्रामपंचायतीची निवडणूक राहुल गांधी जिंकून देऊ शकले नाही. राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेस एक पाऊल पुढे जाते तर दोन पावले मागे येते. म्हणजे राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेसची आगेकूच कधी झाली नाही तर नेहमीच पीछेहाटच होत राहिली आहे.

काँग्रेस आता देशात कधी सत्तेवर येऊ शकत नाही. किमान त्याने विरोधी पक्ष म्हणून तरी आपले स्थान कायम ठेवले पाहिजे. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षाचा दर्जा कायम राहील आणि विरोधी पक्षनेतेपद मिळेल, एवढ्या जागाही काँग्रेसला जिंकता आल्या नाहीत. २०२४ च्या निवडणुकीत सुदैवाने विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळेल तसेच विरोधी पक्षनेतेपदाचा दर्जा मिळेल, एवढ्या जागा काँग्रेसला मिळाल्या आहेत, त्याचे भान काँग्रेसने ठेवले पाहिजे. सकारात्मक बोलायचे तर कोणत्याही दृष्टीने लायक नसलेल्या राहुल गांधींना लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदाचा दर्जा मिळाला आहे; त्या पदाचा मानसन्मान तरी राहुल गांधींनी आपल्या कृतीने आणि उक्तीने राखला पाहिजे. राहुल गांधी आता विरोधी पक्षनेते अशा संवैधानिक पदावर आहे, त्यामुळे आपल्या कृतीने संविधानाचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अनादर होणार नाही, याची काळजी त्यांनी घेतली पाहिजे; नव्हे ती त्यांची संवैधानिक जबाबदारी आहे. देशवासीयांनी एवढी सामान्य अपेक्षा त्यांच्याकडून करायची का?

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# पूर्ण बहुमत!

अमेरिकेत 'तो' पुन्हा आला, आता महाराष्ट्रातही 'तो' पुन्हा येणार का? अशी चर्चा रंगू लागली आहे. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. प्रचार, आरोप-प्रत्यारोप जोरात सुरू झालेले आहेत. आश्वासनांची खैरातही मोठ्या प्रमाणात वाटण्यात येत आहे. उद्धव ठाकरेंनी प्रत्येक जिल्ह्यात शिवरायांचं मंदिर उभारण्याचं आश्वासन दिलं आहे, शरद पवारांनी आपल्या निवृत्तीचं पिल्लू सोडून भावनिक साद घातली आहे, राज ठाकरे पुन्हा जोमाने कामाला लागले आहेत आणि देवेंद्र फडणवीसांनी पूर्ण बहुमताची घोषणा केली आहे. युती आणि आघाडीकडूनही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा उघड करण्यात आलेला नाही. ज्यांना सरासरी जास्त जागा मिळतील त्यांना मुख्यमंत्रिपदाची खुर्ची मिळेल किंवा विभागून हे पद घेण्यात येईल. मात्र, युतीमध्ये फडणवीसांचा आत्मविश्वास पाहता यंदा भाजपाचा मुख्यमंत्री होईल, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. तर, दुसरीकडे राज ठाकरे यांनी आपण सत्तेत बसणार असल्याचे आत्मविश्वासाने जाहीर केले आहे. पहिल्यांदा सात प्रमुख पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरलेत आणि शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस फुटून दोन्ही गट एकमेकांविरोधात उभे ठाकले आहेत. अशा सर्व घटकांमुळे ही निवडणूक ऐतिहासिक ठरणार आहे.

लोकसभा २०२४ मध्ये निवडणुकीचा एक पॅटर्न तयार झाला होता. यास 'व्होट जिहाद' असं नाव देण्यात आलं होतं. हा व्होट जिहाद विधानसभेतही कायम राहणार आहे. या पॅटर्नमुळे विरोधकांवर टीकेची झोड उठवण्यात आली होती म्हणून यावेळी उघडपणे या समाजाला आवाहन करण्यात आलेलं नाही. तरीसुद्धा भाजपाला सत्तेपासून दूर ठेवायला हा समाज मोठ्या संख्येने मतदान करायला जाताना दिसेल. इथे हे पाहणं औत्सुक्याचं ठरेल की, ओवैसी या समाजाला कसे आकर्षित करतील? ओवैसींना देशात मुस्लिम नेता म्हणून नावारूपाला यायचं आहे. मात्र, त्यांची जिंकण्याची खात्री नसल्यामुळे आणि



सरकारमध्ये त्यांना स्थान नसल्यामुळे हा समाज काँग्रेस, ममता बॅनर्जी इत्यादी पक्षांना मोठ्या प्रमाणात मतदान करतो. राजकीयदृष्ट्या अत्यंत जागरूक असलेला हा समाज या निवडणुकीतही आपली ताकद दाखवेल. यावेळी महाराष्ट्रामध्ये आघाडीसमोर मोठे आव्हान असणार आहे. परिवर्तन महाशक्ती रिंगणात उतरल्यामुळे आघाडीला काही जागांवर फटका बसू शकतो. मनोज जरांगे पाटील यांनी माघार घेतल्यामुळे शरद पवारांनी त्यांचे आभार मानले असले, तरी या चालीमुळे मराठा समाजात संभ्रम निर्माण होऊ शकतो. कारण, हा समाज पाटील यांच्याकडे आशेने पाहत होता. निवडणुकीत हार-जीत होत राहते; पण लढणं गरजेचं असतं. त्यांनी जर ही निवडणूक लढवली असती तर त्यांना एक वेगळं राजकीय महत्त्व प्राप्त झालं असतं. असो...

लोकसभेच्या निकालामुळे आघाडीमध्ये चांगलाच आत्मविश्वास निर्माण झाला होता. मात्र, हरयाणाच्या पराभवानंतर काँग्रेसमध्ये संभ्रम निर्माण झाला. त्यामुळे त्यांना उबाठा गटाला डावलता आले नाही आणि त्यांच्या वाटेला फारशा जागा आल्या नाहीत. युतीमध्ये मात्र भाजपाला आपल्या पदरात चांगल्या जागा पाडून घेता आल्या आणि आपण मोठा भाऊ असल्याचे दाखवून दिले. त्यामुळे युतीचं सरकार आलं आणि भाजपाला १०० जागांचा आकडा पार करता आला तर यावेळी 'तो' पुन्हा येईल. भाजपाचा मुख्यमंत्री बसेल. एकनाथ शिंदे आणि अजित पवार असे दोन उपमुख्यमंत्री बसण्याची शक्यता आहे. दुसरीकडे राज ठाकरे आपण सत्तेत बसणार असल्याचे बोलत आहेत. युतीचं सरकार आलं आणि ठाकरेंना किमान १०-१५ आमदार निवडून आणता आले तर ठाकरे युतीत सहभागी होतील आणि त्यांच्या पदरात एक मंत्रिपद पडू शकतं. हे मंत्रिपद अर्थात बाळा नांदगावकर किंवा अमित ठाकरेंच्या वाटेला येईल. मात्र, राज ठाकरेंना किंगमेकर अशी भूमिका निभावता येणार नाही. कारण, जर भाजपाला १०० चा आकडा पार करता आला तर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस मिळून बहुमताचा आकडा गाठतील आणि देवेंद्र फडणवीस म्हणतात त्याप्रमाणे पूर्ण बहुमताचे सरकार स्थापन होईल.

लोकसभेमधील व्होट जिहाद आता विरोधकांवरच उलटणार आहे. व्होट जिहादचा नारा देऊन विरोधकांनी घोडचूक केली आहे. त्यामुळे त्यांनी पुन्हा एकदा हिंदू मतदारांना डिवचलं आहे तर यावेळी विधानसभेत हिंदू मतदारांची ताकद निश्चितच पाहायला मिळेल. दुसरी गोष्ट लाडकी बहीण योजनेच्या विरोधात विरोधकांनी रान उठवलं होतं. त्याचाही फटका आघाडीला बसणार आहे. कारण, हा थेट महिलांच्या भावविश्वाला हात घालणारा मुद्दा आहे. मेट्रोची आणखी एक लाईन सुरू झाल्यामुळे मुंबईकर युती सरकारवर खूश आहेत. मेट्रोमुळे भाजपाला मुंबईत चांगला प्रतिसाद मिळेल. कदाचित पुढे मुंबई महापालिकेची निवडणूक भाजपा स्वबळावर लढवू शकते. जरांगे पाटील इफेक्ट खूप कमी ठिकाणी दिसेल. या निवडणुकीवर त्यांचा फारसा प्रभाव असणार नाही. ही निवडणूक शिंदे आणि अजित पवार यांच्यासाठी महत्त्वाची आहे. खरा वारसदार कोण हे सिद्ध करण्याची त्यांना संधी मिळालेली आहे. तर अशा सर्व घटकांमुळे महाराष्ट्रात पाच वर्षे टिकणारे पूर्ण बहुमताचे सरकार स्थापन होईल.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# एसटी बसचे भाग्य कधी उजळणार?

आज दळणवळणाची विविध साधने उपलब्ध आहेत. मात्र, प्रवाशांचा राज्य परिवहन महामंडळाच्या लालपरीवर आजही विश्वास कायम आहे. विशेषत: ग्रामीण भागातील प्रवाशांना एसटी बसशिवाय पर्याय नाही. त्यामुळे राज्य परिवहन मंडळाने एसटी बसमध्ये आमूलाग्र परिवर्तन करण्याची नितांत आवश्यकता आहे. आधी कोरोनामुळे एसटीची बस सेवा बंद होती. त्यानंतर कर्मचाऱ्यांच्या संपामुळे एसटी बसची चाके थांबली. त्याचा देखभाल दुरुस्तीवर प्रचंड विपरीत परिणाम झाला. संपानंतर पुन्हा एसटी बस सुरू झाल्यावर अनेक कालबाह्य झालेल्या बसेस रस्त्यातच बंद पडू लागल्या. आजही अनेकदा एसटी बस बंद पडल्यामुळे रस्त्यात उभी असलेली आपल्याला दिसते. अनेक बसेस खिळखिळ्या झाल्या आहेत. त्यामुळे कधी बसचे चाक निघाल्याचे तर कधी खिडकी निखळून पडल्याच्या बातम्या आपल्याला वाचायला मिळतात. अनेक बसेसचे छत पावसाळ्यात गळताना प्रवाशांनी पाहिले. तर, अनेक बसेस नादुरुस्त झाल्याने आगारात उभ्या करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. दुसरीकडे चालक-वाहकांची उपस्थिती असूनही त्यांना बस नसल्याने ड्यूटीच मिळत नाही. ग्रामीण भागातील प्रवाशांना तासन्‌तास बसची प्रतीक्षा करीत बस थांब्यावर उभे राहावे लागते. हा प्रकार सध्या पाहायला मिळत आहे. दिवाळी झाली. त्यानंतर सुटी असल्याने अनेक कुटुंबांनी देवदर्शन किंवा पर्यटनाचा बेत आखला होता. माहेरवाशिणींना सासरी परतायचे होते. असे भाविक, पर्यटक व लाडक्या बहिणी प्रवासाला निघाल्या. पण, बस स्थानकावर पोहोचल्यावर बसेसची संख्या कमी असल्याने त्यांना आपल्या नियोजित स्थळी जाण्यासाठी बसची प्रतीक्षा करावी लागली, लागत आहे. मोठ्या प्रतीक्षेनंतर बस लागल्यावर त्यात चढण्यासाठी प्रवाशांची प्रचंड गर्दी होत आहे. अनेक प्रवाशांना बसमध्ये चढणेदेखील शक्य होत नाही. त्यांना दुसऱ्या बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. एवढे सारे होऊनही कोणती बस कुठे, केव्हा नादुरुस्त होऊन बंद पडेल, हे सांगता येत नाही. त्यातही सरकारने प्रवास भाड्यात विविध सवलती सुरू केल्याने विशेषत: महिला व ज्येष्ठ नागरिक प्रवाशांची संख्या वाढली आहे. त्याचा एसटी महामंडळाला फायदा झाला आहे. जी बस रिकामी फेरी करीत होती, त्यात आता उभे राहायला जागा मिळत नाही. रिकाम्या सीटपेक्षा अर्धे भाडे एसटी महामंडळाला मिळत आहे. त्यामुळे एसटी महामंडळाला यावर्षी मोठा नफा झाला आहे. तेव्हा महामंडळाने 'एसटी बसचा प्रवास सुखकर प्रवास' या त्यांच्या ब्रिदवाक्याप्रमाणे नवीन बसेस खरेदी करून प्रवाशांचा प्रवास सुखकर करावा, अशी अपेक्षा आहे.



दिवाळीच्या काळात खाजगी बस वाहतूकदारांनी प्रचंड भाडेवाढ केली होती. शेगाव ते पुणे प्रवासाचे दोन हजार रुपये भाडे आकारले जात आहे. मात्र, एसटी महामंडळाने या मार्गावरील व या कालावधीत कोणतीही भाडेवाढ न करता प्रवाशांच्या हिताचा निर्णय घेतला. त्यामुळेच प्रवाशांचा आजही एस. टी.वर प्रचंड विश्वास आहे. दोन तास वाट बघावी लागली तरी चालेल. पण, प्रवास करेल तर, एस. टी. बसनेच, असा निश्चय करून प्रवास करणारे प्रवासी मोठ्या संख्येत आहेत आणि याचमुळे आज एस. टी. महामंडळ सुरू आहे. ज्या प्रवाशांच्या भरवशावर आपण तग धरून आहोत, अशा प्रवाशांना चांगली सुविधा देणे हे एस. टी. महामंडळाचे आद्य कर्तव्य आहे. तेव्हा, राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांना बसची प्रतीक्षा करावी लागू नये म्हणून जास्त संख्येत सुस्थितीतील व शक्यतो नवीन बसेस उपलब्ध कराव्यात. काही दिवसांपूर्वी राज्य परिवहन महामंडळाने इलेक्ट्रिक बसेस खरेदी केल्याच्या बातम्या वर्तमानपत्रात झळकल्या होत्या. तसेच, कोणत्या आगाराला किती बसेस देणार हेदेखील परिवहन महामंडळाने जाहीर केले होते. पण, आजपर्यंत त्या बसेस किमान खामगाव, शेगाव आगारात तरी पोहोचलेल्या दिसत नाहीत. बसस्थानकांचे नूतनीकरण सुरू आहे. मात्र, बसेस जुन्याच असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांना चांगली सुविधा उपलब्ध करून द्यावी, एवढीच आमची माफक अपेक्षा आहे.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# दुप्पट लाचेचं आमिष!

महायुती सरकारने लागू केलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना म्हणजे सरळसरळ लाच देण्याचा प्रकार असल्याचे वक्तव्य उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले होते. आता बेरोजगारांना ४ हजार आणि लाडक्या बहिणींना १५०० रुपयांऐवजी ३ हजार रुपये देऊ, अशी घोषणा उद्धव ठाकरेंनीच आपल्या वचननाम्यातून केली आहे. याचा अर्थ आता उद्धव ठाकरेंनी बहिणींना आणि तरुणांना दुप्पट लाचेच्या आमिषाची घोषणा केली आहे, असे म्हणायला हरकत नाही. अर्थात उद्धव ठाकरेंच्या दृष्टिकोनातून तरी तसेच दिसते. उद्धव ठाकरेच कशाला त्यांच्या महाविकास आघाडीने राज्यातील महिलांना दर महिना ३ हजार तर बेरोजगार तरुणांना ४ हजार रुपये देण्यासारख्या घोषणांची खैरात वाटणारी 'पंचसूत्री' जाहीर केली आहे. त्यामुळे ठाकरेंच्या लाच देण्याच्या वक्तव्यातूनही ठाकरे आणि महाविकास आघाडी महिला आणि तरुणांना दुप्पट लाचेचं आमिष देत आहेत, हेच या घोषणांमधून सिद्ध होते.

उद्धव ठाकरे यांनी वेळोवेळी आमचं सरकार आल्यावर युती सरकारने घेतलेले निर्णय आम्ही रद्द करू, असे जाहीर केले आहे. मग युती सरकारने घेतलेले निर्णय जर तुम्ही रद्द करणार असाल तर लाडकी बहीण योजना चालू ठेवणार की रद्द करणार? रद्द केली तर ३ हजार कसे देणार? असे प्रश्न निर्माण झाले आहेत. मुळात उद्धव ठाकरे सध्या गोंधळलेल्या मनःस्थितीत आहेत. काहीही करून इज्जत वाचेल एवढे आमदार तरी आले पाहिजे, अशा प्रयत्नात वाट्टेल तशी आश्वासनं देत फिरत आहेत. त्यांना माहिती आहे, जाहीरनाम्यांना वचननामा म्हटल्याने काही फरक पडणार नाही. सत्तेत आलो तरी जाहीरनामा असो किंवा वचननामा पूर्ण काहीच करायचं नाही. हे मागील काळात तीन वर्षे सत्ता उपभोगून दिलेली आश्वासनं पूर्ण केली नाही, यावरून स्पष्ट आहे. उद्धव ठाकरेंनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन 'हेक्टरी ५० हजार द्या, कर्जमाफी नाही कर्जमुक्ती द्या' सारख्या घोषणा केल्या होत्या. आणि स्वतः मुख्यमंत्री बनल्यावर मात्र, ना शेतकऱ्यांना ५० हजार दिले, ना शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले. मुळात यात त्यांची काही चूक नाही. कारण, त्यांनी निर्मला सीतारामन मुंबईत आल्या असताना त्यांच्यासमोर जाहीरपणे सांगितलं होतं की, मला बजेटमधलं काहीही कळत नाही. आता त्यांना बजेटचं काही कळतच नाही त्यामुळे बिचारे निष्पाप बालकाप्रमाणे वाट्टेल तशा घोषणा करून टाकतात. या बिचाऱ्यांना काय म्हणायचं, काँग्रेसच्या सुशीलकुमार शिंदेंनीदेखील निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना वीज बिल माफीची घोषणा केली नव्हती का? निवडणूक झाली, शेतकऱ्यांची भरघोस मतं घेतली, जिंकून सत्तेत आले आणि



ती घोषणा टायपिंग मिस्टेकच्या नावाखाली हवेत विरली. घोषणेनंतर तब्बल १३ वर्षे सत्तेत राहूनदेखील आजही शेतकरी हवालदिलच आहे. त्यामुळे उबाठा आणि काँग्रेस दोघेही 'चोर चोर मौसेरे भाई'च आहेत.

अमित शाहांनी दिलेलं वचन मोडल्याची रुदाली सातत्याने करणारे ठाकरे ॲण्ड कंपनीने मागील काळात शेतकऱ्यांना दिलेली वचनं मुख्यमंत्री राहूनही पूर्ण केली नाहीत. वचनं देऊन सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांच्याच पाठीत खंजीर खुपसण्याचं काम केलं. मग शेतकऱ्यांनी ठाकरेंच्या नाही तर कोणाच्या नावाने शिमगा करायचा? यांना कदाचित माहिती असतं आपण सत्तेत येणार नाही, काहीही आश्वासनं दिलीत तरी काय फरक पडतो आणि चुकीने सत्तेत आलो तर नाही पूर्ण केली तरी काय फरक पडतो. राज्यातील जनतेला आणि शेतकऱ्यांना अशा घोषणांची आणि बनवाबनवीची सवयच झाली आहे.

म्हणे लाडक्या बहिणींना १५०० रुपये दिल्याने राज्यावर कर्जाचा डोंगर झाला आहे. राज्य कर्जबाजारी झालं आहे. राज्य दिवाळखोरीत निघालं आहे. राज्याच्या तिजोरीत पैसाच नाही; मग हे पैसा देणार कुठून, निवडणुकीच्या तोंडावर देतील, नंतर देणार नाहीत. असे एक नव्हे अनेक आरोप यांनी सरकारवर केले.

मग आता बेरोजगारांना ४ हजार, शेतकऱ्यांना ३ लाखापर्यंतची कर्जमाफी देणार (कर्जमुक्ती विसरलेत उद्धव ठाकरे बरं का), महिलांना १५०० ऐवजी ३ हजार देणार. या सगळ्याला साधारणपणे ३ लाख कोटी रुपये लागतील. आपल्या राज्याचं बजेट आहे साडेसहा लाख कोटींचे. यावेळी कदाचित अंदाजे ७ लाख कोटींपर्यंत जाण्याची शक्यता आहे. पगार, पेन्शन, घेतलेल्या कर्जाचं व्याज यात निम्मे पैसे जातील. निम्मे गेल्यावर निम्मे पैसे विकास कामांसाठी, विविध योजनांसाठी राहतात. यासाठी पैसे कुठून आणणार राहुल गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे?

या सरकारनं जाहीर केलेल्या योजना ओढून ताणून ७५ हजार कोटींपर्यंत नेल्या आहेत. म्हणजे अंथरूण पाहून पाय पसरले आहेत, असे म्हणायला हरकत नाही. पण आता मविआ देत असलेली योजनांची आश्वासने पाहता रक्कम ३ लाख कोटींपर्यंत जात आहे. मग युती सरकारला म्हणत होता की, पैसे देऊ शकणार नाही. राज्यावर कर्जाचं डोंगर असताना हे शक्य नाही. राज्य कर्जबाजारी असताना हे शक्य नाही आणि मग तुम्ही दुप्पट तिप्पट चौपट वाढ करत आहात. हे कसं शक्य होणार आहे? याचं उत्तर ज्याला बजेट समजत नाही तो तरी कसा देईल? लेखकानं स्क्रीप्ट लिहून दिली यांनी रटून फरटिदारपणे फेकली...

### शिवाजी महाराजांचं मंदिर प्रत्येक जिल्ह्यात बांधणार

एकीकडे म्हणायचं राज्यावर कर्जाचा डोंगर आहे. राज्य दिवाळखोरीत निघालं आहे. पैसाच नाही तर लाडक्या बहिणीला पैसे कुठून देणार? मग आता प्रत्येक जिल्ह्यात शिवाजी महाराजांचे मंदिर बांधायचे म्हणजे दिवाळखोरीत निघालेल्या राज्याच्या तिजोरीतून मंदिरासाठी पैसे कुठून आणणार? राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात नव्हे तर अपवाद वगळता प्रत्येक गावात महाराजांचा पुतळा मोठ्या दिमाखात उभा आहे. मग मंदिर उभारण्याऐवजी, लाडक्या बहिणीला ३ हजार देण्याऐवजी आम्ही बहिणींना सुरक्षा देऊ, असे आश्वासन किंवा यांच्या भाषेतच म्हणायचे झालेच तर वचन का दिले नाही ठाकरेंनी आपल्या वचनाम्यात? १५०० नको, सुरक्षा द्या म्हणणाऱ्यांनी आपल्या वचननाम्यात महिला सुरक्षेसाठी आम्ही हे करणार, याची हमी किंवा वचनं का दिली नाहीत? शिवाय 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' या सरदार वल्लभभाई पटेलांच्या पुतळ्याच्या निर्मितीवेळी हीच जमात एवढा कोट्यवधींचा खर्च पुतळ्यावर करण्यापेक्षा दवाखाने बनविले असते तर जनतेच्या कामाचे झाले असते, असे सल्ले देताना दिसली होती. मग आता यांना मंदिराऐवजी दवाखाने बनवा, आरोग्य सुविधा द्या, असे सल्ले त्यावेळी सल्ले देणारी जमात आता का देताना दिसली नाही? अचानक कुठे नामशेष झालीय ती जमात? गडचिरोलीच्या ग्रामीण भागात मुलांचे मृतदेह खांद्यावर घेऊन चालत जाणाऱ्या पालकासाठी ठाकरेंचा भोंगा सरकारला लाज वाटली पाहिजे एवढा थयथयाट टीव्हीसमोर करताना दिसला होता. मग ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था, दळणवळण यांसारख्या व्यवस्था सुधारण्यासाठी, बळकट करण्यासाठी आम्ही उपाययोजना करू, असे वचन का दिले नाही ठाकरेंनी? सरकारचे कान उपटणाऱ्या भोंग्यात ठाकरेंचे कान उपटण्याची हिंमत आहे? बरं, '१५०० नको, सुरक्षा द्या' म्हणणाऱ्या त्या महिला कुठाय् आता? महाराजांच्या मंदिरापेक्षा महाराजांचे महिला सुरक्षेचे विचार राबविण्यासाठी प्रयत्न करा म्हणून, ठाकरेंना सल्ला द्यायला पुढे का सरसावल्या नाहीत अद्याप? कोणत्या बिळात लपल्या आहेत?

९२७०३३३८८६

### प्रादेशिक नाट्यकारण

प्रेक्षकांच्या आडोशाने भाषिक प्रदूषण पसरविण्याचा उद्योग कुडाळस्थित बाबा वर्दम संस्थेद्वारे आयोजित नाट्य महोत्सवाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात सध्या चालू आहे. ही घटना स्वातंत्र्योत्तर मराठी रंगभूमीच्या इतिहासात पहिल्यांदाच घडत आहे. विदर्भातील हेमेंद्र नाट्य संस्थेतर्फे 'जंगोम सेना' हे मराठीच्या वैदर्भी बोलीतील नाटक कुडाळ परिसरातील प्रेक्षकांना समजणार नाही, या सबबीखाली स्पर्धेतून हद्दपार करण्यात आले. कोकणी-मराठी हा वाद तसा जुनाच. गोवा राज्यात या वादाला तोंड फुटले. आता तर या वादाचे हातपाय मराठी राजभाषा असलेल्या महाराष्ट्रात पसरविण्याचे कारस्थान रचले जात आहे. सुमारे ५४ बोलीभाषा असलेल्या मराठीच्या केवळ वैदर्भीय बोलीतील नाट्यसंहितेवर स्पर्धा आयोजक समितीने आक्षेप घ्यावा, ही कृती केवळ प्रेक्षकांच्या कला जीवनात कलुषित भाव पसरविण्याच्या उद्देशाने तेवढी गेली नसून त्यामागून प्रादेशिक राजकारण तर खेळले जात नसावे, याची शंका येते. भाषिक कारणास्तव एखादी नाट्यकृती स्पर्धेतून बाद झाल्याचे उदाहरण रंगभूमीच्या इतिहासात सापडत नाही. प्रस्तुत घटनेमुळे उद्‌भवलेल्या असंतोषावर काय उपाय करायचे ते शासन त्यांच्या स्तरावर करतीलही; मात्र महाराष्ट्रातील रंगभूमीची शीर्षस्थ संस्था अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद या विषयावर मूग गिळून बसली आहे, याचे आश्चर्य वाटते.

**डॉ. विलास देशपांडे**/९९६००३११४८

●● ●●

## वाचक पत्रे

### खाद्यपदार्थांची नासाडी

सध्या दिवाळीमुळे सगळीकडे उत्साहाचे, उत्सवाचे वातावरण आहे. बाजारात अनेक प्रकारांचे खाद्यपदार्थ, वस्तू, कपडे, फुले, भेटवस्तूंची मोठ्या प्रमाणावर रेलचेल असते. त्या निमित्ताने अनेकांकडे समारंभ आयोजित केलेले असतात. मोठ्या प्रमाणात अन्न शिजविले जाते. मात्र, बऱ्याचदा अन्नाची नासाडी होते. भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात नासाडी होणाऱ्या अन्नाचे व्यवस्थापन ही समस्या गंभीर होत आहे. यात अनेक सामाजिक संस्था या समस्येचे निराकरण करीत आहेत. तरीसुद्धा ती कमी पडते. लग्नसमारंभ कॅन्टीन, हॉटेल, सामाजिक आणि कौटुंबिक समारंभात फार मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाते. सर्वेक्षणानुसार भारतात जेवढे अन्न फेकून दिले जाते त्यात किमान दोन हजार लोकांची भूक भागेल. याकरिता अन्न वाचवण्याचा प्रारंभ अर्थातच स्वतःपासून करणे आवश्यक आहे. लहान मुलांनाही तशी सवय लावावी. सर्वांनीच स्वतःच्या व्यवहारात सुधारणा केली तर एकत्रित परिणाम मोठा होतोच; पैसाही वाचेल आणि नासाडीपासून होणारे वाईट परिणामही कमी होतील आणि अन्न उत्पादनाची प्रक्रिया अधिक कार्यक्षम होईल. आजकाल बऱ्याच रेस्टॉरंटमधून 'कृपया पानात अन्न टाकू नये,' असे फलक लावलेले असतात. आपण त्याचे पालन करावे. दुसरे म्हणजे स्वदेशी वस्तू खरेदी करण्यावर आपण भर द्यावा. घरगुती पारंपरिक फराळ तयार करण्यावर अथवा गृहउद्योग संस्थांमधून खरेदी करावा.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### रेल्वे आरक्षणाची मनमानी

दिवाळीच्या सुट्यांमध्ये भोपाळला बहिणीकडे भाऊबीज करण्यासाठी जाण्यास दीड महिन्याआधी २ नोव्हेंबरचं छत्तीसगढचे आरक्षण केले होते. वेटिंग लिस्ट ३२ असल्याने काऊंटरवरून सांगण्यात आले की, वेळ असल्यामुळे कन्फर्म होऊ शकते. चार्ट तयार झाला तेव्हा वेटिंग लिस्ट ७ वर येऊन थांबून गेली. शेवटी जाण्याचा बेत रद्द केला व तिकीट परत केले. त्यात ६० रुपये कटले. येण्याचे ९ तारखेचे कन्फर्म तिकीट मिळाले; जाण्यासाठी आरक्षण कन्फर्म नसल्यामुळे येण्याचेही कॅन्सल करावे लागले. त्यात १२० रुपये कटले. काही जणांनी सांगितले की, एजंटकडून जादा पैसे देऊन तिकीट घेतले असते तर कन्फर्म मिळाले असते. एजंट लोक एका दिवसात कन्फर्म तिकीट देतात म्हणे! आश्चर्य वाटले की, आपण दीड महिन्याआधी केलेले तिकीट कन्फर्म नाही झाले आणि एजंट एका दिवसात कन्फर्म तिकीट देतो. एजंटजवळ अशी कोणती यंत्रणा आहे की तो कन्फर्म तिकीट देतो. तेही एका दिवसात. एक प्रश्न मनात आला की, जे लोक एजंटकडून जादा पैसे देऊन एका दिवसात कन्फर्म तिकीट घेतात ते शहाणे की माझ्यासारखे रेल्वे यंत्रणेवर विश्वास ठेवून महिना-दीड महिना आधी वेटिंग तिकीट घेणारे मूर्ख?

**प्रमोद वाडी**/९५६१७०११७२

●● ●●

### क्रिकेट संघाचा लज्जास्पद पराभव

शेवटच्या कसोटी सामन्यात पाहुण्या न्यूझीलंडने भारतीय संघाला जिंकण्यासाठी दिलेले १४७ धावांचे लक्ष्य भारतीय संघाला गाठता आले नाही. कसोटी मालिका या सामन्यापूर्वीच गमावली होती. जिंकण्यासाठी गवत नसलेली, चेंडू हातभर वळणारी खेळपट्टी निवडूनही विदेशी फिरकीपटूंसमोर उपरोक्त शेर ढेर झाले. भारतीय भूमीवर ३ विरुद्ध ० हा मालिकेतील पराभव लज्जास्पद आहे. मर्यादित षटकांचे अमर्यादित सामने खेळूनही कसोटी सामन्यात फलंदाजी करण्याची कला सुनील गावस्कर, दिलीप वेंगसरकर, मोहिंदर अमरनाथ, राहुल द्रवीड, लक्ष्मण यांना अवगत होती. हे फलंदाज दोन-तीन दिवस खेळपट्टीवर चिपकून फलंदाजी करीत असत.

**श्रीराम ढोले**/अमरावती

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# सोमवारी नांदेड उत्तर मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्चाची द्वितीय तपासणी

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. ०९ नोव्हेंबर

८६-नांदेड उत्तर मतदार संघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची द्वितीय तपासणी सोमवार ११ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ५ या कालावधीत कै. डॉ. शंकरराव चव्हाण, नियोजन भवन, कॅबिनेट हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, परिसर नांदेड येथे होणार आहे. तपासणीसाठी उमेदवारांनी किंवा त्याच्या प्रतिनिधींनी निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा हिशोब खर्च निरीक्षकासमोर सादर करणे आवश्यक आहे .

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम , १९५१ च्या कलम ७७ नुसार निवडणुकीच्या वेळेस प्रत्येक उमेदवार एकतर तो स्वत: किंवा त्याच्या, तीच्या निवडणूक प्रतिनिधीद्वारे त्याला, तीला नामनिर्देशित करण्यात आले आहे. त्या दिनांकापासून निवडणुकीच्या निकाल लागण्याच्या दिनांकापर्यत दोन्ही दिनांक धरुन, त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेला किंवा प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवणे आवश्यक आहे.

तपासणीस अनुपस्थित राहणारे उमेदवार भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार कार्यवाहीस पात्र असतील तसेच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब ठेवणे व दाखल करण्याच्या कायद्याच्या आवश्यकतांचे अनुपालन करण्यात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने कसूर केल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम १० क अन्वये तो निवडणूक आयोगाकडून तीन वर्षाच्या कालावधीसाठी निरर्ह ठरविण्यास पात्र असेल यांची नोंद घ्यावी असे ८६-नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी ललितकुमार वऱ्हाडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# वृत्तपत्रामध्ये पेडन्यूज आल्यास उमेदवारांच्या खर्चात करा जमा

## एमसीएमसी समितीला जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. ०९ नोव्हेंबर

लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा निवडणुकीच्या शेवटच्या आठवड्यात बातमी आड पेडन्युजच्या माध्यमातून प्रचार होणार नाही याची काळजी घ्या. याकाळामध्ये सारख्या बातम्या आणि बातम्यांच्या आडून प्रसिद्धी सुरू असेल तर पेड न्यूज म्हणून हा खर्च उमेदवाराच्या खात्यात पकडण्यात यावा. तसेच याकाळात वृत्तपत्रांनी देखील कोणतीही बातमी पेडन्युज येणार नाही याकडे काटेकोरपणे लक्ष द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.

राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणिकरण, प्रिंट माध्यमात येणाऱ्या जाहिराती व मजकूर या माध्यमातून पेड न्यूज तर जात नाही याची देखरेख करण्याकरिता, जाहिराती व पेड न्यूजचा खर्चाचा अहवाल एक्सपेंडिचर (खर्च) विभागाला देण्याकरीता माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीचे (एमसीएमसी )असून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

जाहिरात बातमीमध्ये काय नको

आदर्श आचारसंहितेनुसार दिलेल्या निर्देशाचे जाहिरातीमध्ये पालन होणे आवश्यक आहे. या प्रामुख्याने राष्ट्रीय एकात्मतेला हानी पोहोचविणाऱ्या बाबी, धार्मिक भावना दुखावणे, भारतीय घटनेचा अवमान करणे, गुन्हा दाखल करण्यास प्रवृत्त करणे, कायदा व सुव्यवस्थेस बाधा निर्माण करणे, गुन्हेगारीचे उदात्तीकरण, महिलांचे चुकीचे चित्रण, तंबाखूजन्य किंवा नशा आणणाऱ्या पदार्थाच्या जाहिराती, हुंडा, बालविवाह यांना उत्तेजन देणाऱ्या जाहिराती प्रसारित करण्यास प्रतिबंध आहे. इतर देशावर टीका नसावी. न्यायालयाचा अवमान जाहिरातीतून होता कामा नये. राष्ट्रपती व न्याय संस्था यांच्याबाबत साशंकता नसावी. राष्ट्रीय एकात्मतेला, सौहार्दतेला आणि एकतेला बाधा पोहचविणारा मजकूर त्यामध्ये नसावा. सुरक्षा दलातील कोणतेही सैनिक, व्यक्ती, अधिकारी यांची अथवा सैन्य दलाचे छायाचित्र जाहिरातीत नसावे. कोणत्याही व्यक्तीच्या खाजगी, वैयक्तिक जीवनातील घटनांना धरुन त्यावर भाष्य नसावे.

पेड न्यूज सारखे वृत्त नको

निवडणुकीच्या काळात अनेक वेळा सारख्या हेडींगच्या बातम्या उमटतात. जाहिरातींच्या मोबदल्यात ही प्रेस नोट पेड न्यूज म्हणून तर छापली जात नाही ना याकडे लक्ष देण्यात येत आहे. याशिवाय बाइलाईन नसलेल्या मात्र एकाच मजकुराच्या सारख्या बातम्या सारखे हेडींग ठेवण्यात येवू नये. सर्व क्षेत्रातून उमेदवारांना पाठबळ मिळत आहे. हा उमेदवार विजयी होणार आहे, या उमेदवाराचे पारडे जड आहे, विजय दृष्टीपथात आहे अशा पध्दतीने निवडणुकी पुर्वीच कुणाला थेट समर्थन उमटणार नाही याची काळजी घेण्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. अशी बातमी पेडन्युज ठरते व शासकीय दरानुसार याचा सर्व खर्च उमेदवाराच्या खर्चामध्ये जाणार असल्यामुळे उमेदवाराचा खर्चाचा बजेट बिघडू शकतो. या निवडणुकीमध्ये उमेदवारांना लोकसभेसाठी ९५ लक्ष रुपये तर विधानसभेसाठी ४० लक्ष रुपयांची मर्यादा आहे. त्यामुळे वृत्तपत्रात प्रचार सभा व अन्य बाबींच्या सारख्या बातम्या येणार नाही याबाबत राजकीय पक्ष तसेच वृत्तपत्रांनी दक्ष राहावे अशी सूचनाही यावेळी करण्यात आली. निवडणुकीबाबतचे सर्व वृत्त संपादकीय संस्कारातून जावेत. प्रेसनोटच्या मजकुरात व हेडिंग मध्ये संपादन करण्यात यावे. तसेच या वृत्तांतून आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# कचनेर येथे वार्षिक यात्रेनिमित्त आढावा बैठक



छत्रपती संभाजीनगर : १००८ चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र कचनेर येथे होणाऱ्या वार्षिक यात्रेनिमित्त शुक्रवार रोजी जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार रमेश मुनलोड यांच्या उपस्थितीत रामलाल बडजातेनगर येथे आढावा बैठक पार पडली अतिशय क्षेत्र कचनेर येथे १४ ते १६ नोव्हेंबर या कालावधीत वार्षिक यात्रा महोत्सव होणार आहे या अंतर्गत १५ नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजता ध्वजारोहण व पंचामृत महामस्ताका अभिषेक मुख्य सोहळा होणार आहे १६ नोव्हेंबर रोजी पाडवा पचाअमृत अभिषेक आणि समारोप सोहळा होणार आहे या यात्रा महोत्सवाच्या तयारीच्या अनुषंगाने शुक्रवारी झालेल्या आढावा बैठकीत आरोग्य , पाणीपुरवठा, बांधकाम , पोलीस, महावितरण, एस टी महामंडळ, उत्पादन शुल्क, अग्निशामक, ग्रामपंचायत, पशुधन , सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांशी विविध विषयावर चर्चा करून सूचना दिल्या यात्रा आढावा बैठकीचे प्रास्ताविक प्रवीण लोहाडे यांनी केले यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी विष्णू भोये, पोलीस निरीक्षक रविकिरण दरवडे, पो.ना दीपक देशमुख, आरोग्य अधिकारी डॉक्टर नितीन पवार, मॅनेजिंग ट्रस्ट सुरेश कासलीवाल, हेमंत बाकलीवाल, एम आर बडजाते, कार्यकारणी मंडळाचे अध्यक्ष वृषभ गंगवाल, महामंत्री विनोद लोहाडे, प्रकाशचंद गंगवाल, मुकेश कासलीवाल, प्रवीण लोहाडे किरण मास्ट तलाठी तनुजा जगताप, ग्रामसेवक एकनाथ सांगळे, डॉ अशोक कर्डिले, स्वप्निल जैन प्रमोद गोसावी, सूर्यकात जाधव सर्व विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते चौकट कचनेर वार्षिक यात्रेसाठी परमपूज्य राष्ट्रसंत भारत गौरव गणाचार्य श्री समाधिस्थ विरागसागर महाराजांचा मूळ संघ ससंघ अरिहंत नगर छत्रपती संभाजीनगर येथून ११ नोव्हेंबर रोजी मंगल विहार करत आहे १३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता श्री क्षेत्र कचनेर येथे त्यांचे आगमन होईल.

# पैठण आचारसंहिता पथकाकडून मकरंद अनासपुरे यांच्या वाहनाची तपासणी



तभा वृत्तसेवा पैठण दि ०९ :- पैठण विधानसभा निवडणुक आचारसंहिता एस.एस.टी पथक क्रमांक दोन हे छत्रपती संभाजीनगर सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर वाहन तपासणी करत असतांना त्याठिकाणी मराठी सिनेश्रृष्टीचे प्रसिध्द अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या वाहनाची पथकाच्या वतीने तपासणी करण्यात आली.

यावेळी अनासुरे यांनी पथकाला त्यांच्या कामासाठी शुभेच्छा दिल्या.यावर पथकातील मंडळींना अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या सोबत छायाचित्रे घेण्याचा मोह आवरता आला नाही. पैठण तालुक्यात ठिकठिकाणी आचारसंहिता पथकाकडून तपासणी होत असून तीन दिवसांपूर्वी पैठण शेवगाव रोडवरील चेक पॉईंटवर पोलिसांनी कत्तलीसाठी गायी नेणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले होते. तसेच बिडकीनला पथकाकडून बँकेचे वाहन तपासतांना त्यात २० लाखांची रोकड मिळाली होते. शेवटी ती रक्कम बँकेची असल्याने पथकाच्या वतीने वाहन सोडण्यात आले.निवडणूक निर्णय अधिकारी नीलम बाफना, निवडणूक अधिकारी तहसीलदार चव्हाण, नोडल अधिकारी तथा नप मुख्याधिकारी प्रशासक संतोष आगळे,पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली किशोर निकम प्रशासन अधिकारी, किशोर निकम, सहाय्यक गट विकास अधिकारी राजेंद्र कांबळे, एपीआय रोडगे, पथक प्रमुख आर.पी. सांगळे पथक सहाय्यक अधिकारी पोलीस कॉन्स्टेबल आर. बी.जाधव यावेळी उपस्थित होते.

# भाजपा -महायुतीच्या निवडणूक संकल्पपत्राचे अमित शहा यांच्या हस्ते आज प्रकाशन

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि.९ ऑक्टोबर:

विधानसभा निवडणुकीचा प्रचारात रंगत वाढत असून सत्तारूढ महायुती व विरोधी महाविकास आघाडीच्या केंद्रीय नेत्यांच्या तोफा धडाडत आहेत. भाजपा व महायुतीच्या निवडणूक संकल्प पत्राचे रविवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते प्रकाशन होणार आहे.

सत्तारूढ महायुतीमध्ये भाजपा हा सर्वात मोठा पक्ष असून या निवडणुकीतही आपल्या छोट्या मित्र पक्षासह एकूण १५२ जागा लढवत आहे. तर उर्वरित जागा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला देण्यात आले आहेत. त्यामुळे निवडणूक भाजपा जनतेसमोर कोणती आश्वासने देणार आहे?, याकडे राजकीय वर्तुळात उत्सुकता लागून राहिलेली आहे.

गेल्या दोन दिवसापासून महाराष्ट्रात निवडणूक प्रचाराचा धडाका लावलेल्या केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत या निवडणूक संकल्पपत्राचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

शाह यांनी गेल्या २ दिवसात राज्यात ८ सभा घेतल्या आहेत. त्यामध्ये त्यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांवर टीकेची झोड उठवली होती. संकल्पपत्राच्या प्रकाशनावेळी ते विरोधकावर कोणती टीका करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सत्वशील विचार-आचारातून घडलेले ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व डॉ. सु. भि. वराडे यांना विविध संस्थांची श्रद्धांजली

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : जागतिक कीर्तीचे मृद्-कृषी शास्त्रज्ञ डॉ. सु. भि. वराडे यांच्या श्रद्धांजली सभेत विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी आपल्या मनोगतामधून वराडे यांच्या आठवणींना उजाळा दिला. यातून डॉ. वराडे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू समोर आले. जुन्या पिढीतील असूनही सातत्याने भविष्याचा वेध आणि विविध संस्थांमधून काम करताना नवनवीन संकल्पनांना चालना देणारे डॉ. वराडे चाकोरीबाहेर विचार करणारे होते. आपल्या विद्वत्तेचा कोणताही अहं न बाळगता कायम सध्या राहणीतून आपल्या सत्वगुणांचा परिचय दिल्याची भावना यावेळी वक्त्यांनी व्यक्त केली.

श्रद्धांजली सभेचे आयोजन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्थेच्या वतीने करण्यात आले. सचिव सारंग टाकळकर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी यज्ञवीर कवडे, ज्येष्ठ लेखक बाबा भांड, डॉ. सर्जेराव ठोंबरे, प्राचार्य डॉ अशोक तेजनकर, डॉ. क्षमा खोब्रागडे, डॉ. शरद भोगले, राजाराम दिडगीकर, कौशल्या कुलकर्णी, प्राचार्य जीवन देसाई, चंद्रकांत जोशी, अभय तळोले आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मंगल खिंवसरा, डॉ. पी. एस. कुलकर्णी, सुरेश देशपांडे, डॉ. प्रशांत तेरकर, अनंत आचार्य, सदाशिव पोहंडुळकर, रमेश पाथ्रीकर आदी उपस्थित होते.

# आ. कल्याणकर यांनी अनेक प्रभागांना भेटी देऊन नागरिकांच्या अडीअडचणी जाणल्या



नांदेड : नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील शहरी भागात आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी अनेक प्रभागांना भेटी देऊन नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या . अडीच वर्षाच्या काळात विकासासाठी भरिवासी काम केले आहे तरीही ज्या भागाचा विकास राहिला आहे किंवा त्या भागात विकासाची कामे झाले नाहीत अशा भागात या निवडणुका संपल्यानंतर विकासाचा विकास कामाचा नारळ पडला जाईल त्यासाठी तुम्ही विश्वास ठेवून शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा . शिवधनुष्य हाती घ्या .हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारातील महाराष्ट्र घडवा असे आव्हान त्यांनी यावेळी केले. मालेगाव रोड, भावसार चौक, दीपनगर, छत्रपती चौक ,झेंडा चौक आदी भागात आयोजित करण्यात आलेल्या कॉर्नर बैठकांमध्ये ते बोलत होते. यावेळी सह संपर्कप्रमुख दर्शनसिंग सिद्धू, जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, युवा सेना जिल्हाप्रमुख गणेश पाटील शिंदे मरळकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण नांदेड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचे पालकत्व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुती सरकारने स्वीकारले आहे . त्यामुळे नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाच्या धर्तीवर नांदेड जिल्ह्यातील संपूर्ण विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली लोकसभेत भाजपाचा खासदार पाठवा तर नांदेड उत्तर विधान सभेच्या शिवसेना महायुतीच्या उमेदवाराला विजयी करा आणि लोकनायक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करा . असे आवाहन नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना महायुतीचे उमेदवार आ. बालाजीराव कल्याणकर यांनी केले.

आपल्या सहज बोलीतून आ. बालाजी कल्याणकर यांनी या आयोजित बैठकीत बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अवघ्या अडीच वर्षाच्या काळात महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेल्या अनेक योजनांची माहिती दिली . २४ तास जन सेवेसाठी तयार असणारा मुख्यमंत्री महाराष्ट्रला मिळाला हे तुमचे आणि आमचे भाग्य आहे. याच मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वात नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे विकासासाठी भरीव असा निधी आला आहे. त्यामुळे नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचा मोठ्या प्रमाणात कायापालट होत आहे . यासाठी राज्यात महायुतीचे सरकार येणे आवश्यक आहे त्यामुळे होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत मी पुन्हा आपल्या सेवेसाठी निवडणुकीच्या मैदानात उतरला आहे त्यामुळे येत्या २० तारखेला या निशाणी समोरील बटन दाबून मला आपली पुन्हा सेवा करण्याची संधी द्या याचवेळी नांदेड लोकसभा मतदारसंघात भाजपाचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांची निवडणूक निशाणी कमळ आहे कमळ या निशाणी सम्राट बटन दाबून डॉ. हंबर्डे यांना खासदार म्हणून लोकसभेत पाठवा आणि आपल्या जिल्ह्याच्या विकासासाठी भरीवासा निधी खेचून आणून असा विश्वास त्यांनी यावेळी दिला.

# आदमपूर परिसरात उसतोड मजूर दाखल



तभा वृत्तसेवा
आदमपूर,दि. ०९ नोव्हेंबर

बिलोली तालुक्यातील मौजे आदमपूर परिसरात दिवाळीनंतर उसतोड मजूर दाखल झाले असल्याने उस तोडणीला सुरूवात झाली आहे. प्रगतीशील तरूण शेतकरी बसवंत मुंडकर पाटील यांच्या उसाच्या फडात पहिली मजूरांची टोळी आल्याने 'गोड उसाची... कडू कहाणी' शेतकऱ्यांच्या आपसूक डोळ्यासमोर टचकन तरळली.

आदमपूर परिसरातील यापूर्वीचा उस लागवड व तोडणीचा एक हिवाळी हंगाम दरवर्षी चर्चेत असायचा. दूरदूर पर्यंत शेत शिवारात उसाचे जोमदार क्षेत्र नजरेत भरावे असेच होते. ग्राम शंकरनगर, ता.बिलोली साखर कारखाना तेव्हा बेफाम आपली धूराची चिमणी ओकत होता. हजारोंच्या संख्येने उसतोड मजूर कारखाना परिसरात आणि गावोगावी दाखल होत असत. आदमपूरसह अटकळी, गळेगांव, थडीसावळी, मुतन्याळ, खतगांव, केसराळी, रामपूर थडी, थडी हिप्परगा अशा भागातला उस संबंधित कारखान्यात जात असे. येथील उस लागवड शेतकरी हिरीहिरीने उसाची लागवड करीत असत.

कित्येक वर्षांपासून परिसरातील साखर कारखाना अगदी बंद अवस्थेत आहे. त्यानंतर तत्कालीन हजारो साखर कारखाना कामगार ऐनवेळी बेरोजगार झाले. त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली. प्रकाशमय भविष्य अचानक अंधारात चाचपडत कष्टप्रद बुडाले. मध्यंतरी एखादा वर्ष तो कारखाना लीजवर चालूही झाला होता. अगदी 'पांढरा हत्ती' होऊन कारखाना आजही स्तब्ध, अबोल गंजलेल्या अवस्थेत विराजमान आहे.

आजघडीला वाघलवाडा (उमरी)आणि अन्य ठिकाणी काही प्रमाणात तोडणी केलेला उस जात असल्याने आदमपूर परिसरात उस लागवड शेतकरी आता करताना दिसून येत आहेत.मागच्या वर्षी येथील अत्यल्प शेतकऱ्यांनी मशीन यंत्र कटाईने आपला उस कारखान्यास पाठवलेला होता.या उसतोड टोळ्या पाहिल्यावर तत्कालीन शेतकरीवर्गास आर्थिक बाबीने समाधानी बनवणारा पट डोळ्यासमोर झरझरत जातो. 'गोड उसाची...कडू कहाणी' ही व्यथा परिसरातील शेतकरी या प्रसंगाने बोलून दाखवत होते.

# छत्रपती संभाजीनगर ट्रायथलॉन संघटनेतर्फे डॉ. देशमुख, डॉ. जटाळे यांचा सत्कार

## डॉ. प्रफुल जटाळे, देशमुखांनी गाजवली राज्य स्पर्धा



तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. ०९ नोव्हेंबर

नांदेड येथे नुकत्याच झालेल्या डॉक्टरांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत डॉ. प्रफुल्ल जटाळे आणि डॉ. सुनील देशमुख यांनी जबरदस्त कामगिरी करताना पदकांची लूट केली.

डॉ. सुनील देशमुख यांनी जलतरणात २ सुवर्ण, ३ रौप्य व सायकलिंगमध्ये एक अशा पाच पदकांची कमाई केली. तसेच डॉ. प्रफुल्ल जटाळे यांनी सायकलिंगमध्ये ५० कि. मी. रेसमध्ये आणि मॅरेथॉनमध्ये अशा एकूण दोन सुवर्ण पदकांची कमाई केली. तसेच जलतरणात एक रौप्य व एक कांस्य पदक पटकावले. या दोघांना अभय देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले आहे. राज्य क्रीडा स्पर्धेत पदकांची लूट केल्याबद्दल जटाळे व देशमुख यांचा मनपाचे आरोग्य अधिकारी डॉ. पारस मडलेचा, सुंदरबाबू सोरोसिया, रुस्तुम तुपे, ट्रायथलॉनचे आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी अभय देशमुख यांच्या उपस्थितीत मनपाच्या स्विमिंग पूल येथे नुकताच सत्कार करण्यात आला.

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party** : **Bharatiya Janata Party**
***Name of Election** : **Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT** : **Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 94- Hingoli | Tanaji Sakharamji Mutakule | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | J.M.F.C., Hingoli. MA No. 199/2022 Pending. | u/s. 188 of IPC, Sec. 51B 51(B), Disaster Management Act. | Nil | Nil | Nil |
| 2. | | | J.M.F.C., Hingoli. SCC No. 311/2021 Pending. | u/s. 188 of IPC, Sec. 51B 51(B), Disaster Management Act. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 94- Hingoli**
**Place : Mumbai**
**Date : 08/11/2024**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## महाविकास आघाडीच्या फुटीने पुन्हा लोणीकर आघाडीवर!

# ए.जे.बोराडे यांनी स्वार्थी राजकारण केल्याने पक्षातील कार्यकर्तेच त्यांच्या पराभवासाठी सक्रीय!

## ए.जे.बोराडे यांनी स्वार्थी राजकारण केल्याने पक्षातील कार्यकर्ते त्यांच्या पराभवासाठी सक्रीय!

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

परतूर - मंठा विधानसभा मतदारसंघात यंदा निवडणुकी महायुती उमेदवार व महाविकास आघाडीतील बंडखोरी करून उभे राहिलेले अपक्ष उमेदवार सुरेशकुमार जेथलिया यांच्यात होणार असल्याचे चित्र स्पष्ट दिसून येत आहे. यंदा भाजपा विरुद्ध काँग्रेस नसून महाविकास आघाडीतील उबाठा गटाकडे ही जागा गेल्याने येथील बहुतांश काँग्रेसचे नेते व पदाधिकारी नाराज असल्याचे दिसून येत आहे. याचा अप्रत्यक्ष फायदा हा महायुतीला होणार असून आता खरी लढत ही महायुतीतील भाजपाचे उमेदवार बबनराव लोणीकर व अपक्ष उमेदवार सुरेशकुमार जेथलिया व वंचित बहुजन आघाडीचे थोरात यांच्यात होणार आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख व महाविकास आघाडीतील उमेदवार यांच्याकडे मंठा शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती पद , त्याचबरोबर त्यांच्या भाऊजीय , यासह पुतण्या नगरसेवक तसेच स्वतःकडे विविध पदे आणि


बबनराव लोणीकर


सुरेशकुमार जेथलिया


ए.जे.बोराडे

विशेष म्हणजे गुत्तेदारीची मोठमोठी कामे देखील पुतण्या व चुलत भाऊ यांनाच देतात त्यामुळे शहरातील अनेक पदाधिकारी व नेतेमंडळी नाराज असल्याचे दिसून येत आहे. या ग्रामपंचायत काळात सरपंच व नगरपंचायत मध्ये सुरुवातीच्या काळापासून देखील यांचा भाऊ उपनगराध्यक्ष व सरपंच राहत आले आहेत. त्यामुळे सर्वच पदे एकाच घरात का अशी देखील भाऊला मतदारांमध्ये निर्माण झाली आहे. यांच्याकडून होणारे गुंडगिरी व दादागिरी त्यामुळे मतदारांमध्ये भीती निर्माण झाले आहे.

परतूर मंठा विधानसभा मतदारसंघ हा गेल्या काही वर्षापासून महाविकास आघाडी कडून काँग्रेसकडे देण्यात आला होता.तर मध्यंतरी स्वबळावर लढतीमध्ये शिवसेनेच्या उमेदवाराचा दारुण पराभव झाला होता. त्यानंतर भाजप व काँग्रेस लढतीमध्ये काँग्रेस दोन नंबरला राहिलेले दिसून येते. विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या विकास कामाची मतदारांना जाणीव आहे. त्याचबरोबर मंठा शहरातील अनेक विकास कामे उबाठा गटाची उमेदवार यांच्याकडे नगरपंचायत सत्ता असल्याने कुठलीही एनओसी न दिल्याने मोठ्या प्रमाणामध्ये रखडली आहेत.त्यामुळे मंठा शहराचा विकास देखील न होण्यास त्यास उबाठा गटाचे उमेदवार कारणीभूत असल्याची चर्चा देखील मतदारातून दबक्या आवाजात होत आहे. तसेच सुरेशकुमार जेथलिया हे जनसामान्यांच्या संपर्कात असून पक्षाच्या वतीने विविध आंदोलने यामध्ये सक्रिय असतात. तसे त्यांना सहानुभूतीची लाट देखील मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली आहे पक्षांतर्गत त्यांच्या नावाला विरोध करण्यात आला. यासह ही जागा शिवसेनेच्या गटात गेल्याने अपक्ष म्हणून उभे राहिलेले सुरेशकुमार जेथलिया यांना मतदारांकडून सहानुभूती मिळत असल्याचे दिसून येत आहे. याचबरोबर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार थोरात हे देखील चांगले जनसंपर्कात असल्याचे दिसून येत असल्याने यावर्षीही लढत तिरंगी होणार असल्याचे दिसून येत आहे.

> शिवसेना उबाठा गटाचे उमेदवार बोराडे यांच्याबद्दल मतदारसंघासह मंठा तालुक्यासह शहरांमध्ये मोठी नाराजी; सर्वच पदे उबाठा गटाच्या उमेदवाराच्या घरात शिवसेना जिल्हाप्रमुख, जि.प. आरोग्य सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती, नगरपंचायत नगरसेवक व नगराध्यक्षा, जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य अशी अनेक पदे आपल्याच आपल्याच घरातील सदस्यासह स्वतःकडे घेतात. याचबरोबर गुत्तेदारी देखील बोराडे यांचे पुतणे व मोठे चुलत भाऊ यांच्याकडे यामुळे मंठा शहरासह तालुक्यातील पदाधिकारी व नेतेमंडळी नाराज असल्याचे चित्र सध्या बोलून दाखवत आहेत. नगरपंचायत मध्ये यांची सत्ता असल्याने शहरातील विविध ठिकाणी भूखंड तसेच रिकाम्या जागेवर यांचा पुतण्या कब्जा करत आहे सध्या मागील पंधरा दिवसा खाली रंगत असलेले जिल्हा परिषद शाळेच्या जागेवर दोन मजली बांधकाम करून अतिक्रमण केले आहे. शाळेचे मुख्याध्यापक यांना दमदाटी व गुंडागिरी करून कार्यवाही न करण्यास भाग पाडले आहे. यासह मंठा नगरपंचायत ला निधी देखील कुठलीही वस्ती नसलेल्या ठिकाणी मित्राच्या प्लॉटिंगमध्ये दर्शना नगर या ठिकाणी पाठविण्यात आला होता असल्याची चर्चा देखील मागील वर्षी मोठ्या प्रमाणात वर्तमानपत्रात रंगली होती. यासह नगरपंचायत च्या माध्यमातून विरोधी पक्षाला कुठल्याही विकास कामासाठी एन ओ सी चा अडथळा यांच्याकडून आणण्यात येतो. सध्या विधानसभे निवडणुकीची धामधूम मोठ्या प्रमाणावर सुरू असून यामध्ये देखील सोशल मीडियावर पातळी सोडून टीका केली जात असल्याचे दिसून येत असून केवळ घाणेरडे राजकारण केले जात आहे. मागील दीड वर्षापासून बाजार समितीमध्ये यांची सत्ता आहे परंतु शेतकऱ्यांसाठी कुठल्या सोयी सुविधा न करता बाजार समितीमधील निधी व जिनिंग मधून पाकीट सिस्टीम राबविली जात असल्याची चर्चा ऐकायला येत आहे. शेतकऱ्यांसाठी कुठली सोयीसुविधा या बाजार समितीमध्ये केल्याची दिसून येत नाही.बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये मोठमोठ्या गोष्टींचा गाजावाजा करण्यात आला. परंतु , सत्ता आल्यानंतरही शेतकऱ्यांना निराश करण्यात आले.

## संक्षिप्त

### निवडणुक निरीक्षकांची मतदान केंद्रावर जाऊन पाहणी

**गैरहजर अधिकारी कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई**



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक निरीक्षक डॉ. वेदपती मिश्र यांनी शुक्रवारी (दि.८) भोकरदन तालुक्यातील काही मतदान केंद्रांची पाहणी केली. मतदान केंद्रावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधांबाबत त्यांनी आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देत गैरहजर अधिकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार असल्याचे सांगितले, भोकरदन विधानसभा मतदार संघातील भोकरदन व जाफ्राबाद तालुक्यात एकूण ३३४ मतदान केंद्र आहेत. यातील राजूर, जयदेववाडी, आन्वा, वालसावंगी, पारध, जळगाव सपकाळ येथील जिल्हा परिषद शाळांमधील मतदान केंद्रांची निवडणूक निरीक्षक वेदपती मिश्र यांनी आज पाहणी केली. मतदान केंद्रातच्या ठिकाणी नादुरस्त असलेल्या रॅम्पची दुरुस्ती करणे, मतदान केंद्र खोलीच्या दरवाज्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने आतील बाजूस कडी बसवावी, पुरेसा प्रकाश राहील यासाठी बल्ब, ट्युबलाईटची व्यवस्था करावी, मतदारांना शुध्द पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतागृहाची व्यवस्था, मार्गदर्शक फलक लावणे आदी सुविधा आवश्यक तिथे उपलब्ध करून देण्याच्या सूचना वेदपती मिश्र यांनी सबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, गटविकास अधिकारी श्री. सुरवडकर, गटशिक्षणाधिकारी शहागडकर, इकबाल सिद्दीकी, मकरंद शेवलीकर आदींची उपस्थिती होती.

### ३३ वे आचार्य पदरोहण संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

भारतभूमी युगानुयुगे ऋषीमुनींची भूमी आहे, हे या वसुंधरेचे मोठे भाग्य आहे की येथे अनेक महापुरुषांचा जन्म झाला. श्रमण मुनिश्री विशेषसागर जी महाराजानी पं. पू. भारत गौरव गणाचार्य श्री १०८ विरागसागरजी गुरुदेवांच्या ३३ व्या आचार्य पदारोहण दिनाच्या शुभमुहूर्तावर धार्मिक मेळाव्याला संबोधित करताना सांगितले.

पू. मुनीश्री पुढे म्हणाले की, या भारत भूमीत ७१ वर्षांपूर्वी मध्य प्रदेशातील तपोमाती येथील पथरिया गावात आई श्यामा यांनी एका मुलाला जन्म दिला, त्याचे नाव अरविंद होते. वयाच्या १६ व्या वर्षी अरविंद घर सोडून क्षु.दीक्षा घेतली. चार वर्षांनंतर प. पू. आचार्य श्री विमलसागर जी महाराजांकडून औरंगाबाद (महा) येथे मुनि दीक्षा घेवून त्यांचे नाव मुनीश्री १०८ विरागसागर जी महाराज ठेवले होते.

# महायुती सरकार यंदा जनता दाखविणार घरचा रस्ता -पटोले

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

विकासाचे गाजर दाखवून राज्यात सत्तेत आलेल्या महायुतीतील मंडळींनी महाराष्ट्र राज्याला केवळ लुटण्याचे काम केले आहे. राज्यातील प्रमुख उद्योग गुजरातला पळवून लावण्याचे पाप करणाऱ्या महायुती सरकारला या निवडणुकीत जनता निश्चितपणे घरचा रस्ता दाखविल्याशिवाय राहणार नाही असा ठाम विश्वास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ. नानाभाऊ पटोले यांनी आज येथे बोलतांनी व्यक्त केला.


जालना विधानसभा मतदार संघातील इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ. कैलास गोरंट्याल यांच्या प्रचारार्थ शहरातील हॉटेल अमितमध्ये आज शनिवारी आयोजीत करण्यात आलेल्या विराट जाहिर सभेत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख हे होते. तर खा. चंद्रकांत हंडोरे, खा. डॉ. कल्याण काळे, जालना लोकसभा प्रभारी माजी मंत्री डॉ. पी. सी. शर्मा, पक्षाचे जिल्हा प्रभारी मा. आ. नामदेवराव पवार, आ. राजेश राठोड, मा. आ. वजाहत मिर्झा, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर,



जेष्ठनेते एकबाल पाशा, नवाब डांगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, राजेंद्र राख, विजय चौधरी, युवानेते अक्षय गोरंट्याल, राम सावंत, भिमशक्तीचे प्रमोदकुमार रत्नपारखे, बदर चाऊस, रिपाईचे जिल्हाध्यक्ष किशोर मघाडे, दिनकर घेवंदे, आपचे संजोग हिवाळे, सपाचे अमजद फारूखी, नंदकिशोर जांगडे, अखबर खॉ, अब्दुल रऊफ परस-वाले आदींची व्यासपिठावर उप-स्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना पटोले म्हणाले की, मराठवाडा विभागासाठी उपयुक्त असलेली मराठवाडा वॉटरग्रीड योजना पुर्ण करून या योजनेच्या माध्यमातून विभागातील प्रत्येक शहर आणि जिल्हयातील शेतकऱ्यांना पाणी देण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी सरकारच्या काळात केला जाईल. शेतीवर आधारीत उद्योग उभे करून त्या माध्यमातून युवक, महिलांना रोजगार निर्मितीचा प्रयत्न देखील केला जाईल असे स्पष्ट करून शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी देण्यासह लाडक्या बहिनींना प्रतिमहा ३ हजार, बेरोजगार तरूण, तरूणींना प्रतिमहा ४ हजार रूपये आणि सर्वसामान्य कुटूंबातील व्यक्तींना २५ लाख रूपयापर्यंत मोफत उपचारासह औषधी उपलब्ध करून देण्यात येईल अशी ग्वाही महाविकास आघाडीने आपल्या वचननाम्यात दिली आहे. याशिवाय राज्यात सद्या विविध सरकारी कार्यालयात सुरू असलेली कंत्राटी कर्मचारी भरतीची पध्दत बंद करून नियमित कर्मचारी भरती केले जाईल पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर पटोले यांनी टिकास्त्र सोडून या मंडळींनी शेतकऱ्यांच्या सोयाबिन, कपाशीसह इतर शेतपिकाला भाव मिळाला पाहिजे यासाठी कधीही ब्र शब्द काढला नाही. एकीकडे हिऱ्याच्या किंमती सहा महिन्याला वाढतात आणि कापूस सोयाबिनचे दर का? वाढत नाही असा सवाल उपस्थित करत भाववाढ तर दिली नाहीच उलट मागील दहा वर्षात शेतकऱ्यांच्या मालाचे भाव कमी करून शेतकऱ्यांना आथक अडचणीत आणण्याचे पाप केंद्र आणि राज्यातील भाजपा प्रणित सरकारने केल्याचा आरोप नानाभाऊ पटोले यांनी केला. महाराष्ट्राच्या तिजोरीत जीएसटीच्या रूपाने सर्वाधिक कर जालना जिल्ह्यातून जमा होतो. ही बाब लक्षात घेवून राज्यात मविआचे सरकार आल्यास जालना जिल्ह्याला भरीव निधी देण्यात येईल असे पटोले यांनी यावेळी सांगीतले. या सभेसाठी शहरातील चारही बाजूंनी पदाधिकारी कार्यकर्ते आणि समर्थकांनी ढोल-ताशांचा गजरात मिरवणूकीने येत सभेला हजेरी लावली. तत्पुर्वी शिव-सेनेचे प्रदेश सचिव डॉ. संजय लाखे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, अखबर खॉ आदींनी आपल्या भाषणातून गोरंटयाल यांना विजयी करण्याचे आवाहन केले. संचलन राम सावंत यांनी तर शेवटी आभार विनोद यादव यांनी मानले.

## पोस्टाच्या पार्सलद्वारे मागविलेल्या २ तलवारी,१ खंजीर जप्त



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

दिनांक ०९/११/२०२४ रोजी जालना जिल्हयातील अवैध शस्त्रे बाळगणा-या आरोपीची माहिती घेऊन त्यांचा शोध घेणे कामी विशेष मोहीम राबवणे संदर्भात मा. पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बंसल, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांचे सुचनेवरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक निर्माण करुन जालना जिल्हा हद्दीतील अवैध शस्त्रे बाळगणा-या आर-ोपीतांची माहिती घेऊन शोध घेत असतांना खब-या मार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, चंदनझिरा जालना येथील एका विधीसंघर्षग्रस्त बालकाने त्याचे नावावर धारधार तलवारी व खंजीर पोस्टाद्वारे मागिवलेल्या असुन सदर तलवारी व खंजीर डिलीव्हरी साठी आज रोजी येणार असल्याची माहिती प्राप्त झाली अशी माहिती मिळाल्यावर सदरची माहिती वरिष्ठांना कळवुन वरिष्टांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार गांधी चमन पोस्ट ऑफीस रेल्वे स्टेशन रोड जालना येथे सापळा लाऊन गुप्त बातमीदारांनी कळविलेल्या वर्णनाचे दोन इसम मोटारसायकलवर एक खाकी रंगाचा आयताकृती बॉक्स घेऊन जातांना दिसल्याने सदर इसमांना मोटारसायकलसह ताब्यात घेऊन त्यांना विचारपुस केली असता त्यापैकी १. शेख अरबाज शेख मसुद वय २० वर्षे, रा. साई मंदीरा जवळ चंदनझिरा व दुसरा विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे समजले त्यांच्या कडील खाकी रंगाच्या आयताकृती पुठ्ठ्याच्या बॉक्स ची पंचासमक्ष झडती घेतली असता, त्यामध्ये ६००० रु किंमतीच्या ०२ धारधार तलवारी व १२००/- रूपये किमंतीचा ०१ धारदार पाते असलेला खंजीर मिळुन आला. सदरचे ०२ धारधार तलवारी व ०१ खंजीर जप्त करण्यात आले असुन सदर आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालकाविरुद्ध पोलीस ठाणे कदिम जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अर्जुनराव खोतकर यांचा ग्रामीण आणि शहरी भागात डोअर टू डोअर प्रचार

# मतदार संघास पुन्हा विकासाच्या उंचीवर नेणार -खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महायुतीचे (शिवसेना) अधिकृत उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनी ग्रामीण भागासह शहरी भागात सुध्दा डोअर टू डोअर जाऊन प्रचाराचा धडाका लावला आहे. त्यामुळे सहाजिकच विरोधकांच्या तंबूत घबराहट पसली असून आपण सत्तेवर नसतांनाही ग्रामीण तसेच शहरी भागाचा विकास केला आहे, तर विरोधक मात्र टक्केवारी घेण्यात मशगुल असल्याची टिका श्री. खोतकर यांनी केली आहे.

जालना विधानसभा-१०१ मतदार संघातील सोमनाथ, राममुर्ती, जळगांव, सो. जळगांव तांडा, मजरेवाडी, सिंधी काळेगांव, आदी गावांना तसेच शहरातील विविध प्रभागांना श्री. खोतकर यांनी भेटी दिल्या.

श्री. खोतकर यांनी भेटी दिल्या. यावेळी गावकर्यांनी त्यांचे फटाके वाजवून जोरदार स्वागत केले. यावेळी बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, गेल्या अनेक वर्षापासून आपण समाजकारण आणि राजकारण करीत आहोत, परंतू विरोधकांसारखे घाणेरडे राजकारण कधीच पाहिले नाही. ज्या- ज्या पदावर काम करण्याची संधी मिळाली ते काम अत्यंत प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न करण्यात आला. वैयक्तीक आरोग्य बील कमी करण्यासंदर्भात किंवा ॲडमीशन संदर्भात तसेच शेतकर्यांचा पीक विमा मिळवून देण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची धरणे आंदोलन, मोर्चे, रास्ता राको अशा अनेक प्रकारचे आंदोलन उभा करुन न्याय



> **बिनबुडाचे आरोप!**
> याच सभेदरम्यान श्री. खोतकर यांनी गोरंट्यालचा खरपूस समाचार घेतला. ते म्हणाले की, हा माणूस आपल्यावर नको ते खोटे नाटे आरोप करुन मते मिळविण्याचा प्रयत्न करत आहे. परंतू त्यांचा हा प्रयत्न मतदार नक्कीच हाणून पाडतील, असा विश्वास व्यक्त करुन खोतकर म्हणाले की, बिनबुडाचे आरोप आपल्याही करतात येतात. परंतू काही तरी पुरावा असल्याशिवाय आपण असे बिनबुडाचे आणि घाणेरडे आरोप करत नाहीत.

मिळवुन देण्याचे काम केले आहे. कुडल्याही प्रकारची तक्रार असू द्या किंवा अडचण ती सोडवण्यासाठी आपण जनतेसाठी चोवीस तास उपलब्ध असतोत. अर्जुनराव खोतकर आणि त्यांच्या मित्र मंडळीनी डोअर टू डोअर जातांनाच वैयक्तीक भेटीवर भर दिला असल्याने त्यांचा विजय निश्चित मानण्यात येत आहे. याप्रसंगी शेतकरी, शेतमजूर, माता- भगिनी, विद्यार्थी, वाहनधारक, ड्रायव्हर व अन्य घटकातील समाजबांधवांसह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवा सेना, महिला आघाडी आदींची मोठ्या संख्येने उप-स्थिती होती.


अभिजीत राठोड (टायगर) यांच्या नेतृत्वात शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला यावेळी शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनी सर्वांना शिवसेना पक्ष प्रवेश केल्याबद्दल धन्यवाद दिले. आपण योग्य वेळी प्रवेश केल्यामुळे आपली ताकद आणखी मजबूत झाल्याचे श्री. खोतकर यांनी सांगितले. यावेळी अभिजीत राठोड (टायगर), राजू राठोड, भोपू राठोड, पृथ्वीराज राठोड, आकाश राठोड, ज्ञानेश्वर राठोड, करण राठोड, विकास राठोड, देवानंद चव्हाण, सुनील राठोड, संदीप चव्हाण, उमेश राठोड, अभिजीत चव्हाण, यो-गीराज राठोड, अक्षय राठोड, केवल राठोड, विराट राठोड, सोन्या राठोड, बाळू राठोड, अभिजीत चव्हाण,पवन राठोड, गजानन चव्हाण, बाळू राठोड, अविनाश सुराशे, स्वप्निल साळवे, विजय हवाले, ज्ञानेश्वर जाधव, आकाश जाधव, आदींनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख भगवानराव आंबोरे युवा सेना तालुकाप्रमुख नागेश डवले कडूबा इंदलकर गावातील अशोक चव्हाण, राम राठोड, परमेश्वर शिंदे, ज्ञानेश्वर माऊली पडोळ, विठ्ठल एखंडे, राम एखंडे, सर्जेराव गायकवाड आदींची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

शिवचैतन्य जागरण यात्रेनिमित्त्याने अंबाजोगाईत प्रवचन

# छत्रपती शिवाजी महाराजांनी भव्य आणि उदात्त आदर्श सर्वांसमोर ठेवला- स्वामी गोविंदगिरीजी महाराज

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.९ नोव्हेंबर**



छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला नवसंजीवनी प्राप्त करून दिली त्यांच्या स्वयंभू शक्तीचा आदर्श सर्वांसमोर असून हाच भव्य आणि उदात्त आदर्श जगाला प्रेरक असल्याचे मत श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास अयोध्या येथील कोषाध्यक्ष स्वामी गोविंदगिरीजी महाराज यांनी येथे व्यक्त केले. ते शनिवारी अंबाजोगाईत दासोपंत संशोधन मंडळाच्या वतीने आयोजित शिवचैतन्य जागरण यात्रेनिमित्त प्रवचनातून बोलत होते.

सविस्तर मार्गदर्शनात बोलताना ते म्हणाले की महाराष्ट्राची प्राणशक्ती म्हणजे शिवचैतन्य होय धर्म जागला पाहिजे यासाठीच छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या हिंदवी स्वराज्य स्थापनेचे महत्त्व लक्षात घेऊन आयोजिलेली ही शिवचैतन्य यात्रा होय. सिंहासनाधिष्ठित छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या ऐतिहासिक कार्याची नोंद जगभरात घेतली गेली हा इतिहास गौरव शाली आहे. क्रांतीचे प्रेरणास्थान म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होते त्यांच्या प्रेरणा सर्वांनीच घेतल्या म्हणून तिथे यश प्राप्त झाले. छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा आजच्या युगातही जागृत व्हायला हवी तरच हे राष्ट्र पुन्हा नव तेजाने झळकेल आणि हिंदुत्वाचा विश्वमंत्र जगात पोहंचल्या शिवाय राहणार नाही असेही ते म्हणाले. यावेळी दासोपंत संशोधन मंडळाच्या षोडशवतार दिनदर्शिकेचे विमोचन महाराजांच्या हस्ते करण्यात आले यावेळी स्वामीजींचे स्वागत मंडळाचे मार्गदर्शक डॉ.भाऊसाहेब देशपांडे व अध्यक्ष अरूण देशपांडे यांच्या हस्ते ग्रंथ व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आले. तसेच उपस्थित मान्यवर संत महंतांचे स्वागत मंडळाचे पदाधिकारी प्रा.जितेंद्र देशपांडे,राहुल देशपांडे, लक्ष्मीकांत गोस्वामी,कौस्तुभ कोदरकर,संजय देशपांडे, अमोल महाराज घोडके,विष्णू इर्ले,विनोद निकम, मुकूंद घाटे यांच्यासह इतरांनी केले सर्वज्ञ दासोपंत,नृसिंह सरस्वती वेदपाठ शाळेच्या विद्यार्थ्यांनी मंत्रपठण केले तर पंचमवेद अकादमीच्या विद्यार्थिनींनी शास्त्रीय नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दासोपंत संशोधन मंडळाचे अध्यक्ष अरुण देशपांडे यांनी केले तर अध्यक्षीय समारोप मंडळाचे मार्गदर्शक डॉ. भाऊसाहेब देशपांडे यांनी केला. कार्यक्रमाचे संचालन व उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.गणेश पिंगळे यांनी मानले या कार्यक्रमासाठी विविध ठिकाणाहून संत महंत यांच्यासह महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

शोभायात्रा उत्साहात युवकांचा मोठ्या संख्येने सहभाग

शिवचैतन्य जागरण यात्रे निमित्त्याने सकाळी भव्य शोभायात्रा मोठ्या उत्साहात काढण्यात आली.या शोभायात्रेत युवकांचा मोठा सहभाग होता.शहरातील विविध महत्वपुर्ण चौक,मुख्य रस्ते आदी ठिकाणाहून या शोभायात्रेने मार्गक्रमण केले. शहरातील ठिकठिकाणच्या रस्त्यावर मुख्य चौकात रांगोळ्या काढून भगव्या पताका,ध्वज घेवुन शोभायात्रेचे शहरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले.

# माध्यम कक्षास जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ नोव्हेंबर**

बीड जिल्ह्यातील विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात माध्यम कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या माध्यम कक्षास जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीचे अध्यक्ष अविनाश पाठक यांनी आज भेट दिली. तसेच कक्षामध्ये सुरू असलेल्या जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीचे कामकाज, मुद्रित, इलेक्ट्रॉनिक व समाज माध्यमांच्या कामकाजांचा त्यांनी आढावा घेतला व मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी अर्पिता ठुबे, निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, स्वीपचे नोडल अधिकारी ओमकार देशमुख, प्र.जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके, तहसीलदार अविनाश शिंगटे, माध्यम कक्षातील सहायक कक्ष प्रमुख् राजश्री आचार्य, इंग्रजीच्या प्रोफेसर डॉ. संगीता ससाणे, हिंदीचे प्राध्यापक डॉ. राजेंद्र सोनवणे, उर्दूचे अनुवादक शेख मोहम्मद काजिमोद्दीन यांच्यासह माध्यम कक्षातील सर्व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# बीड विधानसभा मतदारसंघात गृह मतदानाला आजपासून सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ नोव्हेंबर**

बीड विधानसभा मतदार संघात आज सकाळी ०७ वाजेपासून ८५ वर्षांवरील, दिव्यांग असलेल्या पात्र मतदारांच्या घरी जाऊन टपाल मतपत्रिकाद्वारे मतदान (गृह मतदान) घेण्यास सुरुवात झाली आहे. या मतदार संघात असे एकूण ३०७ पात्र मतदार आहेत. सदरील मतदान उद्या, रविवारी (ता. १०) सायंकाळी ०५ वाजेपर्यंत घेण्यात येईल. यासाठी एकूण २२ पथके नेमले आहेत, असे बीड विधानसभेच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी कळवले आहे.

# भागुजीराव ढेकळे विद्यालयाच्या खेळाडूचे विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.९ नोव्हेंबर**

छत्रपती संभाजीनगर विभागीय स्टेडियम गारखेडा येथे संपन्न झालेल्या विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेत कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या खेळाडूने घवघवीत यश संपादन केले आहे.

या क्रीडा स्पर्धेमध्ये १९ वर्षे वयोगटातील कु.जाधव क्रांती मारुती या विद्यार्थिनीने १०० मीटर धावणे, ८०० मीटर धावणे मध्ये द्वितीय क्रमांक, गोळा फेक तृतीय क्रमांक संपादन केला. या विद्यार्थिनीची १०० मी धावणे व ८०० मी धावणे या क्रीडा प्रकारांमध्ये राज्यस्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याचबरोबर १७ वर्ष वयोगटातील चि.दाभाडे शिवदत्त याने या स्पर्धेमध्ये ४०० मीटर धावणे या प्रकारात द्वितीय क्रमांक संपादन केला. त्याचीही राज्यस्तरीय स्पर्धेकरीता निवड झाली आहे. दोन्ही खेळाडूंनी या मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये मिळवलेल्या नेत्रदीपक यशाबद्दल आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव, माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, प्रशासन अधिकारी प्रा. राजा



मचाले, कार्यवाहक एम. ए. राऊत, कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए.एस., पर्यवेक्षक राजेंद्र रांजवन, राजेंद्र सोनवणे, क्रीडा शिक्षक घोरड आर. डी., प्रा.कळासे ए.आर., घरत आर.के., सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, समस्त ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# आ.पवार यांच्या प्रचार दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.९ नोव्हेंबर**

दहा वर्ष भाजपा मध्ये इमानदारीने काम केले. सत्ता आज आहे उद्या नाही, जनते पुढे सत्ता कस्पटासमान आहे. मला, गेवराई आणि गेवराई मतदारसंघातील सर्व जातीधर्मातील जनता महत्त्वाची आहे. पवार घराणे त्यांचे आहे आणि ते आमचे आहेत. त्यामुळे, ज्यांनी माझा व जनतेचा अपमान केला. त्या पक्षात पुन्हा कशाला जाऊ, सोन्याचे ताट दिले तरी, ते आम्हाला नको, म्हणून निवडून आलो तरी भाजपात जाणार नाही अशी स्पष्ट भूमिका आ.लक्ष्मण पवार यांनी आपल्या प्रचार सभेत बोलताना व्यक्त केली.

शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर रोजी उमापूर ता. गेवराई येथील आयोजित करण्यात आलेल्या प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, बाळराजे पवार म्हणाले होते, तुला राजकारणात यायचे असेल तर, इमानदारीने काम करावे लागेल. पाटील म्हणून काम करताना, जाती पातीचा विचार मनात आणायचा नाही. शहरातील शांतता आणि सलोखा निर्माण करावा लागेल. आमदार झालास तर, अनेक वर्षांपासूनचा रखडलेला विकास, इथली हुकुशाही मोडीत



काढावी लागेल. लोक आपले गुलाम नाहीत. आपण, त्यांचे नौकर आहोत. या पद्धतीने वागावे लागेल असे मार्गदर्शन दादांनी केले. त्याच पाऊलवाटेवर चालतो आहे. म्हणून दोन वेळा आमदार झालो तरी उतलो नाही, मातलो नाही. बदला घ्यायच्या भावनेने वागलो नाही. दहा वर्ष पक्षाचे इमानदारीने काम केले. विकासात भर घातली. अचानक आजारी पडलो. संपर्क कमी झाला. मात्र, मुंबई, पुणे, बीडच्या शासकीय बैठकींना हजर राहीलो. एक ही बैठक टाळली नाही. आजाराचे भांडवल करायचे नाही. पण, ज्यांना अनुभव आलाय, त्यांनाच तो त्रास माहित आहे. तरीही, तुमच्या पाठिंब्यावर ताठ उभा आहे. पुन्हा एकदा आशीर्वाद द्या, निवडून आलो तरी कधीच भाजपात जाणार नाही. असा शब्द आ. लक्ष्मण पवार यांनी यावेळी बोलताना दिला. उमापूर च्या जनतेवर विश्वास आहे. त्यांनी दोन्ही वेळा भरभरून प्रेम दिले आसल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. दरम्यान आ.पवार यांच्या प्रचार दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून विकासाच्या जोरावर त्यांची रिक्षा सुसाट सुटल्याचे दिसून येत आहे. यावेळी परिसरातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व मतदार बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

यावेळी जे.डी.शहा.महेश आहेर,राहुल खंडागळे,भागवत आतरकर,दादासाहेब गिरी,याहिया खॉन, अशोक वडघणे,कैलास पवार, गौरव खरात, बळीभाऊ करे सुदंर धस, विक्रम भोसले,बबलु शेख,आशफाक कुरेशी,शरद मोटे,जगन पवार, राजेंद्र मोटे,मतिन कुरेशी,शौहेब आत्तार आदि उपस्थित होते..

# राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे माजलगाव मतदार संघाचे अधिकृत उमेदवार मोहनराव जगताप यांना नितीन नाईकनवरे यांचा जाहीर पाठिंबा



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ नोव्हेंबर**

आज दि ९ रोजी नितीन नाईकनवरे यांनी पत्रकार परीषदेचे आयोजन केले होते या पत्रकार परीषदेत शहरातील अनेक पत्रकार उपस्थित होते तसेच नितीन नाईकनवरे यांचे शहरातील आणि तालुक्यातील सर्वच कार्यकर्ते यांची देखील बर्या पैकी उपस्थिती होती तसेच महाविकास आघाडीचे सर्वच कार्यकर्ते यांची प्रचंड प्रमाणात उपस्थिती होती माजी आमदार बाजीराव जगताप मिलिंद आव्हाड सहाल भैय्या चाऊस नारायण होके पाटील

दयानंद भाऊ स्वामी नारायण डक तसेच ईतर ही कार्यकर्ते उपस्थित होते यामध्ये विशेष उपस्थिती माजलगाव मतदार संघाचे अधिकृत उमेदवार ( शरद पवार गट ) मोहनराव जगताप हे उपस्थित होते नितीन नाईकनवरे आणि मोहनराव जगताप या दोघांचेही कार्यकर्ते उपस्थित होते या सर्वांच्या उपस्थितीत नितीन नाईकनवरे यांनी मोहनराव जगताप यांना माझा व माझ्या कार्यकर्त्यांचा जाहीर पाठिंबा आहे असे त्यांनी या सांगितले नितीन नाईकनवरे आणि मोहनराव जगताप या दोघांनेही मिळुन माजलगाव मतदार संघात काम करू आणि कसल्याही प्रकारचा जातीवाद न करता सर्व मतदार संघाचा विकास करण्याचे सांगितले.

# क्षीरसागरांच्या पापांचा घडा भरला; शहर-ग्रामीण भागातील मतदार अनिलदादांच्या पाठीशी-प्रा.सुरेश नवले

## बीडच्या सर्वांगीण विकासाठी मला संधी द्या; अनिलदादा जगताप यांचे मतदारांना आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ नोव्हेंबर**

गेली अनेक वर्ष सत्ता भोगून क्षीरसागरांना केवळ बीडकरांच्या विश्वासाचा घात करत स्वतःचे घरं भरण्याचे काम केले आहे आणि बीडकरांना विकास तर सोडाच पण मूलभूत गरजांपासून वंचित ठेवण्याचे महापाप केले आहे. सत्तेचा ताम्रपट घेऊन क्षीरसागरांच्या पिढ्यानुपिढ्या बीडवर आपली मक्तेदारी चालवत आल्या आहेत व बीड विकासाचा खेळखंडोबा करत आहेत. मात्र क्षीरसागरांच्या पापांचा घडा भरला असून सामान्य घरातील बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांच्या पाठीशी शहर-ग्रामीण भागातील मतदार मोठ्या ताकदीने उभा राहिला असल्याचे माहिती माजी राज्यमंत्री प्रा. सुरेश नवले यांनी दिली आहे.

काल दि. ७ नोव्हेंबर रोजी सकाळपासून बीड विधानसभेचे उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांनी बीड मतदार संघातील चौसाळा जिल्हा परिषद गट पिंजून काढला असून वानगाव, गोगलवाडी, रौळसगाव, खडकी घाट, चांदेगाव, देवीबाभळगाव, जेबापिंप्री, पालसिंगण, हिंगणी खु., हिंगणी बु., रूईगव्हाण / माळेवाडी, मानेवाडी, पिंपळगाव घाट, वाढवणा, चौसाळा या सर्व गावात जाऊन कॉर्नर बैठका घेत ग्रामस्थांच्या गाठीभेटी घेतल्या. तसेच त्यांच्याशी मुक्त संवाद साधला व त्यांच्या समस्या जाणून घेत त्यांना अनुक्रमांक १३ चिन्ह शिवण यंत्र यावर बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले. दरम्यान शहर आणि ग्रामीण भागातील मतदारांनी सुद्धा यंदाच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांना निवडून देण्याचा निर्धार केला आहे. याप्रसंगी अनिलदादा जगताप यांच्यासोबत सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. सर्वच गावात ठीकठिकाणी अनिलदादा जगताप आणि प्रा सुरेश नवले यांचा हृदय सत्कार करून मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

बीडच्या सर्वांगीण विकासाठी मला एकदा संधी द्या- अनिलदादा जगताप

काल रोजी माजी राज्य मंत्री प्रा सुरेश नवले यांच्यासह बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांनी शहर आणि ग्रामीण भागात कॉर्नर बैठका घेऊन ग्रामस्थांच्या गाठीभेटी घेतल्या. यादरम्यान अनिलदादांनी मतदारांना बीडच्या सर्वांगीण विकासाठी मला एकदा संधी द्या. मी आपल्या अपेक्षेप्रमाणे बीडकरांच्या मूलभूत गरजा पूर्ण करून बीडच्या विकासाचा कायापालाट करून दाखवेल फक्त मतदानरुपी मला एकदा आशीर्वाद द्या अशी विनंती करत अहवान केले.

# मंगळवारी चातुर्मासउत्सव ज्ञानेश्वरी प्रवचन सेवेची सांगता

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ नोव्हेंबर**



बीड येथील स्वराज्य नगर मधील ज्ञानेश्वरी भावकथा प्रवक्ते ह भ प माधव महाराज डाके काठवडेकर यांच्या माऊली निवास येथे दरवर्षी चातुर्मास् उत्सवानिमित्त प्रति सोमवारी ग्रंथराज ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा आयोजित केली जाते. या चातुर्मास उत्सव प्रति सोमवार प्रवचन सेवेचे हे ९वे वर्ष आहे. या उत्सवात प्रति सोमवारी या चातुर्मास उत्सवानिमित्त ग्रंथराज ज्ञानेश्वरीवर नामवंत प्रवचनकार कीर्तनकार भागवत कथाकार आदी महाराज मंडळींची प्रवचन सेवा संपन्न झाली आहे .या प्रवचन सेवेच्या उत्सवानिमित्त सुरू असलेल्या प्रवचन सेवेची सांगता प्रबोधिनी एकादशी, कार्तिक शुद्ध एकादशी दिवशी म्हणजेच दि. १२/११/२४ रोजी रात्री ७ते८ या वेळेत ह भ प दादासाहेब गीते महाराज खंडाळा यांच्या प्रवचन सेवेने होणार आहे . सर्व भाविक भक्तांनी या चातुर्मास उत्सव सांगतेच्या प्रवचन सेवेचा लाभ घ्यावा असे ज्ञानेश्वरी भावकथा प्रवक्ते ह भ प माधव महाराज डाके यांनी केले आहे.

# विविध कॉर्नर बैठकांमध्ये मतदारांशी साधला संवाद

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.९ नोव्हेंबर**

विधानसभा मतदार संघातील जनता हा विकास केंद्रबिंदू मानून शिवछत्र परिवाराने सत्ता नसताना देखील विकासाची गंगा गावा-गावातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. हा विकासाचा यज्ञ कायम सुरु ठेवण्यासाठी येणाऱ्या २० तारखेला मतदार राजाने जागरूक होवून विरोधकांच्या अपप्रचाराला बळी न पडता महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन युवा नेते रणवीर पंडित यांनी केले. विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ विविध ठिकाणच्या कॉर्नर बैठकांध्ये मतदारांशी चर्चा करताना ते बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ रणवीर पंडित यांनी गेवराई विधानसभा मतदार संघातील बोरगाव थडी, राहेरी, गंगावाडी, पांगुळगाव, मिरगाव, पांढरी, तलवाडा, अर्धमसला, गायचारी तांडा, भिलखोरी तांडा, भेंड गावांचा झंझावाती प्रचार दौरा करून विजयसिंह पंडित यांच्या प्रचाराचा धडाका लावला.




दिपावली सणानिमित्त सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा....

शुभेच्छुक
मा.सुधाकर जाधव
पोखर्णीकर, जिंतूर





कनक कॉटन ॲग्रो इंडस्ट्रिज प्रा.लि.
येलदरी रोड, जिंतूर ४३१ ५०९ जि.परभणी
प्रो.प्रा.ब्रिजगोपाल तोष्णीवाल

वरद ऑईल इंडस्ट्रिज
येलदरी रोड, जिंतूर- ४३१५०९
प्रो.रविंद्र बियाणी

केसर गोल्ड ॲग्रो ॲण्ड फ्रुड प्रोडक्ट
येलदरी रोड, जिंतूर- ४३१५०९
प्रा.पंकज तोष्णीवाल

ब्रिजगोपाल रामनारायण तोष्णीवाल- कार्याध्यक्ष- श्री.ओंकारनाथ मालपाणी
महाराष्ट्र महेश सेवा निधी मो.नं.९४२२१७६७७०





दिपावली सणानिमित्त सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा....

शुभेच्छुक
मा.श्री.संदीप लकडे
सरपंच - यसेगाव ता.जिंतूर





दिपावली सणानिमित्त सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा....
एकलव्य बाल विद्या मंदिर प्राथमिक, माध्यमिक विद्यालय, जिंतूर जि.परभणी




मा.श्री.गोविंद लहाने जिंतूर







सर्व नागरिकांना दिपावली सणानिमित्त सर्व नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा....

शुभेच्छूक
राजेंद्र नागरे
सभापती - कृषि उत्पन्न बाजार समिती, बोरी, ता.जिंतूर जि.परभणी





दिपावली सणानिमित्त
सर्व नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा....



विकास जाधव
अंबरवाडीकर
वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना, जिल्हा अध्यक्ष परभणी





सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



### शस्त्राने रिक्षा चालकावर हल्ला

छत्रपती संभाजीनगर : बहिणीला मारहाण केल्याने समजावून सांगण्यात गेलेल्या रिक्षा चालकावर नातेवाईकांनी धारदार शस्त्राने हल्ला केल्याची घटना आंबेडकर चौक परिसरात घडली. या प्रकरणी सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन रामराव अंभोरे, दिलीप रामराव अंभोरे रा. संत ज्ञानेश्वर नगर, दीपक रामराव अंभोरे रा. जाधववाडी अशी आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी गणेश प्रकाश आव्हाड रा. फकिरवाडी हसुल यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार ७ नोव्हेंबर रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास बहिणीला मारहाण केल्याने फिर्यादी हे त्यांना समजून सांगण्यासाठी आरोपींच्या घरी गेले होते. त्यावेळी आरोपींनी फिर्यादीला आंबेडकर चौकात बोलावून घेत शिवीगाळ करीत मारहाण केली.

### महिलेवर बलात्कार

छत्रपती संभाजीनगर : तुझे फोटो व्हायरल करेल, अशी धमकी देत महिलेवर बलात्कार केल्याची घटना मुकुंदवाडी रेल्वे पटरीच्या पलीकडे घडली. याप्रकरणी मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चंद्रकांत भालेराव रा. मुकुंदवाडी रेल्वे पटरीच्या पलीकडे असे आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार ९ जानेवारी ते एक नोव्हेंबर या दरम्यान आरोपीने महिलेला लग्नाचे आमिष दाखवून जवळीक साधली होती.

### रिक्षाचालकाने घेतली रेल्वेसमोर उडी

छत्रपती संभाजीनगर : कौटुंबिक वादातून एका रिक्षाचालकाने धावत्या रेल्वेसमोर उडी मारत आत्महत्या केली. हा प्रकार गुरुवारी (७ नोव्हेंबर) रात्री साडेआठच्या सुमारास बनेवाडी परिसरात घडला. शेख इरफान शेख नबी (४२, रा. शरीफ कॉलनी) असे आत्महत्या करणाऱ्या रिक्षाचालकाचे नाव आहे. इरफान यांना दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. गुरुवारी इरफान यांचा कौटुंबिक वाद झाला. त्याचा राग मनात धरून त्यांनी थेट बनेवाडी परिसरातील लोहमार्ग गाठत धावत्या रेल्वेसमोर उडी घेत आत्महत्या केली. हा प्रकार लोहमार्ग पोलिसांना समजताच त्यांनी तत्काळ जखमी अवस्थेत इरफान यांना घाटी रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. या घटनेप्रकरणी लोहमार्ग पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### ड्रग्ज विक्री करणारे दोघे ताब्यात एक फरार

छत्रपती संभाजीनगर : शहरात ड्रग्ज विक्री करणाऱ्या दंघांना सायबर पोलिसांनी बेड्या ठोकल्या. त्यांच्याकडून १५ हजार रुपयांचे ड्रग्ज, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी आणि मोबाईल असा सुमारे ९५ हजारांचा ऐवज हस्तगत केला आहे. दोघांना ड्रग्ज पुरविणाऱ्या पेडलररूह त्याची अवई मात्र पसार अहे. व्यांच्या शोधासाठी दोन पथके रवाना झाल्याची माहिती निरीक्षक शिवचरण पांढरे यांनी दिली. अनन बेग सलीन बेग (२१) आणि शेख शहेजान शेख शहेबाज (१९, दोघे रा. शहाबाजार) अशी आरोपींची नावे आहेत, तर पेडलर दाऊद पठाण आणि त्याची आई (रा. नूर मशीदजवळ, बायजीपुरा) अशी पसार आरोपीची नावे आहेत. गुन्हे शाखेचे हवालदार सुनील जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, हिमायतबागसमोर एक व्यक्ती एमडी पावडर विक्री करण्यासाठी येणार आहे. माहितीच्या आधारे गुरुवारी सायंकाळी पांढरे व त्यांच्या पथकाने सापळा रचला. साडेपाच वाजेच्या सुमारास अमन हा विना क्रमांकाच्या दुचाकीवर आला. तो संशयित हालचाली करताना दिसल्याने पोलिसांनी त्याला पकडले.

## चकवागिरी करणाऱ्याना जनता चकवा दाखवेल : केतन काजे

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०९ नोव्हेंबर – कन्नड-सोयगाव विधानसभेत चकवागिरी करणाऱ्यांना जनता चकवा दाखवेल येत्या २४ तारखेला भूमिका स्पष्ट करणार असल्याची माहिती त्यांनी दि.०९ रोजी पत्रकार परिषदेत दिली

प्रसारमाध्यमातून निलंबनाची बातमी प्रसिद्ध झाली होती त्याअनुषंगाने शिवसेना शिंदे गटाचे केतन काजे यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली नाराजी उघड केली,शिवसैनिकांनी धनुष्यबाण खांद्यावर घेऊन तालुक्यात शिवसेना



उभी केली त्याच शिवसैनिकांना आता खांद्यावरचा धनुष्यबाण खाली ठेवण्यासाठी भाग पाडले आहे,अन्याय सहन करणारा हा शिवसैनिक नाही,जो निवडून येणारा उमेदवार असेल त्याला आमचे समर्थन असणार आहे,एकाच घरात दोन वेगवेगळ्या मतदारसंघात पराभव बघावे लागेल असा इशारा त्यांनी दिला,तालुक्यातील राजकारणाची परिस्थिती बघता हुकूमशाही पध्दतीने दबाव तंत्राचे वापर करण्यात येत आहे,जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत दोन ते अडीच हजार मतांनी पराभव झालेल्या उमेदवाराला विधानसभेची संधी मिळते कशी जनतेला सगळं कळतंय,कोणताही निर्णय घ्यायचा असेल तर भोकरदनला विचारावे लागते उद्याची परिस्थिती गंभीर असणार आहे,कन्नडची रेल्वे पळून नेली,बोगद्यासाठी साधा ब्र शब्द सुद्धा काढला नाही आणि तेच तालुक्याचे भविष्य ठरवतील का असा टोला त्यांनी रावसाहेब दानवे यांना लगावला,तालुक्यातील विकास कामे हे कसे करू शकतील ऐनवेळी दबाव तंत्र वापरून उमेदवारी मिळवली ते काय विकास करणार आहेत,येत्या २४ तारखेला भूमिका स्पष्ट करणार असल्याचे त्यांनी सांगितले, माझी भूमिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सांगितलेली आहे,काही प्रसारमाध्यमे हे भोकरदन वरून आलेल्या स्क्रिप्ट नुसार प्रसिद्धी देत असल्याचा आरोप त्यांनी केला उमेदवारांसोबत कोणते शिवसैनिक आहे तेही बघावे,असे ते म्हणाले. केतन काजे यांच्या निलंबनामुळे तालुक्यात आता चर्चेला उधाण आले आहे,

## अन्वी येथे २२ वर्षानंतर भरला माजी विद्यार्थ्यांचा वर्ग, जुन्या आठवणींना दिला उजाळा

सिल्लोड / प्रतिनिधी : सिल्लोड तालुक्यातील अन्वी येथील महात्मा गांधी विद्यालय इयत्ता दहावीच्या २००१-२००२ मधील बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच संपन्न झाला. यावेळी २२ वर्षांनी एकत्र आलेल्या माजी वर्गमित्रांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

दहावीनंतर शिक्षण व नंतर नोकरीनिमित्त सर्व विद्यार्थी एकमेकांपासून दूर गेले होते. सोशल मीडियाच्या माध्यमातून सर्वजण एकत्र आले. यातील अनेकजण मुंबई, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा ,जळगाव, नवी मुंबई, आदी ठिकाणी काही नोकरी , व्यावसायिक आहेत. भेटण्याचे ठरवून ०४ नोहेंबर रोजी सर्वजण एकत्र आले. यावेळी मुख्याध्यापक देशमुख सर,आणि शिक्षक यांचा माजी विद्यार्थ्यांनी सत्कार केला. यानंतर सर्वांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्यानंतर पुन्हा भेटण्याचा संकल्प करून सर्वाना एक भेटवस्तू देऊन एकमेकांचा निरोप घेतला. अन्वी येथील महात्मा गांधी विद्यालयाचे माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यानिमित्त २२ वर्षांनंतर एकत्र आले. यावेळी चे वर्गमित्र शंकर बांबर्डे,समाधान सुरडकर,प्रभाकर गवळी,कृष्णा पंडित,संदीप चापे ,भागवत भवर ,डिगांबर गायकवाड, कैलास चव्हाण,संदीप शेवरे गजानन काळे,अविनाश नाडे,योगेश बांबर्डे,रामेश्वर गायकवाड,विष्णू पार्वे, पांडुरंग सपकाळ,समाधान दांडगे,आनंदा सपकाळ,समाधान जाधव, गजानन सपकाळ, संतोष पार्वे,गणेश सुरडकर ,रमेश सुरडकर,शंकर बांबर्डे,समाधान सुरडकर,प्रभाकर आडगावकर ,प्रभाकर शेवरे , कोकिळा ढंगारे,सुवर्णा पाटील,सुनिता पाटील,सुरेखा बांबर्डे,छाया जाधव,वंदना वाल्डे, सुरेखा पार्वे,गीता फलफले,प्रतिभा गवळी,वैशाली खंडागळे,ताई बांबर्डेआदी उपस्थित होते.

## वडगावच्या पाझर तलावात कचऱ्याची विल्हेवाट

### अज्ञाताकडून जाळला जातो कचरा ; प्रदूषणामुळे नागरिक त्रस्त

वाळूज महानगर(प्रतिनिधी) : वडगावच्या पाझर तलाव क्षेत्रात कचऱ्याची विल्हेवाट लावली जात आहे. तलावातील पाणी दूषित होण्याची भीती नागरिकांनी वर्तविली आहे. तलावाच्या काठावरच कचरा पेटविला जात असल्याने धुरामुळे प्रदूषण आहे. शिवाय दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असून लगतच्या साईबन सोसायटीतील नागरिक त्रस्त आहे.

पाझर तलावाच्या क्षेत्रात लगतच्या गट नंबरमधील कारखानदार कंपन्यातील रॉ मटेरियल्स, प्लास्टिक, रबर तसेच वसाहतीतील नागरिक रात्री अपरात्री केर-कचरा आणून टाकतात. तलावाच्या क्षेत्रातच कचऱ्याचे मोठ मोठे ढिगारे साचले



असून सर्वत्र दुर्गंधी - पसरली आहे. विशेष म्हणजे, मांसविक्रेते तसेच हॉटेल - व्यावसायिकही टाकाऊ खाद्यपदार्थ या भागात आणून टाकतात. यामुळे येथून नाक दाबूनच ये-जा करावी लागते. या कचऱ्यामुळे तलाव परिसरात मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. जनावरे कचऱ्याबरोबर प्लास्टिकही फस्त करीत असल्याने त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. यंदाच्या पावसाळ्यात हा तलाव पूर्ण क्षमतेने भरला आहे. मात्र, कचऱ्यामुळे पाणी दूषित होत आहे. तलाव परिसरात टाकलेला कचरा पेटवून दिला जात असल्याने सर्वत्र धुराचे प्रदूषण होत आहे. या धुरामुळे तलावालगत असलेल्या रहिवाशांसह गट नंबर परिसरातील नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे. धुरामुळे वाहनधारक व नागरिकही त्रस्त झाले आहे.

**तारेचे संरक्षक कुंपण उभारणार**

**तलाव परिसरात कचरा टाकू नये, यासाठी कर्मचाऱ्याची नेमणूक करून या ठिकाणी कचरा टाकू नये, असे फलकही लावण्यात आले आहे. मात्र रात्रीच्या वेळी अज्ञाताकडून कचरा टाकला जात असल्याचे ग्रामपंचायतीच्या निर्देशनास आले आहे. आता तलावाला तारेचे संरक्षक कुंपन उभारले जाणार आहे.**

**बी. एल. भालेराव**
**ग्रामविकास अधिकारी ,**
**वडगाव को.**

कंचरा पेटविल्यानंतर वारा सुटल्यास लगतच्या कंपन्यांना आग लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन अनेक जणांचा शिवसेनेत प्रवेश

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.९, शिवसेना महायुतीचे उमेदवार ना. अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्व व कार्यपद्धतीवर विश्वास ठेवत सिल्लोड तालुक्यातील धानोरा तसेच आमसरी येथील विविध पक्षातील शेकडो पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. ना. अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत सिल्लोड येथे हा पक्ष प्रवेश सोहळा पार पडला.

ना अब्दुल सत्तार यांनी मतदार संघाचा सर्वांगीण विकास साधत सर्व जाती धर्माच्या लोकांना न्याय देण्याचे काम केले असल्याने आम्ही शिवसेनेत प्रवेश करीत असल्याचे इतर पक्षातून आलेल्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी सांगितले.
तर मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख ना.एकनाथराव शिंदे यांनी घेतलेले जनहितार्थ निर्णय तसेच स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार घरोघरी पोहचवून अब्दुल सत्तार यांनी केलेल्या विकास कामाबद्दल आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून या निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्याचा संकल्प पदाधिकारी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.



प्रवेश करणाऱ्यांमध्ये धानोरा येथील आजिनाथ नानासाहेब काकडे ,अजिनाथ विठ्ठल काकडे, संजय काशिनाथ काकडे, अंबादास विठ्ठल काकडे ,विष्णू भिवसन काकडे ,विष्णू देविदास पवार ,अंकुश भागाजी काकडे ,दत्ता मनाजी काकडे, सागर सोमीनाथ काकडे ,ज्ञानेश्वर महादेव काकडे, बाळू ज्ञानेश्वर काकडे ,गजानन रामदास काकडे ,संजय गणपत काकडे ,दत्ता अंबादास काकडे ,सोमीनाथ त्र्यंबक काकडे ,भागवत अण्णा काकडे, भगवान आप्पा काकडे, भगवान अशोक काकडे ,लक्ष्मण दौड ,भाऊसाहेब तुळशीराम काकडे, गणेश सांडू काकडे ,कैलास विठ्ठल काकडे, गणेश सुखदेव काकडे ,शिवाजी अंबादास काकडे ,श्रीहरी विष्णू काकडे ,अजिनाथ अंबादास घोडके ,भाऊसाहेब प्रभात काकडे, भिकन दौड, पवन धोंडीराम काकडे ,अजिनाथ काकासाहेब काकडे ,गौरव सोमीनाथ काकडे ,संतोष कचरू काकडे, प्रदीप भाऊसाहेब काकडे ,जनार्दन काकडे ,मनोज माधवराव काकडे ,सचिन कृष्णा काकडे, ज्ञानेश्वर धोंडीबा काकडे ,दामोदर अण्णा काकडे, भगवान भाऊसाहेब सुलताने ,सचिन कृष्णा काकडे ,समाधान गणपत काकडे, विकास रामदास काकडे, सोमीनाथ धोंडीबा काकडे, द्रुपतराव सांडू काकडे तसेच आमसरी येथील माजी सरपंच साहेबराव दांडगे, माजी सरपंच मोहन ढोले, तंटामुक्ती अध्यक्ष श्रावण इंगळे , ज्ञानेश्वर जाधव, रामदास पवार, गणेश पवार , ग्रा. सदस्य विठ्ठल दांडगे, लक्ष्मण साबळे,गणेश दांडगे, राजीव जाधव ,समाधान इंगळे ,अमोल चंडोल ,विलास दांडगे, विशाल मोरे यांचा समावेश आहे.

## गल्लीबोळातून प्रचार ; विकास मात्र शून्य

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : १०८ पश्चिम विधानसभा मतदारसंघासाठी जसा जसा प्रचाराचा जोर वाढत आहे तसेच कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहे. कार्यकर्ते कधी सर्वसामान्य नागरिकांच्या समस्यासाठी दारापर्यंत कधी गेले नाही परंतु आता प्रचारासाठी घरोघरी जाऊन गल्लीबोळातून प्रचार करत आहेत.

वाळूज महानगर परिसरातील पश्चिम मतदार संघात गेल्या पंधरा वर्षात बोटावर मोजण्या इतकीच कामे झाली. वाळूज महानगरातील वडगाव , बजाजनगर , गट नं. परिसर , तिसगाव , पाटोदा पंढरपूर , गेवराई , गेवराई तांडा , गेवराई खुर्द , गोलवाडी , वळदगाव, धरमपूर , शिंदोन , भिंदोन गंगापूर नेहरी , साजापूर, करोडी, शरणापूर, दौलताबाद, अब्दीमंडी, माळीवाडा , रामपुरी यासह इतर पश्चिम मतदार संघात म्हणावा तसा विकास झालेला नाही. येथील नागरिक समस्यांपासून त्रस्त आहेत. मतदार संघाचा विकास तर झाला नाही परंतु विद्यमान आमदार संजय शिरसाट यांनी स्वतः चा मात्र विकास करून घेतला. पंधरा वर्षांत विकास करता आला नाही आता पुन्हा कशासाठी निवडून द्यायचे असा संतप्त सवाल नागरिक करीत आहेत. उद्यापासून प्रत्येक गावातील प्रत्येक गल्लीतील समस्या फोटो व प्रतिक्रियांसह आपणासमोर मालिका स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न तरुण - भारत करणार आहे.

## फर्दापूर परिसरात वाघूर नदी पात्रात गावरान हातभट्टी दारू वर छापा

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि ८ फर्दापूर पोलिसांनी वाघूर नदीकाठी बेकायदेशीर सुरू असलेल्या गावठी हातभट्टीवर शुक्रवार दि.७ सकाळी ८ वाजेच्या सुमारास छापा टाकत ८९ हजार रुपयांचे दारू बनविण्याचे रसायन व दारू नष्ट केली.याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

गुप्त माहिती आधारे सहायक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे,पो.ना.निलेश लोखंडे,योगेश कोळी,प्रकाश कोळी यांच्या पथकाने शुक्रवार दि.८ सकाळी ८ वाजेच्या सुमारास वाघूर नदीपात्रात अवैधरित्या सुरू असलेल्या गावठी हातभट्टीवर बनविणाऱ्या अड्ड्यावर छापा टाकला.याठिकाणी १४ हजार रुपये किमतीचे ३५ लिटर क्षमता



असलेल्या ४ कॅन,७५ हजार रुपये किंमतीच्या १५० क्षमता असलेल्या १० टाक्या असलेले रसायन असा एकूण ८९ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला.याप्रकरणी पो.कॉ.प्रकाश कोळी यांच्या फिर्यादीवरून आरोपी शाहरुख समशोद्दिन तडवी (वय.२८ रा.फर्दापूर) यांच्या विरुद्ध फरदापुर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## बेघरांना ब्लँकेट, वृद्धांना टोप्या-मोजे वाटप 'एव्हारा' ने जपली सामाजिक बांधिलकी

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

हिवाळ्यात बेघर व्यक्तींना ब्लँकेट तर निराधारांना उबदार टोप्या-मोजे तसेच अपघात रोखण्यासाठी रस्त्यावर रेडियम पट्ट्या लावणे आणि निराधार वृद्धांना दैनंदिन गरजेच्या वस्तू देत 'एव्हारा' संस्थेने सामाजिक बांधिलकी जपली आहे. बारावीतील विद्यार्थ्यांनी एकत्र येत समाजोपयोगी उपक्रम राबविले आहेत. शहरात वेगवेगळ्या सेवाभावी संस्था समाजोपयोगी कामे करीत आहेत. बारावीत शिकणाऱ्या तीन विद्यार्थ्यांनी स्थापन केलेल्या 'एव्हारा' या सेवाभावी संस्थेने निराधार आणि भटक्या प्राण्यांसाठी विविध उपक्रम राबविले आहेत. मनीष बोडखे, सोहम वाघ आणि ओजस ढूट



यांनी तीन 'दान मोहिमा' राबविल्या आहेत. या समूहाने गजानन मंदिर परिसर, घाटी रुग्णालय, रेल्वे स्थानक आणि मध्यवर्ती बसस्थानक अशा विविध ठिकाणी बेघर व्यक्तिंना ब्लँकेट्सचे वाटप केले. हिवाळ्यात बेघर व्यक्ती अधिक त्रस्त असतात. त्यांची अडचण लक्षात घेऊन युवकांनी ही मदत केली. 'एव्हारा'ने शहरातील भटक्या प्राण्यांसाठी काम सुरू केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर आणि सूतगिरणी चौक परिसरातील रस्त्यावर ५० रेडियम पट्ट्या आणि भटक्या कुत्र्यांना २० किलो अन्नाची व्यवस्था केली आहे. रात्रीच्या वेळी रेडियम पट्ट्यांमुळे अपघात कमी होतील आणि अन्नदानामुळे प्राण्यांना जीवदान मिळेल, असे युवकांनी सांगितले.

वृद्धांनाही मदत

दरम्यान, या संस्थेने नुकतीच मातोश्री वृद्धाश्रमाला भेट देत वृद्धांशी संवाद साधला. वृद्धांना उबदार टोप्या, मोजे आणि पौष्टिक खाद्यपदार्थ दिले. वृद्धांनी मुलांशी संवाद साधत कृतज्ञता व्यक्त केली. या उपक्रमातून दुर्बल लोक, प्राणी आणि वृद्धांसाठी सकारात्मक काम करीत असल्याचे युवकांनी सांगितले.

## विकासाच्या वाटेवर 'महायुती'चा निर्धार : तिसऱ्यांदा मतांची साथ हवी : अतुल सावे

छत्रपती संभाजीनगर : मागील अडीच वर्षांपासून महायुतीचे सरकार राज्यात असून, विविध माध्यमातून निधी उपलब्ध करून विकासाच्या योजनांना गती दिली आहे. मतदार संघातील विकासकामे मार्गी लागण्यासाठी नागरिकांनी मतदानाच्या माध्यमातून साथ द्यावी, अशी साद महायुतीचे उमेदवार अतुल सावे यांनी घातली आहे.

कैलास नगर वार्ड क्रमांक ६६ मध्ये काढलेल्या भव्य प्रचार पदयात्रेच्या निमित्ताने श्री. सावे यांनी नागरिकांशी थेट संवाद साधला. महायुतीच्या शासनाने शहर आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आदी क्षेत्रांमध्ये विकासाचे नवे अध्याय लिहिले आहेत. अजून अनेक कामे प्रलंबित असून, विकासाच्या या गतीला लोकांनी मतदानाच्या माध्यमातून बळ द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सावे यांनी प्रत्यक्ष नागरिकांना भेटून त्यांच्या अडचणी, समस्या समजून घेतल्या व त्यावर तोडगा



काढण्याचे आश्वासन दिले. आम्ही विकासाच्या वचनबद्धतेवर ठाम आहोत आणि लोकांच्या गरजांना केंद्रस्थानी ठेवून काम करण्याचा आमचा कटाक्ष आहे, असे ते म्हणाले.

प्रचार पदयात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, स्थानिक पातळीवरून समर्थन वाढत असल्याचे संकेत मिळत आहेत.

यावेळी चंद्रकांत हिवराळे,सखाराम पोळ,रामचंद्र जाधव,राजु वाडेकर,मयुर सोनवणे, बाळासाहेब माडजे,निखिल महाले,सागर वाडेकर, किशोर लोखंडे,यश वाघ, सुमित बावसीवाल, जयेश वाडेकर,धिरज वर्मा,किरण भगत,राजु कदम, कुलदीप भाले,सनी पाटील, गणेश केवढे, संकेत नवगिरे,अशोक भालेराव, प्रशांत दळवी, रामेश्वर भादवे, रवी भाकरे, रवी ताटे, कृष्णा लोखंडे, जयेश वाडेकर, रोहित उदावंत, सोनू गोरे, सोनल पाटील, सुप्रिया चव्हाण, संगीता सांगळे, आनंद परदेशी, रामा धरमे, गोविंद कुलकर्णी, रवी कदम, सरिन शकुंतला, प्रशांत दळवी यांच्या सह मोठ्या प्रमाणावर महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिकांची उपस्थिती होती.

# माजी मुख्यमंत्र्यांच्या कुटुंबियांमध्ये फूट

**राज्याच्या राजकारणामध्ये वर्चस्व राखून असलेल्या नाईक कुटुंबियांमध्ये विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर फूट पडली आहे. या बंजाराबहुल मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मनोहर नाईक यांच्या दोन्ही मुलांनी एकमेकांच्या विरोधात उमेदवारी अर्ज दाखल केल्याने मतांचे विभाजन होण्याची शक्यता आहे.**

महायुतीच्या वतीने आमदार इंद्रनील नाईक यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला, तर त्यांचे मोठे बंधू ययाती नाईक यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. महाराष्ट्राच्या या प्रतिष्ठित राजकीय कुटुंबातील वादामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पुसद हा बंजाराबहुल मतदारसंघ आहे. येथे बंजारा, आदिवासी, मराठा, कुणबी समाजाची मते अधिक आहेत. ययाती नाईक यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून महाविकास अ५ाडीची उमेदवारी मागितली होती; मात्र येथे शरद पवार यांनी मराठा कुणबी समाजाचे शरद मैंद यांना पक्षाची उमदेवारी दिली. त्यामुळे नाराज झालेल्या ययाती नाईक यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली. आपल्या फलकांवर ययाती यांनी वडील मनोहरराव नाईक यांचे छायाचित्रही वापरले नाही. केवळ वसंतराव नाईक आणि सुधाकरराव नाईक यांचे छायाचित्र लावल्याने मतदारसंघामध्ये नाईक कुटुंबातील वादाबद्दल चर्चा आहे. शरद पवार हे काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर सुधाकरराव नाईक त्यांच्यासोबत गेले. तेव्हापासून नाईक कुटुंबीय राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहे. गेल्यावर्षी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर पुसदचे आमदार इंद्रनील नाईक हे अजित पवार गटात गेले. त्यांचे वडील मनोहरराव नाईक यांनी याबाबत कधी जाहीर भाष्य केले नसले, तरी मुलासोबत तेही अजित पवार गटामध्ये असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे ययाती यांना वडील मनोहरराव नाईक यांची साथ नसावी, अशी चर्चा आहे. महाविकास आघाडी नाईक कुटुंबातील इंद्रनील आणि ययाती या भावांमधील वादाचा फायदा करून घेण्याच्या तयारीत आहे. मनोहरराव नाईक आणि त्यांचा मुलगा आमदार इंद्रनील नाईक यांनी पक्षाची साथ सोडल्यामुळे नाराज झालेल्या शरद पवार यांनी ययाती यांना उमेदवारी न देता एका दगडात दोन पक्षी मारल्याचे बोलले जाते. या बंजाराबहुल मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीची उमेदवारी न दिल्यास ययाती नाईक बंडखोरी करणार हे गृहीत धरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने जाणीवपूर्वक मराठा उमेदवार दिला.

शरद पवार यांनी पुसदमध्ये बंजारा मते नाईक कुटुंबियांमध्ये विभाजित झाल्यास मराठा, कुणबी, अनुसूचित जाती, जमाती, अल्पसंख्याकांची मते महाविकास आघाडीकडे वळतील, या सूत्राने खेळी खेळल्याची चर्चा आहे. नाईक कुटुंबातील हा वाद कायम राहिल्यास तो महाविकास आघाडीच्या पथ्यावर पडेल, असे चित्र सध्या आहे.

यवतमाळ लोकसभा मतदारसंघामध्ये पुसद मतदारसंघ येतो. विदर्भ आणि मराठवाड्याच्या सीमेवर वसलेल्या या मतदारसंघामध्ये पुसद आणि महागाव तालुक्याच्या काही भागांचा समावेश होतो. हा बंजाराबहुल मतदारसंघ असल्याने बंजारा समाज ज्याच्या पाठिशी तोच इथला आमदार बनणार, हे गणित ठरलेले आहे.

म्हणूनच नाईक कुटुंबातल्या नेत्याशिवाय इतर कोणीही या मतदारसंघाचे नेतृत्व करू शकलेले नाही. या मतदारसंघात आदिवासी समाजाचा प्रभाव अधिक असून ओबीसी आणि मुस्लिम समाजाचीही मते आहेत. पुसद म्हटले, की सर्वांत आधी वसंतराव नाईक यांचे नाव समोर येते. त्यांनी सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपद भूषवले होते. महाराष्ट्राची स्थापना होण्याच्या आधी वसंतराव नाईक यांनी पुसद विधानसभा निवडणूक लढवली होती. १९५२ मध्ये ते पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, तेव्हा ते पहिले महसूल




मंत्री होते. मारोतराव कन्नमवार यांच्या निधनानंतर वसंतराव नाईकांकडे मुख्यमंत्रिपदाची धुरा आली. १९७५ पर्यंत ते मुख्यमंत्रिपदावर कायम होते. वसंतराव यांचे पुतणे सुधाकरराव नाईक हेसुद्धा राजकारणात सक्रिय झाले होते. पुढे सुधाकरराव नाईक राज्याचे मुख्यमंत्री झाले. पुसद हा एकाच कुटुंबातून राज्याला दोन मुख्यमंत्री देणारा मतदारसंघ ठरला. १९९९ मध्ये शरद पवारांनी काँग्रेसमधून बाहेर पडत राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. तेव्हा सुधाकरराव यांनी शरद पवारांसोबत राष्ट्रवादीमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. सुधाकरराव यांचे भाऊ मनोहर यांनी २००४ पासून २०१४ पर्यंत या मतदारसंघामधून निवडणूक लढवली होती; मात्र २०१४ मध्ये त्यांना पुतणे नीलय यांच्या बंडखोरीचा सामना करावा लागला. पुढे नीलय नाईक यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये नीलय यांनी मनोहर नाईक यांचा लहान मुलगा इंद्रनील नाईक यांच्याविरोधात निवडणूक लढवली. या वेळी पुसदमधल्या मतदारांनी इंद्रनील यांना निवडून दिले होते. मनोहरराव नाईक यांना ययाती आणि इंद्रनील अशी दोन मुले आहेत. इंद्रनील हे सध्या पुसदमधील आमदार आहेत, तर ययाती हे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आहेत. अडीच वर्षांपूर्वी राज्यात झालेल्या सत्तानाट्यानंतर महाविकास आघाडी आणि महायुती अस्तित्त्वात आली. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर पुसदच्या नाईक घराण्यातही फूट पडली. इंद्रनील यांनी अजित पवार गटामध्ये जाताना आपल्याला विश्वासात घेतले नाही, याबद्दल ययाती नाईक यांच्यात नाराजी होती, तर दुसरीकडे २०१९ मध्ये आपल्याला डावलून आमदारकीची संधी इंद्रनील यांना मिळाल्याने ययाती हे संधीच्या शोधात होते. ययाती यांनी शरद पवार गटातच राहणे पसंत केले. लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीच्या संजय देशमुख यांना मदत करताना आपण विधानसभेसाठी इच्छुक असल्याचे ययाती यांनी सांगितले होते.

यंदाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळावी यासाठी ते आग्रही होते. त्या अनुषंगाने ययाती यांनी मतदारसंघामध्ये मोर्चेबांधणीही केली होती. संभाव्य उमेदवारांच्या यादीतही त्यांचे नाव होते; मात्र ऐनवेळी ययाती यांना उमेदवारी न देता शरद मैद यांना तिकिट देण्यात आले. आमदार इंद्रनील नाईक यांनी पक्षाची साथ सोडल्यामुळे शरद पवार नाराज असल्याची चर्चा होती. यामुळेच त्यांनी ययाती यांना उमेदवारी न देता एका दगडात दोन पक्षी मारल्याचे म्हटले जात आहे.

लक्षवेधी लढत

गेल्या पाच वर्षांत इंद्रनील हे सर्वसामान्य जनतेच्या संपर्कात नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. मनोहर नाईक यांच्यासारखा जनसंपर्क इंद्रनील यांचा तयार करता आला नाही. त्यामुळे पक्षफुटीचाही परिणाम या मतदारसंघात दिसेल, अशी शक्यता राजकीय विश्लेषक वर्तवत आहेत. दुसरीकडे ययाती यांनी गेल्या पाच वर्षांत आपला जनसंपर्क चांगलाच वाढवला आहे. ययाती यांच्याबद्दल या मतदारसंघामध्ये थोडी सहानुभूतीसुद्धा आहे. या मतदारसंघातील सर्वांत मोठा प्रश्न म्हणजे बेरोजगारी. यवतमाळ हे कापसासाठी ओळखले जाते; पण इथे कापूस आणि सोयाबीनला भाव मिळत नसल्याने, शेतकरी नाराज आहेत. त्यामुळे पुसद मतदारसंघातील तरुण आणि शेतकरी यांचे प्रश्न समजून त्या अनुषंगाने काम करणाऱ्या नेतृत्त्वाला जनतेची साथ मिळू शकते, असा अंदाज आहे.




# चार मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात रस्सीखेच

**सातारा हा तीन माजी आणि एका आजी मुख्यमंत्र्यांचा जिल्हा. य जिह्यामध्ये माजी मुख्यमंत्री, एक कॅबिनेट मंत्री आणि दोन माजी मंत्र्यांसह काही मातब्बर उमेदवारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.**

सातारा जिल्ह्याने यशवंतराव चव्हाण, बॅ. बाबासाहेब भोसले, पृथ्वीराज चव्हाण आणि एकनाथ शिंदे असे चार मुख्यमंत्री राज्याला दिले. शिंदे हे ठाण्यातून निवडून येत असले, तरी ते वाई तालुक्यातील आहेत. सातारा जिल्ह्यातील आठही मतदारसंघांमधील प्रमुख लढतींकडे सर्वांचे लक्ष आहे. कराड दक्षिण, कराड उत्तर, पाटण, कोरेगाव या मतदारसंघांमध्ये प्रतिष्ठेच्या लढती होत आहेत. उमेदवारी जाहीर होईपर्यंत एकतर्फी वाटणाऱ्या मतदारसंघामध्येही आता बलाढ्य उमेदवारांचे आव्हान निर्माण झाले आहे. त्यात वाई, माण, फलटण या मतदारसंघांचा समावेश आहे. कराड दक्षिणमधून काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण उमेदवार आहेत. ते यापूर्वी याच मतदारसंघातून २०१४ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये निवडून आले होते. दोन्ही वेळा भाजपच्या डॉ. अतुल भोसले यांनी त्यांच्याशी निकराची लढत दिली. त्यापूर्वी डॉ. भोसले यांनी कराड उत्तरमधूनही निवडणूक लढवली होती. तिन्ही वेळा त्यांना यशाने हुलकावणी दिली. आता त्यांच्या पदरात हार पडणार की विजयाची माळ पडणार याबाबत उत्सुकता



आहे. चव्हाण यांनी मुख्यमंत्रिपदाच्या तसेच खासदार आणि केंद्रात मंत्री असण्याच्या काळात त्यांनी विविध विकासकामे केली. गेल्या दोन टर्ममध्येही त्यांनी मतदारसंघाशी संपर्क ठेवत विकासकामांसाठी निधी खेचून आणल्याचे सांगितले जाते. त्याशिवाय ही शेवटची निवडणूक असल्याचे भावनिक आवाहन त्यांनी केले आहे. चव्हाण राज्यपातळीवर पक्षासाठी नेतृत्व करत असल्याने त्यांची प्रतिमा मोठी आहे. त्यांच्या या जमेच्या बाजू आहेत. डॉ. भोसले यांनीही गेल्या निवडणुकीतील पराभवानंतर मतदारसंघातील संपर्क वाढविला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपच्या बड्या नेत्यांशी संपर्कात राहिल्याने महायुती सरकारच्या काळात कराड शहर तसेच ग्रामीण भागासाठी मोठ्या प्रमाणात विकासकामे व निधी त्यांनी आणला आहे. कृष्णा साखर कारखाना, कृष्णा हॉस्पिटलसह कृष्णा समूहातील विविध शाखांच्या माध्यमातून ते कार्यरत असतात. या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत; मात्र अपेक्षेएवढा संपर्क दोन्ही बाजूने होत नसल्याच्या तक्रारी आहेत. मतदारसंघात कराड शहराचा समावेश आहे. त्यामुळे कराड नगरपालिकेच्या राजकारणाचा या मतदारसंघातील प्रभाव मोठा आहे. दक्षिणमधील उंडाळकर यांचा गट मोठा आहे. त्यामुळे उदयसिंह पाटील उंडाळकर यांची भूमिका महत्त्वाची असते. सध्या ते काँग्रेसमध्ये असल्याने ते चव्हाण यांच्यासोबत असतील, असे मानण्यात येते. कराड शहर आणि उंडाळकर गट या दोन्ही प्रभावी बाबी या मतदारसंघातील निकालावर परिणाम करणाऱ्या ठरणार आहेत.

पाटणमधून पालकमंत्री शंभूराज देसाई शिवसेना शिंदे गटाकडून रिंगणात आहेत. देसाई व पाटणकर यांच्या गटांमधील ही लढत पारंपरिक असते; मात्र या वेळी या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांशिवाय त्यांच्याविरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने हर्षद कदम या युवा नेतृत्त्वाला संधी दिली आहे. त्यामुळे येथील लढत आता तिरंगी होणार आहे. वास्तविक राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार पक्षाकडून सत्यजितसिंह पाटणकर यांना उमेदवारी मिळण्याची खात्री येथे व्यक्त होत होती; मात्र तसे न झाल्याने पाटणकरां५ बंडाचा झेंडा फटकवला आहे. देसाई यांच्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांना पाटणमध्ये सभा घेऊन त्यांच्या काळात मतदारसंघात किती निधी आला, याचा पाढा वाचला. देसाई मंत्री असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर विकासकामे व निधी आणून त्यांनी झंझावात निर्माण केला. या बलाढ्य नेत्यापुढे उभे राहणे अवघड वाटत होते. पाटणकर यांनी तशी तयारीही केली होती. या मैदानात तिसरा उमेदवार येण्यामागे कोणाची खेळी तर नाही ना, अशी शंकाही आहे. ठाकरे गटाला उमेदवारी देण्यामागे प्रामुख्याने शिवसेनेच्या मतांची विभागणी होऊन तिसरा उमेदवार निवडून यावा, अशी रणनीती इथे दिसते. अर्थातच अशी राजकीय खेळी कोण करू शकते, याचीही जिल्ह्यात चर्चा आहे, तरीही आता या मतदारसंघात रंगत निर्माण झाली आहे.

माजी सहकार आणि पणनमंत्री बाळासाहेब पाटील कराड उत्तर मतदासंघातून षटकार मारण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून रिंगणात आहेत. भाजपच्या मनोज घोरपडे यांनी या वेळी त्यांच्यापुढे आव्हान निर्माण केले आहे. पाटील आणि चव्हाण यांच्यात पूर्वी फारसे सख्य नव्हते. एक राष्ट्रवादी काँग्रेसचा तर एक काँग्रेसचा नेता. कराड दक्षिणमध्ये जसा पाटील यांना मानणारा मोठा वर्ग आहे, तसाच कराड उत्तरमध्ये चव्हाण यांना मानणारा मोठा गट आहे. दोन्ही नेते आता महाविकास आघाडीतून महायुतीविरोधात लढत असल्याने पाटील आणि चव्हाण यांचे अनुयायी आता परस्परांना मदत करतील. कोरेगावमधून माजी मंत्री शशिकांत शिदे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून लढत आहेत. त्यांना शिवसेनेच्या (शिंदे) आमदार महेश शिंदे यांच्याशी सामना करावा लागत आहे. हे दोन्ही आक्रमक नेते मैदानात असल्यामुळे या मतदारसंघाकडेही सर्वांचे लक्ष आहे. वाईत चौकार मारण्यासाठी सज्ज झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे मकरंद पाटील यांच्यासमोर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष अरुणादेवी पिसाळ यांना रिंगणात उतरविले आहे. वाई मतदारसंघात पाटील- भोसले- पिसाळ असे प्रमुख गट आहेत. त्यात पिसाळ गट उमेदवारी मिळविण्यात यशस्वी झाला. फलटणमध्ये राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी अशी लढत होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून विद्यमान आमदार दीपक चव्हाण लढत देत आहेत, तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून सचिन कांबळे पाटील रिंगणात आहेत. ही जागा भाजपची. महायुतीमध्ये ती अजित पवार यांच्याकडे गली. त्यांनी भाजपचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी ठरवलेल्या उमेदवारालाच संधी दिली. या मतदारसंघातील ज्येष्ठ नेते रामराजे नाईक निंबाळकर सध्या अजित पवार गटाकडे आहेत; परंतु ते प्रचारात नाहीत. अजितदादांनी त्यांना नोटीस देण्याचा इशारा दिला आहे.

राज्य वार्तापत्र

आमदार चव्हाण व संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्यासह बाकीचे सैन्य राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडे दाखल झाले आहे. त्यापूर्वीच अजित पवार यांनी या मतदारसंघातून चव्हाण यांची उमेदवारी जाहीर करून टाकली होती; पण आ. चव्हाण यांनी ऐनवेळी पक्ष बदलल्याने अजित पवार यांनी रणजीतसिंहांचा उमेदवार आयात केला. त्यामुळे रामराजे आता प्रचाराच्या रिंगणात नाहीत. माणमध्ये भाजपचे जयकुमार गोरे बलाढ्य उमेदवार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून येथील उमेदवारी प्रभाकर घार्गे यांना दिली. घार्गे यांच्याप्रमाणेच पक्षाकडून प्रभाकर देशमुख, अनिल देसाई, अभय जगताप तसेच काँग्रेसचे रणजीतसिंह देशमुख इच्छुक होते. यांच्यापैकी एकच उमेदवार रिंगणात आल्याने गोरे यांच्यासमोर आता आव्हान निर्माण झाले आहे. सातारा-जावळी मतदारसंघात विद्यमान आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले पाचव्यांदा विजयी होण्यासाठी भाजपकडून मैदानात उतरले आहेत. तुल्यबळ असणाऱ्या शिवेंद्रसिंहराजे यांना पर्याय कोण असा प्रश्न विरोधकांसमोर होता. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे कार्याध्यक्ष असणारे अमित कदम यांनी उमेदवारीसाठी शरद पवार यांच्याकडे प्रयत्न केले. अखेर त्यांना महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवारी मिळाली. अमित कदम यांनी प्रचार सुरू केला आहे. या स्थितीत शिवेंद्रसिंहराजे यांनी सावध पवित्रा घेत पूर्वीपासून सुरू असलेल्या प्रचाराला अधिक गती दिली आहे.

# शिवसेनेचे बंड शेकापच्या मुळावर

**धैर्यशील पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे वाताहत झालेल्या शेकापसमोर पेण विधानसभा मतदारसंघामध्ये यंदा अस्तित्वाची लढाई असणार आहे. एकाच वेळी महाविकास आघाडीतील दोन पक्षांचे उमेदवार रिंगणात असल्याने शेकापच्या अडचणी वाढणार आहेत. शिवसेना आणि शेकापमधील जागावाटणीचा वाद शेकापच्या अस्तित्वाचा मुद्दा ठरतो आहे.**

पेण विधानसभा मतदारसंघ हा शेकापचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जायचा. २००४, २०१९ चा अपवाद सोडला तर चार दशकांहून अधिक काळ पेण मतदारसंघावर शेकापचे वर्चस्व राहिले आहे. या मतदारसंघातून विधानसभेवर सलग पाच वेळा मोहन पाटील तर दोन वेळा धैर्यशील पाटील निवडून गेले होते. त्यामुळे पुन्हा हा मतदारसंघ ताब्यात घेण्यासाठी शेकाप प्रयत्नशील आहे; परंतु या मतदारसंघामध्ये शिवसेनेच्या ठाकरे गटाने बंड केले आहे. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत होण्याऐवजी महाविकास आघाडीतील दोन पक्षांची परस्परांतील लढत विरुद्ध महायुती असे या लढतीचे स्वरुप आहे. हा मतदारसंघ पेण, सुधागड, पाली आणि रोहा तालुक्यातील काही भाग मिळून तयार झाला आहे. मतदारसंघामध्ये तीन लाख सात हजार ९७९ मतदारांचा समावेश आहे. यात एक लाख ५४ हजार ६६१ पुरुष, एक लाख ५३ हजार ३१७ महिला तर एका तृतीयपंथी मतदाराचा समावेश आहे. महायुतीकडून भाजपचे विद्यमान आमदार रवींद्र पाटील पुन्हा एकदा निवडणूक रिंगणात आहेत, तर शेकापकडून व्यवसायाने वास्तुरचनाकार असलेल्या अतुल म्हात्रे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून प्रसाद भोईर हे निवडणूक रिंगणात आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीतील दोन घटक पक्षांचे उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. पूर्वी शेकाप आणि काँग्रेस असे दोन प्रमुख पक्ष मतदारसंघामध्ये होते; मात्र गेल्या पाच वर्षांमध्ये मतदारसंघातील राजकीय समीकरणे बरीच बदलली आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीआधी काँग्रेसच्या रवींद्र ऊर्फ रविशेठ पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे मतदारसंघातील काँग्रेसचे अस्तित्व जवळपास संपुष्टात आले. भाजपकडून निवडणूक लढवून ते आमदारही झाले. शेकापच्या धैर्यशील पाटील यांचा त्यांनी पराभव केला होता; पण निवडणुकीनंतर धैर्यशील पाटील हेदेखील शेकापची साथ सोडत भाजपमध्ये दाखल झाले. त्यामुळे मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलली. धैर्यशील पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे मतदारसंघामध्ये शेकापचे



अस्तित्व अडचणीत आले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार प्रसाद भोईर यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने शेकापच्या अडचणी वाढणार आहेत.

शेतकरी कामगार पक्ष हा महाविकास आघाडीचा घटकपक्ष आहे, तरीही दोन्ही पक्षांचे उमेदवार असल्याने एकमेकांविरुद्ध लढून ते काय साध्य करणार, असा प्रश्न पेण-सुधागड तालुक्यातील मतदार विचारत आहेत.

जिल्हा वार्तापत्र

उद्धव ठाकरे आणि शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्यातील चर्चेनंतर अलिबाग, पेण आणि पनवेल मतदारसंघ शेकापला देण्याचा निर्णय ठाकरे यांनी घेतला. एवढेच नाही अर्ज मागे घेणार नाहीत त्यांच्यावर कारवाईचा इशारा ठाकरे यांनी दिला. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी अलिबागमधून जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनी अर्ज मागे घेत शेकापच्या चित्रलेखा पाटील यांना वाट करून दिली; मात्र पेणमधून प्रसाद भोईर यांचा अर्ज कायम राहिला आहे. विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वी अतुल म्हात्रे यांनी पत्रकार परिषद घेऊन ते महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असल्याचा दावा केला. त्यांच्या मागे बॅनरदेखील अधिकृत उमेदवार असाच होता. त्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे आणि उपनेते विजय कदम यांनी पत्रकार परिषद घेत प्रसाद भोईर हेच महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असल्याचा दावा केला; मात्र त्यांच्यामागे महाविकास आघाडीचा बॅनर नव्हता. त्यामुळे आता महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार शेकापचे अतुल म्हात्रे की शिवसेना ठाकरे गटाचे प्रसाद भोईर, असा प्रश्न मतदारसंघामध्ये विचारला जात आहे. दोन्ही बाजूंनी प्रचाराला वेग आला आहे. त्यामुळे पेण मतदारसंघामध्ये महाविकास आघाडासाठी कुणाला मतदान करायचे याबाबत स्पष्टता नाही. आता मतदानाला केवळ काही दिवस उरले आहेत. त्यामळे आता यावर केवळ पक्षप्रमुख उद्धव ठाकरेच पडदा टाकून हा राजकीय गोंधळ आणि मतदारांमधील संभ्रम मिटवू शकतात. प्रश्न आहे तो हे केव्हा घडणार?

## महाविकास आघाडीची अशीही खैरात

बीकेसी मैदानातल्या प्रचार सभेमध्ये राहुल गांधी आणि उद्धव ठाकरे महायुतीवर अक्षरश: तुटून पडले. महायुतीपेक्षा आम्ही जनतेसाठी किती आणि काय काय करणार आहोत हे सांगताना शेवटी लाडकी बहीण योजने प्रमाणेच लाडका भाऊ योजनाही राहुल गांधींनी जाहीर केली. महाराष्ट्रातील महिलांसाठी मविआतर्फे त्यांनी महालक्ष्मी योजना जाहीर केली आहे. मविआ निवडून आली तर दर महिन्याला त्यांच्या खात्यात तीन हजार रुपये खटाखट जमा होणार आहेत. युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी युवकांच्या खात्यातही दर महिना चार हजार रुपये जमा होणार आहेत. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळणार आहे. फक्त यासाठी पैसे कुठून आणणार हे मात्र त्यांनी जाहीर केले नाही. मात्र हे ऐकताना लाडक्या बहीण योजनेच्या वेळी महाराष्ट्राच्या रिकाम्या पडलेल्या तिजोऱ्या एकाएकी भरभरून वाहू लागल्याचा आनंद महाराष्ट्रातील जनतेला झाला यात काही शंका नाही.



## तोवर एकत्र येणार नाही...

महाराष्ट्रातील निवडणुकींचे निकाल धक्कादायक असणार आहेत याबद्दल कुणाच्याच मनात शंका नाहीत. महायुतीतले तीन मोठे पक्ष आणि मविआमधले तीन मोठे पक्ष यांची विलक्षण झुंज या निवडणुकीमध्ये होते आहे. कोण जिंकणार, कोण हारणार याबरोबरच नंतरची गणिते कोणता पक्ष कशी जमवणार याचीही उत्सुकता सगळ्यांच्या मनात आहे.



काकांची आणि ताईंची साथ सोडून महायुतीमध्ये गेलेल्या अजित पवारांच्या पुढच्या खेळीविषयीही सर्वांना उत्सुकता आहे. ही राजकीय गणितं जुळवताना अजित पवार परत आले तर त्यांना पुन्हा सोबत घेणार का हा प्रश्न सुप्रियाताई सुळेंना विचारण्यात आला. दादा भाजपाबरोबर असेपर्यंत त्यांना परत घेणे कठीण आहे, असं त्या म्हणाल्या. कारण भाजपा आणि आमच्या विचारधारा खूप वेगळ्या आहेत. पण सत्तेसाठी कोणतीही विचारधारा कुठेही आणि कशीही मिसळून जाऊ शकते हे महाराष्ट्रातील जनतेने चांगलेच अनुभवले आहे.

## हुलकावणीचा खेळ

काय असेल ते असो, पण शरद पवार आणि पंतप्रधानपद याचा नेहमीच पाठशिवणीचा खेळ चालू असतो आणि अगदी थोडक्यात ते सर्वोच्च पद त्यांना हुलकावणी देते. १९९१ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी राजीव गांधी यांची हत्या झाली. तेव्हा शरद पवारांनी राज्यातल्या ४८ पैकी ३८ जागा जिंकल्या. पी. व्ही. नरसिंहराव, अर्जुनसिंग यांच्या नावाबरोबर त्यावेळी पंतप्रधानपदासाठी शरद पवारांच्या नावाचीही चर्चा होती. पण अचानक सगळी नावे बाजूला टाकत पी. व्ही. नरसिंहराव पंतप्रधान झाले. त्यांच्या रिक्त स्थानावर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून सुधाकरराव नाईक यांची निवड झाली. पण बदलत्या राजकीय परिस्थितीमध्ये सुधाकरराव नाईकांना राजीनामा द्यावा लागला आणि शरद पवारांना पुन्हा महाराष्ट्रामध्ये परत यावे लागले. पवारांनी चौथ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांना महाराष्ट्राचे चाणक्य, लोकनेते वगैरे पदव्याही मिळाल्या. पण पंतप्रधानपद गेले ते गेलेच.



# वसमत, कळमनुरीत तिरंगी तर हिंगोलीत चौरंगी लढत होण्याची चिन्हे

## महायुती, महाविकास आघाडीकडून नेत्यांच्या सभानंतर प्रचारात रंगत

**विजय गुंडेकर**
**हिंगोली, ९ नोव्हेंबर**



जिल्ह्यातील तीनही विधानसभा मतदारसंघात महायुती, महाविकास आघाडी तसेच अपक्षांकडून प्रचाराला वेग आला असून वसमत विधानसभा आणि कळमनुरी मतदारसंघात तिरंगी तर हिंगोली मतदारसंघात चौरंगी लढत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, राष्ट्रवादीचे शरद पवार, शिवसेनेचे उध्दव ठाकरे आणि भाजपच्या पंकजा मुंडे यांच्या सभानंतर कार्यकर्त्यांमध्ये जोश निर्माण झाला असून प्रचारामध्ये रंगत येतांना दिसत आहे.

वसमत विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे राजू उर्फ चंद्रकांत नवघरे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जयप्रकाश दांडेगावकर गुरू पादेश्वर शिवाचार्य महाराज यांच्यात तिरंगी लढत होणार असल्याचे दिसत आहे. या मतदारसंघात मागील निवडणुकीत राजु नवघरे यांना निवडून आणण्यासाठी जयप्रकाश दांडेगावकरांनी मोठे योगदान दिले होते. त्यामुळे गुरू विरूध्द शिष्य अशी लढत पहायला मिळणार आहे. जयप्रकाश दांडेगावकर यांचेकडे सहकार क्षेत्राचा दांडगा अनुभव आहे. तसेच दोन साखर कारखाने त्यांच्या ताब्यात आहेत. दुसरीकडे राजू नवघरे यांनी मतदारसंघात कोट्यावधी रूपयांचा निधी आणून रस्ते, पाणी आणि सिंचनाचा प्रश्न सोडविण्याचे काम केले आहे. वसमत विधानसभेचा कायापालट करण्यात राजू नवघरे यांचा मोठा वाटा आहे. याशिवाय तरूण तडफदार नेता म्हणून त्यांची चांगलीच ख्याती आहे. बंधाऱ्यांसाठी तसेच मराठा आरक्षणासाठी त्यांनी उघडपणे विधानसभा सभागृहात आवाज उठवला होता. या मतदारसंघात महायुतीमधील भाजपचे ॲड शिवाजीराव जाधव, आणि शिवसेनेचे माजी मंत्री डॉ जयप्रकाश मुंदडा यांची भूमिकाही या मतदारसंघात मोठी असणार आहे. गुरू पादेश्वर शिवाचार्य यांनी या निवडणुकीत रंगत आणली असून त्यांचा मोठा शिष्यवर्ग वसमत आणि परिसरात असल्यामुळे त्यांच्यामुळे वसमत विधानसभा मतदारसंघात तिरंगी लढतीचे चित्र दिसत आहे. या मतदारसंघात मराठा मतदारांचेच वर्चस्व आहे. हा समाज ज्या उमेदवाराकडे झुकेल त्यांचा विजय निश्चित मानल्या जात आहे.

कळमनुरी मतदार संघातही यावेळी तिरंगी लढत होण्याची संकेत आहेत. शिवसेना शिंदे गटाचे संतोष बांगर, शिवसेना उबाठा गटाचे डॉ संतोष टारफे, तर अपक्ष उमेदवार अजित मगर यांच्यात लढत होणार आहे. हा मतदारसंघ ओबीसी, आदिवासी बहुल आहे. या मतदारसंघात कम्युनिस्ट विचारसरणीच्या लोकांचाही चांगलाच प्रभाव आहे. माजी आमदार विठ्ठलराव नाईक यांनी तीनवेळा या मतदारसंघाचे नेतृत्व केल्यामुळे कम्युनिस्ट विचारसरणीचा मतदार आजही या मतदारसंघात पहायला मिळतात. मागील विधानसभा निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकावर असणारे आणि सध्या अपक्ष निवडणुकीच्या रिंगणात उभे ठाकलेले अजित मगर यांचा शेतकरी नेते म्हणून या मतदारसंघात प्रभाव आहे. त्यांनी शिवसेनचे संतोष बांगर यांना चांगलीच टक्कर दिली होती. यावेळी आदिवासी समाजाचे डॉ संतोष टारफे यांनीही प्रचाराला जोरदार सुरूवात केली असून उबाठा शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते या मतदारसंघात चांगले वर्चस्व ठेवून आहेत. दि ९ नोव्हेंबर रोजी या मतदारसंघात पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या सभेनंतर उबाठा शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना अधिकच बळ मिळाले आहे. शिवसेना शिंदे गटाचे संतोष बांगर यांनी या मतदारसंघात केलेली विकासाची कामे तसेच मागील तीन महिन्यांपासून मतदारसंघात सुरू असलेला धुवांधार प्रचार आणि अतिवृष्टीच्या काळात मतदारसंघातील लोकांना केलेली मदत तसेच वेळेला धावून जाणारा लोकप्रतिनिधी म्हणून संतोष बांगर यांची ओळख आहे. या मतदारसंघात संतोष बांगर, डॉ संतोष टारफे आणि अपक्ष अजित मगर यांच्यात तिरंगी लढत होणार असल्याचे चित्र आता स्पष्ट झाले आहे.

हिंगोली विधानसभा मतदारसंघात यावेळी भाजप महायुतीचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे, उबाठा शिवसेनेच्या रूपाली पाटील गोरेगावकर, अपक्ष रामदास पाटील सुमठाणकर, अपक्ष भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्यात चौरंगी लढत होणार असल्याचे दिसत आहे.

भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी मागील दहा वर्षात रस्ते, सिंचन, वीजेचे प्रश्न सोडवले आहेत. कोट्यावधीचा निधी आणून हिंगोली विधानसभा मतदारसंघाचा कायापालट केला आहे. विकासाच्या मुद्द्यावर ते निवडणुक रिंगणात उभे आहेत. सर्वसमावेशक आणि शाश्वत विकास याच धोरणावर ते निवडणुकीत जोरदार प्रचार करीत आहेत. त्यांना मतदारसंघात मोठा प्रतिसाद मिळत असतांना दिसत आहे. दुसरीकडे उबाठा शिवसेनेच्या रूपाली पाटील गोरेगावकर यांनीही प्रचारात आघाडी घेतली असून त्या नवख्या असल्यातरी त्यांचेमागे माजी आ. साहेबराव पाटील गोरेगावकर यांचा वारसा आहे. काँग्रेसमध्ये बंडखोरी करीत विधानसभेचे तीनवेळा नेतृत्व करणारे भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी यावेळी काँग्रेसकडून उमेदवारी न मिळाल्याने अपक्ष निवडणुक रिंगणात शड्डू ठोकला आहे. तीन वेळा विधानसभेचे नेतृत्व त्यांनी केल्यामुळे या मतदारसंघात त्यांचा चांगला प्रभाव आहे. परंतु त्यांच्यामुळे काँग्रेसची मतांचे विभाजन झाल्यास याचा फटका उबाठा शिवसेनेच्या रूपाली पाटील यांना बसण्याची दाट शक्यता आहे. भाजपने तिकीट नाकारल्यामुळे बंडखोरी करीत रामदास पाटील सुमठाणकर यांनीही अपक्ष उमेदवारी दाखल करीत निवडणुकीत रंगत आणली आहे. त्यांच्यामुळे भाजपच्या काही मतांचे विभाजन होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

तीनही मतदारसंघात आता चित्र हळूहळू स्पष्ट होऊ लागले असून उमेदवारांनी जोरदार प्रचाराला सुरूवात केली असून प्रचार सभा, कॉर्नर बैठका आणि घरोघरी भेटी देऊन उमेदवार मतदारांना आपल्याकडे आकर्षिक करण्यासाठी सकाळपासून रात्री उशिरापर्यंत प्रचार करीत असतांना दिसत आहे. सध्या ग्रामीण भागात प्रचारांचा धुरळा उडत असून मतदार राजा कोणाच्या पारड्यात मतदान करणार हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

# विकास केला असता तर पैसे वाटण्याची गरज नव्हती- डॉ टारफे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ नोव्हेंबर**



कळमनुरी मतदारसंघाचा विकास केला असता तर पैसे वाटण्याची गरजच नव्हती. मतदारसंघात अवैध धंदे चालविणाऱ्यांना आणि कोरोना काळात मदत केल्याचा आव आणणाऱ्यांना मतदारसंघातील जनता जागा दाखवणार असा घणाघात उबाठा शिवसेनेचे उमेदवार डॉ संतोष टारफे यांनी केला.

कळमनुरी विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ संतोष टारफे यांच्या प्रचारार्थ दि ९ नोव्हेंबर रोजी पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांची जाहीर सभा घेण्यात आली. यावेळी पक्षप्रमुख उध्दव ठाकरे, संपर्क प्रमुख बबनराव थोरात, खा नागेश पाटील आष्टीकर, आ. डॉ प्रज्ञा सातव, माजी खा ॲड शिवाजीराव माने, कळमनुरी मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार डॉ संतोष टारफे, हिंगोली विधानसभेच्या अधिकृत उमेदवार रूपाली पाटील, सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे, जिल्हाप्रमुख गोपू पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना डॉ टारफे यांनी शिंदे गटाचे अधिकृत उमेदवार संतोष बांगर यांच्यावर सडकून टीका केली. रडणाऱ्या महिला, अपंगांचे व्हिडीओ काढून ते प्रसारीत करून त्याचा राजकीय फायदा घेण्याचे काम करीत आहे. याला देवदूत म्हणायचे का सवाल करीत मागील वर्षाचा शेतकऱ्यांचा पीकविमा खाल्ल्याचा गंभीर आरोपही यावेळी डॉ टारफे यांनी केला.

कोरोना काळात रेमडीसीवर इंजेक्शनचा ब्लॅकमध्ये विकण्याचे काम केले. मतदारसंघात केवळ मटका, जुगार, गुटखा अवैधधंदे उभारण्याचे काम विरोधकांनी केले आहे. मागील काळात या आमदाराची संपत्ती केवळ ८५ लाख रूपये होती आता ती १० हजार कोटींच्या जवळपास गेली असल्याचे लोक सांगत आहेत. आमचे सरकार आल्यानंतर पहिल्यांदा ईडीची चौकशी लावण्याची मागणी उध्दव ठाकरे यांचेकडे केली. सोयाबीनला भाव नाही, पीक कर्ज माफी नाही, हिंगोली जिल्ह्यात अतिवृश्टी झाली. विद्यमान आमदार मुख्यमंत्र्यांचे अत्यंत जवळचे असल्याचे सांगतात तर मग हिंगोली जिल्हा अतिवृष्टीच्या यादीत का नाही आला असा सवालही यावेळी डॉ संतोष टारफे यांनी केला. माजी खा शिवाजीराव माने यांनी कयाधू नदीचे पाणी इसापूर धरणात न वळविता ते हिंगोली जिल्ह्यालाच मिळावे यासाठी बंधारे बांधण्याची विनंती यावेळी उध्दव ठाकरे यांना केली.

# मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी आरोग्य विभागामार्फत जनजागृती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ नोव्हेंबर**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने हिंगोली जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्रावर मतदानाचे टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टिकोनातून आरोग्य विभागामार्फत जनजागृती करण्यात येत आहे. तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय हिंगोली येथे मतदान जनजागृती करण्यात आली. मतदानाच्या दिवशी नको दुसरा प्लॅन, केवळ मतदान, मतदान आणि मतदान अशा प्रकारच्या घोषवाक्य तयार करण्यात आलेल्या फलकाद्वारे मतदान जनजागृती करण्यात आली.यावेळी सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग फोपसे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जोगदंड, तालुका समन्वयक प्रकाश बर्वे, प्रदीप आंधळे, हर्ष मनवर, संजय भाकरे, सुनीता इंगोले, पांडुरंग कूड़े, महेश गायकवाड, गजानन देशमुख आदी कर्मचारी उपस्थित होते.



**हिंगोली- भाजप- महायुतीचे अधिकृत उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी गोरेगाव, माझोड, मन्नास पिंप्री, वालाना आदी गावांना भेटी देत तेथील नागरिकांशी संवाद साधला. यावेळी मतदारसंघातील उर्वरीत समस्या, अडचणी सौडविण्यासाठी कटीबध्द असल्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### तंबाखू नियंत्रण पथकाची बाळापूरात कार्यवाही

हिंगोली- राज्यामध्ये आरोग्य विभागामार्फत तंबाखू मुक्त युवा २.० हे अभियान राबविण्यात येत आहे. त्यामध्ये अनेक जनजागृती पर कार्यक्रम, तंबाखू मुक्त शाळा, तंबाखू मुक्त शासकीय कार्यालये तसेच अवैध तंबाखू विक्रीवर आळा घालण्यासाठी धाडसत्र राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक तथा सदस्य सचिव राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम डॉ. नितिन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली आज जिल्हा तंबाखू नियंत्रण पथक व जिल्हा पोलिस यांनी आखाडा बाळापूर येथील बस स्थानक, हिंगोली रोड, शेवाळा रोड परिसरातील सार्वजनिक ठिकाणी अवैध तंबाखू विक्रेत्यांवर, सार्वजनिक ठिकाणी तंबाखू खाऊन उल्लंघन करणाऱ्या आणि धूम्रपान करणाऱ्या ७ व्यक्तींवर कोटपा कायदा-२००३ नुसार विविध कलमाअंतर्गत दंडात्मक कार्यवाही करुन ३ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

### ॲड रवी शिंदेंचा राष्ट्रवादी शरद पवार पक्षात प्रवेश



हिंगोली- जिल्ह्यातील ओबीसी चळवळीचे नेते ॲड.रवि शिंदे यांनी शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत नांदेड येथे माजी केंद्रीय ग्रामविकास मंत्री सुर्यकांताताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली समर्थकांसह प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते बाबूरावजी माने, शशिकांत पतंगे, तुकाराम कवाने उपस्थित होते. त्यांच्या सोबत पुंजाराव वाघमारे, सतीश लकडे, गणपत सातव, भारत पोले,राजू बाभळे,दत्ता तास्के,दिपक कापसे,पुंडलिकराव नाईक, विलास लकडे,ओमकेश वैद्य,लक्ष्मण पोटे, माणिक चिरमाडे, बालाजी लोढे, बजरंग पोले, राजाराम पोटे, विकास सापनार, बालाजी सापनार, दिनकर पाईकराव, गणेश शिंदे, नारायण नेवरकर, पांडुरंग काकडे, पिंटू नाईक यांच्यासह अनेक समर्थकांनी राष्ट्रवादी पार्टीत प्रवेश केला. ओबीसी चळवळीचे नेते ॲड रवि शिंदे यांनी ऐन निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षात समर्थकांसह प्रवेश केल्यामुळे कळमनुरी विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.संतोष टारफे यांना ओबीसींची मते मिळतील का याची मतदारसंघात जोरदार चर्चा सुरू झाली कारण कळमनुरी विधानसभा मतदारसंघात ओबीसी मतदारांची मोठ्या प्रमाणात संख्या आहे.

# यशवंत संघर्ष सेनेचा महायुतीचे उमेदवार तान्हाजी मुटकुळेंना पाठींबा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ नोव्हेंबर**

हिंगोली येथे यशवंत संघर्ष सेना महाराष्ट्र राज्याच्या वतीने हिंगोली विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांना संघटनेच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला. मुटकुळे मागील दहा वर्षात शेतकरी,विद्यार्थी,कष्टकरी, या सर्वांसाठीच महत्वाचे योगदान राहिले आहे. त्यामुळेच मागील विकासाच्या जोरावर मुटकुळे पुन्हा एकदा निवडून आणणारच असा निर्धार यशवंत संघर्ष सेना संघटनेच्यावतीने करण्यात आला, यावेळी उपस्थित तान्हाजीराव मुटकुळे, के. के. शिंदे, नारायणराव खेडेकर, यशवंत संघर्ष सेना संस्थापक अध्यक्ष विष्णू कुऱ्हाडे, युवा नेते प्रीतम सरकटे, नंदकुमार नायक प्रशांत गोल्डी, पद्माकर नायक यांच्यासह समाज बांधव, यशवंत संघर्ष सेना पदाधिकारी, कार्यकर्ते आदींची उपस्थिती होती.

# आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत मूग, उडीद, सोयाबीन खरेदी सुरू शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे पणन विभागाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ नोव्हेंबर**

**✻ जिल्ह्यात दहा खरेदी केंद्र निश्चित**
**✻ १२ टक्के मॉईश्चर पेक्षा कमी आर्द्रता असलेला व एफएक्यू दर्जाचे सोयाबीनच खरेदी केंद्रावर विक्रीस आणावे**

केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत एनसीसीएफच्या वतीने खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये मूग, उडीद, सोयाबीन खरेदी करण्यासाठी खरेदी केंद्र निश्चित करण्यात आले असून, या खरेदी केंद्रावर मूग, उडीद, सोयाबीन खरेदीसाठी दि. १ ऑक्टोबर, २०२४ पासून नोंदणी सुरु करण्यात आली आहे. तसेच याच खरेदी केंद्रावर दि. ०७ जानेवारी, २०२५ पर्यंत मूग व उडीद खरेदी तर दि. १२ जानेवारी, २०२५ पर्यंत सोयाबीन खरेदी सुरु करण्यात येणार आहे. मूग, उडीद, सोयाबीन खरेदी करण्यासाठी जिल्ह्यात नऊ खरेदी केंद्र निश्चित करण्यात आली आहेत. त्या ठिकाणी नोंदणी सुरु करण्यात आलेली आहे. खरेदी केंद्राचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

कयाधु शेतकरी उत्पादक कं. मर्या. तोंडापूर ता. कळमनुरी ही संस्थेचे खरेदी केंद्र वारंगा फाटा व कळमनुरी येथे आहेत. वारंगा फाटा येथील केंद्रावर केंद्र चालक म्हणून मारोती शिवदास कदम (संपर्क ९७३६४४९३९३) तर कळमनुरी येथील केंद्रावर प्रशांत तुकाराम मस्के (९९२१६०९३९३) हे आहेत.

हजरत नासरगंज बाबा स्वयंसेवी सेवा सहकारी संस्था म. हिंगोली या संस्थेचे खरेदी केंद्र येहळेगाव ता. औंढा नागनाथ येथे आहे. या केंद्रावर केंद्र चालक म्हणून शेख गफार शेख अली हे असून त्यांचा संपर्क क्रमांक ९८८१५०१०४० असा आहे. प्रगती स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था,हिंगोली या संसथेचे खरेदी केंद्र बळसोंड जि. हिंगोली येथे आहे. या संस्थेवर केंद्रचालक म्हणून नारायण शामराव भिसे हे कामकाज पाहणार असून ९८५०७९२७८४ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

औंढा नागनाथ तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मर्या. औंढा (ना) या संस्थेचे खरेदी केंद्र जवळा बाजार ता. औंढा नागनाथ येथे आहे. या संस्थेवर केंद्र चालक म्हणून कृष्णा नामदेव हरणे हे असून त्यांचा संपर्क क्रमांक ९१७५५८६७५८ असा आहे. श्री संत नामदेव स्वयंरोजगार सहकारी संस्था म. चोरजवळा या संस्थेचे खरेदी केंद्र कन्हेरगाव ता. जि. हिंगोली येथे आहे. या संस्थेवर केंद्रचालक म्हणून अमोल जयाजीराव काकडे हे कामकाज पाहणार असून त्यांचा संपर्क क्र. ८००७३८६१४३ आहे.

विजयलक्ष्मी बेरोजगार सहकारी संस्था म. कोळसा ता. सेनगाव या संस्थेचे खरेदी केंद्र साखरा ता. सेनगाव येथे आहे. या केंदावर केंद्र चालक म्हणून उमाशंकर वैजनाथ माळोदे हे काम पाहणार आहेत. त्यांना ९४०३६५१७४३ क्रमांकावर संपर्क साधावा. श्री संत भगवानबाबा स्वयंरोजगार सेवा संस्था कोथळज या संस्थेचे खरेदी केंद्र सेनगाव येथे आहे. या केंद्राचे केंद्र चालक म्हणून निलेश रावजीराव पाटील (९८८११६२२२२) हे असून, वसमत तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मर्यादित, वसमत या संस्थेचे खरेदी केंद्र वसमत येथे आहे. या केंद्रावर केंद्र चालक म्हणून सागर प्रभाकर इंगोले हे काम पाहणार आहेत. त्यांचा संपर्क क्रमांक ८३९०९९५२९४ असा आहे. गोदावरी व्हॅली फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि. शिवणी खु. ता. कळमनुरी येथे आहे. या केंद्रावर केंद्र चालक म्हणून कैलास सुभाष ढोकणे हे काम पाहणार आहेत. त्यांचा संपर्क क्रमांक ७४४७७५८३१२ असा आहे.

शेतकरी बांधवांनी आपल्या तालुक्यातील केंद्राच्या ठिकाणी संपर्क करुन नोंदणी करावी. तसेच १२ टक्के मॉइश्चर पेक्षा कमी आर्द्रता असलेला व एफएक्यू दर्जाचे सोयाबीनच खरेदी केंद्रावर विक्रीस आणावा, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी, हिंगोली यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.





## इति-उवाच...



लाडकी बहीण योजनेवर टीका करणारे आता स्वत: ३००० रुपये देण्याचे आश्वासन देत आहेत. १५०० रुपयांनी राज्याला फटका बसतो, तर मग ३००० रुपये कसे देणार, हे सुप्रिया सुळेंनी सांगितले पाहिजे आणि राज्यातील २ कोटी ४० लाख महिलांची माफी मागितली पाहिजे.

**रूपाली चाकणकर,** राकाँ नेत्या.



विधानसभा निवडणुकीनंतर शिक्षण आणि नोकऱ्यांतील आरक्षण जाणार. ओबीसींनो, आरक्षण वाचवायचे असेल, तर वंचितच्या उमेदवारांना निवडून द्या.

**प्रकाश आंबेडकर,** वंचित बहुजन आघाडी



मूळ काँग्रेसमधील आणि आता शरद पवारांच्या गटात आलेले उमेदवार तरुणांचे लग्न लावून देणार, असे सांगत आहेत. त्यांच्या काँग्रेस पक्षाच्या नेत्याचे तरी लग्न लागले का, हे आधी त्यांना विचारा!

**धनंजय मुंडे,** राकाँ नेते



आम्ही आधीपासून हेच सांगत होतो. जे नेते गेले, ते विकासासाठी गेलेले नाहीत. त्यांच्यावर कारवाई होत होती, त्यापासून पळण्यासाठी ते सत्तेत गेले आहेत. केवळ फोडाफोडीचे राजकारण आणि दबावतंत्र या सर्वांच्या मागे आधुनिक काळाचा अनाजीपंत कोण, हे लोकांना समजले आहे.

**रोहित पवार,** शरद पवार गटाचे नेते

# शरद पवार फेक नॅरेटिव्ह फॅक्टरीचे मालक





### खासदार सुप्रिया सुळे व्यवस्थापिका : देवेंद्र फडणवीस

**दहा लाख रोजगाराच्या संधी**

सभेच्या शेवटी फडणवीस यांनी १० लाख युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे उद्दिष्ट मांडले आणि महाराष्ट्राच्या आर्थिक स्थैर्याचे पुन्हा एकदा पुनरुज्जीवन करण्याचे वचन दिले. त्यांनी मतदारांना आवाहन केले की, विरोधकांनी पसरवलेल्या फेक नॅरेटिव्हपासून सावध राहा आणि महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीवर विश्वास ठेवावा.

◆ **मुंबई, ९ नोव्हेंबर**


महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला स्थलांतरित होत असल्याची खोटी माहिती पसरवून विरोधक राज्याची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करति आहेत. महाराष्ट्र गुंतवणुकीसाठी अजूनही पहिली पसंती आहे आणि संपूर्ण भारतातील ५२ टक्के विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात येत असताना, खोटे नॅरेटिव्ह पसरविण्याचा प्रयत्न विरोधकांनी चालवला आहे. शरद पवार हे फेक नॅरेटिव्ह फॅक्टरीचे मालक आहेत, तर, खासदार सुप्रिया सुळे या व्यवस्थापिका, असा घणाघात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

पिंपरी चिंचवडमध्ये महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत ते बोलत होते. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र औद्योगिक दृष्टिकोनातून मजबूत आहे आणि विरोधकांनी पसरवलेली माहिती फसवी आहे. आमच्या सरकारने महाराष्ट्राला गुंतवणुकीसाठी आदर्श ठिकाण बनवले आहे. राज्यातील औद्योगिक स्थान बदलत असल्याची बातमी खोटी असून, ती फक्त जनतेची दिशाभूल करण्यासाठी आहे.

यावेळी त्यांनी खासदार सुप्रिया सुळे यांचाही फेक नॅरेटिव्ह फॅक्टरीच्या व्यवस्थापिका असा उल्लेख केला. राज्यातील औद्योगिक क्षेत्र सशक्त आहे आणि कोणतेही आव्हान हे महाविकास आघाडीच्या कार्यकाळात आलेल्या अडचणींचा परिणाम आहे. सुळे यांचे विधान चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी याला महाराष्ट्राच्या प्रगतीस नुकसान पोहोचवण्याचा प्रयत्न आहे, असा आरोप केला.

‘लाडकी बहीण’ योजनेवरील उद्धव ठाकरे यांनी केलेल्या टीकेचा उल्लेख करताना फडणवीस म्हणाले की, ठाकरे यांनी योजनेला विरोध दर्शवणे हे सर्वसामान्य लोकांच्या गरजांशी विसंगत आहे. या योजनेतून हजारो मुलींना आर्थिक मदत मिळणार असून, त्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध होतील. (तभा वृत्तसेवा)

# ...असे गेले शिवाजीरावांचे मुख्यमंत्रिपद





### वैद्यकीय प्रवेशासाठी मुलीचे दोन गुण वाढवल्याचा आरोप

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ९ नोव्हेंबर**

१९८५ मध्ये शिवाजीराव निलंगेकर पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्री म्हणून त्यांचा कार्यकाळ फक्त नऊ महिन्यांचा होता. एमडी परीक्षेत मुलीचे गुण वाढवल्याच्या आरोपावरून पाटील वादाच्या भोवऱ्यात सापडले आणि त्याची परिणती मुख्यमंत्रिपद गमावण्यात झाली.



१९८५ ची निवडणूक काँग्रेसने वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वात लढवली आणि जिंकली. अपेक्षेप्रमाणे वसंतदादा पाटील मुख्यमंत्री झाले. नंतर आपल्याला न विचारता प्रभा राव यांची प्रदेश काँग्रेस अध्यक्ष म्हणून नियुक्ती केल्यामुळे नाराज झालेल्या वसंतदादांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. परिणामी दादांचे निकटवर्तीय असलेल्या शिवाजीराव निलंगेकर यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडली. मुख्यमंत्री झाले तेव्हा शिवाजीराव कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते. निलंग्याचे असल्यामुळे शिवाजीराव पाटील यांच्या नावात निलंगेकर हे कायमस्वरूपी जोडल्या गेले.

१९५२ मध्ये काँग्रेसतर्फे त्यांनी निलंगा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली. पण, पहिल्याच निवडणुकीत त्यांचा शेकापच्या उमेदवाराने पराभव केला. १९६२ मध्ये मात्र निलंगा मतदारसंघातून शेकापच्या उमेदवाराचा पराभव करीत शिवाजीराव पाटील पहिल्यांदा विधानसभेवर निवडून आले. नंतर राजकारणातील त्यांचा प्रभाव वाढत गेला. काँग्रेस पक्ष आणि गांधी घराण्यावर त्यांची निष्ठा होती.

सुरुवातीला उपमंत्री म्हणून मंत्रिमंडळात त्यांचा समावेश झाला. काही वर्षांपूर्वी राजकारणात उपमंत्रिपद अस्तित्वात होते. आता ते पद राहिले नाही. राज्यमंत्री, कॅबिनेट मंत्री असा प्रवास करीत शिवाजीराव मुख्यमंत्रिपदापर्यंत पोहोचले. अंतुले यांच्या मंत्रिमंडळात शिवाजीराव सार्वजनिक बांधकाम मंत्री होते. महाराष्ट्र विधानसभेचे बांधकाम त्यांच्याच नेतृत्वात पूर्ण झाले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी विधानभवनाच्या इमारतीचे उद्घाटन केले होते.

१९७४ मध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसमध्ये दोन गट पडले. उस्मानाबाद जिल्ह्यातही त्याचे पडसाद उमटले. वसंतदादा पाटील यांच्या गटात शिवाजीराव निलंगेकर पाटील, तर शंकरराव चव्हाण यांच्या गटात विलासराव देशमुख होते. महाराष्ट्रातील अनेक काँग्रेस नेत्यांनी पक्ष आणि निष्ठा बदलल्या. पण, शिवाजीराव निलंगेकर यांच्या निष्ठा गांधी घराण्यावर कायम होत्या.

मुख्यमंत्री म्हणून शिवाजीराव यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. विदर्भ आणि मराठवाड्याच्या विकासासाठी अनेक कलमी कृती कार्यक्रमाची घोषणा केली. त्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढली. सोबतच पक्षांतर्गत विरोधकांची संख्या वाढली. सर्व काही सुरळीत सुरू असताना आपली मुलगी चंद्रकला डवले हिचे वैद्यकीय प्रवेश परीक्षेत एमडीच्या प्रवेशासाठी दोन गुण वाढवल्याच्या आरोपामुळे शिवाजीराव अडचणीत आले. विरोधकांनी या मुद्यावरून त्यांना घेरत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. प्रकरण न्यायालयात गेले, न्यायालयानेही त्यांच्यावर ताशेरे ओढले. परिणामी त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. शिवाजीरावांच्या निष्कलंक राजकीय कारकीर्दीवर एक न मिटणारा डाग लागला. पुढे या प्रकरणात त्यांना क्लीनचिट मिळाली, हा भाग वेगळा. तोपर्यंत त्यांचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले होते. १९६२ ते २०१४ असे जवळपास ४२ वर्षे विधानसभेचे सदस्य असलेल्या शिवाजीरावांचे कोरोना काळात निधन झाले.



शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी शुक्रवारी दुचाकीवर फिरून पुण्याच्या शिवाजीनगर मतदारसंघातील महाविकास आघाडीतील काँग्रेसचे उमेदवार दत्ता बहिराट यांच्यासाठी प्रचार केला

# हवामान अभ्यासक पंजाबराव डख भाजपामध्ये

### वंचितचा अंदाज चुकला

◆ **परभणी, ९ नोव्हेंबर**

सोशल मीडियातून प्रसिद्ध झालेले परभणीतील हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी अनेकांचा अंदाज चुकवत राजकीय ‘एंट्री’ केली आहे. पंजाबराव डख यांनी भाजपात प्रवेश केला असून, भाजपाच्या विद्यमान आमदार मेघना बोर्डीकर यांच्यासाठी ते प्रचाराच्या मैदानात उतरणार आहेत. त्यांच्या पक्ष प्रवेशाने अनेकांच्या भुवया उंचावल्या असून, पंजाबराव यांचा अंदाज अचूक ठरणार का, हे पाहावे लागेल.

भाजपा नेते रामप्रसाद बोर्डीकर यांच्या हस्ते पंजाबराव डख यांनी भाजपात प्रवेश करून कमळाचा गमछा गळ्यात घातला. ऐन निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी भाजपात प्रवेश करून निवडणूक प्रचाराच्या मैदानात उतरणार असल्याचे सांगितले. आता जिंतूर सेलू विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवार मेघना बोर्डीकर यांचा प्रचार ते करणार आहेत. पंजाबराव यांनी लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीकडून निवडणूक लढवली होती, त्यामुळे ते चर्चेत आले होते. आता वंचित सोडून ते भाजपात गेले. (वृत्तसंस्था)

**आतापर्यंत ४३८ कोटी रुपये जप्त**

# दोन राज्यांत कडक नोटांची अवकाळी ‘बरसात’

◆ **नवी दिल्ली, ९ नोव्हेंबर**

महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीदरम्यान मतदारांना प्रलोभनापासून रोखण्यासाठी निवडणूक आयोगाने केलेल्या कारवाईत आतापर्यंत तब्बल ४३८ कोटी रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. यात एकट्या महाराष्ट्रातून २८० कोटींचा ऐवज जप्त झाला असून, २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत या रकमेत तिप्पटीने वाढ झाली आहे.



**महाराष्ट्रातून जप्त झालेला ऐवज**

| | |
|---|---|
| रोख रक्कम | ७३.११ कोटी |
| मद्यसाठा | ३७.९८ कोटी |
| अमली पदार्थ | ३७.७६ कोटी |
| दागदागिने | ९०.५३ कोटी |
| भेटवस्तू | ४२.५५ कोटी |
| एकूण | २८१.९३ कोटी |

जप्त केलेल्या ऐवजात रोख रक्कम, मद्यसाठा, अमली पदार्थ तसेच मौल्यवान धातू व भेटवस्तूंचा समावेश आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र आणि झारखंडसोबतच विविध राज्यांमध्ये होत असलेल्या पोटनिवडणुकीतही मतदारांना प्रलोभनापासून रोखण्यासाठी तपास यंत्रणांमार्फत कारवाई केली जात आहे. याअंतर्गत महाराष्ट्रातून २८० कोटी रुपयांचा, झारखंडमधून १५८ कोटी रुपयांचा, तर पोटनिवडणुका होत असलेल्या राज्यांमधून ११८ कोटी रुपयांचा असा एकूण ५५८ कोटी रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला . २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत १०३ कोटी कोटीचा, तर झारखंडमध्ये केवळ १८.७६ कोटी रुपयांचा ऐवज जप्त झाला होता, याकडे निवडणूक आयोगाने लक्ष वेधले. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्रात मविआचा सुपडासाफ होणार

### गृहमंत्री अमित शाहांचा हल्लाबोल

◆ **शिराळा, ९ नोव्हेंबर**

हरयाणातील निवडणुकीचे ताजे उदाहरण सर्वांसमोर आहे. तिथल्याप्रमाणे महाराष्ट्रातही महाविकास आघाडीचा सुपडासाफ होणार. शरद पवार यांच्या चार पिढ्या जरी आल्या, तरी आम्ही जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० परत आणणार नाही, अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी टीका केली.

ते सांगली जिल्ह्यातील शिराळा येथे भाजपा उमेदवार सत्यजीत देशमुख यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेत बोलत होते. त्यांनी शिराळ्यातील भुईकोट किल्ल्यावर छत्रपती संभाजी महाराजांचे मोठे स्मारक बांधण्याची घोषणा करीत महाविकास आघाडीवर सडकून टीका केली. गृहमंत्री म्हणाले, शरद पवार एरवी शेतकऱ्यांचा कैवार घेतात. पण, त्यांनी सत्तेत असताना त्यांच्यासाठी काय केले, त्यांनी आपल्या कारकीर्दीत महाराष्ट्राला काय दिले, हे सांगावे. याउलट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना ६ हजार रुपये देण्याचे काम केले.



कराड येथे शुक्रवारी महायुतीच्या उमेदवारांसाठी आयोजित भव्य जाहीर सभेत अमित शाह यांचा तलवार देऊन सत्कार करण्यात आला

**राम मंदिरावरून महाविकास आघाडीवर टीका**

अमित शाह म्हणाले, काँग्रेसने अयोध्येतील राम मंदिराचा मुद्दा तब्बल ७५ वर्षे भिजत ठेवला. पण, मोदींनी अवघ्या पाच वर्षांत राम मंदिर उभे करून दाखवले. हे मंदिर तयार झाले तेव्हा शरद पवार, उद्धव ठाकरे, राहुल गांधी प्रभु रामचंद्रांच्या दर्शनाला जाणार होते. पण, ते अजून अयोध्येला गेले नाहीत. आता हे लोक जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० पुन्हा लागू करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**पवारांच्या काढल्या चार पिढ्या**

भाजपा सरकारने व्याप्त काश्मिरात सर्जिकल स्ट्राईक केला, पण राहुल गांधी यांनी त्याचे पुरावे मागितले. त्यांना पुरावेच हवे असतील, तर त्यांनी टीव्हीवर पाकिस्तानचे चेहरे पाहावे. हरयाणातही हे आघाडीवाले फटाके घेऊन गेले होते. पण, त्यांना हे फटाके भाजपा नेत्यांना द्यावे लागले. तिथे त्यांचा सुपडासाफ झाला. आता महाराष्ट्रातही महाविकास आघाडीचा सुपडासाफ होईल, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# बारामतीतील लढाई कुटुंबातील : अजित पवार

◆ **पुणे, ९ नोव्हेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बारामती मतदारसंघात प्रचारसभा घेण्याची विनंती केली नाही; कारण तेथील लढा हा कुटुंबात आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी सांगितले.



अजित पवार हे शरद पवार गटाचे उमेदवार आणि त्यांचा सख्खा पुतण्या युगेंद्र पवार यांच्या विरोधात लढत आहेत. २० नोव्हेंबरला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान मोदी यांच्या प्रचार सभेला शुक्रवारपासून सुरुवात झाली आहे. बारामती मतदारसंघात पंतप्रधान मोदी सभा घेणार नाहीत का, असा प्रश्न विचारला असता अजित पवार म्हणाले, येथील लढा केवळ कुटुंबापुरता मर्यादित आहे. अमित शाह यांच्या प्रचार सभा मतदारसंघात होणार नाहीत का, याला उत्तर देत ते म्हणाले की, प्रचारासाठी फार वेळ नसल्यामुळे आणि निवडणूक खर्चाच्या मर्यादेमुळे आम्ही त्यावर विचार केला नाही.

बारामतीत विजयाचे मताधिक्य किती असेल, असे विचारले असता, मतदारसंघात फिरून आणि लोकांशी संवाद साधल्यानंतर ते सांगू शकेन. पण मी शंभर टक्के खात्रीने सांगू शकतो की, ही चांगली आघाडी असेल, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)



ठाणे येथे महायुतीच्या प्रचारानंतर आयोजित पत्रपरिषदेत उपस्थित केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते किरेन रिजिजू तसेच पक्षाचे उमेदवार



# ‘वोटोबा’ करतोय् मतदार जनजागृती

◆ **नाशिक, ९ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी स्वीप उपक्रमांतर्गत विविध उपक्रमांद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. नागरी भागात ‘वोटोबा’ शुभंकर तयार करून गर्दीच्या ठिकाणी मतदार जनजागृती करण्यात येत आहे.

हा ‘वोटोबा’ नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. जिल्ह्यात स्वीप नोडल अधिकारी तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या नियंत्रणाखाली शहरी व ग्रामीण भागात स्वीप अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यात बॅनर, विविध स्पर्धा, सायकल रॅली, सेल्फी पॉईंट्स, विविध व्हिडीओंद्वारे जनजागृती, घंटागाडींद्वारे जनजागृती, पथनाट्य, गृहभेटी आदी उपक्रम राबविण्यात येत आहेत. १९ नोव्हेंबरपर्यंत जनजागृती करण्यात येईल. मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी नागरी भागात ‘वोटोबा’च्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

ग्रामीण भागातही मोठ्या ग्रामपंचायतींत याद्वारे जनजागृती सुरू आहे. या ‘वोटोबा’द्वारे गर्दीची ठिकाणे, बाजारपेठ, बसस्थानक, दुकाने, सार्वजनिक ठिकाणी मतदान करण्याबाबत जनजागृती करण्यात येते. या उपक्रमाला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, हा ‘वोटोबा’ नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. (वृत्तसंस्था)

# १३.२६ कोटींची दारू, ड्रग्ज, वस्तू जप्त

◆ **ठाणे, ९ नोव्हेंबर**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत ठाणे जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी १३.२६ कोटी रुपयांची दारू, ड्रग्ज व मोफत वस्तू जप्त केल्या आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

जप्तीसंदर्भात एकूण २०९ एफआयआर नोंदविण्यात आले आहे, असे ठाण्याचे जिल्हाधिकारी शिनगारे यांनी बुधवारी विशेष निरीक्षक (खर्च) बी. आर. बालकृष्णन् यांच्यासोबतच्या आढावा बैठकीत सांगितले. शिनगारे यांनी ठाणे जिल्ह्यातील आगामी निवडणुकांशी संबंधित महत्त्वाची आकडेवारी सादर केली. यात १८ विधानसभा मतदारसंघांमध्ये ७२ लाख २९ हजार ३३९ मतदार असून, त्यात २२ लाख ८२ हजार ८८२ महिला आणि १,४१५ तृतीय पंथी आहेत. (वृत्तसंस्था)